शनिवार । २८ जून १९८० । ७५ पैसे

# माणूस

आठ वाजता विमान झेपावले. आठ वाजून दहा मिनिटांनी कोसळले. अवघ्या दहा मिनिटात आकाशात होते ते जमिनीवर चिरनिद्रित झाले. रक्तात बुडाले. दहाच मिनिटे । पण एक सिंहासन हादरवून टाकणारी !

'झेप' या एकाच शब्दात संजय गांधींच्या राजकीय उदयास्ताचे वर्णन करता येईल. ज्या विमानाने त्यांचा बळी घेतला तेच त्यांच्या वेगवान आयुष्याचे प्रतीक ठरते. पाहता पाहता हे विमान राजकारणात वर गेले आणि अवघ्या पाच । सहा वर्षातच त्याचा असा दुर्दैवी व धक्कादायक अंत झाला !

नेहरूंचे एक गाज़लेले वाक्य आहे–
"Success comes to those who dare and act; It seldom goes to the timid."
जे धाडस दाखवतात आणि कृती करतात त्यांना यश लाभते; ते भित्र्यांकडे क्वचितच लक्ष देते ! संजय गांधींजवळ यशासाठी नेहरूंनी सांगितलेले हे दोन्ही गुण भरपूर प्रमाणात होते. त्यामुळेच अवघ्या पाच । सहा वर्षात, आपल्या आईच्या मदतीने, त्यांनी भारतीय राजकारणावर आपली पकड बसवत आणली होती आणि भल्याभल्यांना मागे टाकून, इंदिरा गांधींनंतर कोण हा प्रश्न जवळजवळ निकालात काढून टाकला होता. आता पुन्हा अनिश्चितता, हेलकावे, चलबिचल. साऱ्या देशाची अपार सहानुभूती या दुःखद प्रसंगी इंदिरा गांधींच्या मागे उभी असली तरी संजय हा त्यांचा विश्वासाचा एकमेव आधार होता. तोच अचानक नाहीसा झाल्यावर. . . .

## आता
## पुढे
## काय

## ?

# सप्रेम नमस्कार..

□ 'माणूस' ७ जून अंकातील (दत्तो-वामनांच्या) 'श्री शिवचरित्र-पैलू' ची परीक्षा वाचली. रत्नपारखी मर्मज्ञ आहे. राजा दीक्षित हे नाव यापूर्वी कधी वाचल्याचे आठवत नाही. चूक माझी असेल. या माणसाला सतत लिहीत ठेवा. हल्ली एकूण पुस्तक परीक्षणाबाबत सर्वत्र आनंदच आहे ! वालुकारण्यात असा एखादा मरीचिकाप्रदेश आढळला की लगेच त्याची नोंद घ्यावी, असे वाटते. म्हणून हे पत्र.

आणखी एक :

'संध्याकाळचे पुणे'ही वाचनीय असते. गेल्यासारख्या एखाद्या अंकात हे सदर दिसले नाही की चुकल्याचुकल्यासारखे वाटते. प्रवासवर्णनात जसा काणेकरांनी एक नवा पायंडा पाडला, तसाच वार्तापत्राबाबत हा एक नवा विक्रम आहे. प्रवासवर्णनात जसे पदोपदी काणेकर भेटतात, तसेच या सायंकालीन पुण्यात मोकाशी सतत भेटत राहतात. त्यांना सोडू नका. कळावे.

६ जून १९८० माधव मनोहर
मुंबई

साप्ताहिक 'सोबत' (पुणे), दिनांक १३ एप्रिल १९८० या अंकात पृष्ठ २ व ३ वर 'भेटीगाठी' या अनिल थत्ते लिखित सदरात पुढील मजकूर आला आहे–

'राजा राजवाडे हे साहित्यातले बडे प्रस्थ नव्हेत. तसेच ज्यांच्याकडे दुर्लक्ष करता करता येईल असे नवोदित लेखक पण नव्हेत. पस्तीस पुस्तके प्रसिद्ध झालेल्या राजा राजवाड्यांचे नाव दरवर्षी शे-पन्नास दिवाळी अंकातून झळकते तेव्हा त्यांच्या मुद्यांची दखल घेण्याचे टाळता येणार नाही. श्री. राजवाडे यांच्याशी झालेली महत्त्वाची प्रश्नोत्तरे अशी–'

यानंतर अनिल थत्ते व राजा राजवाडे यांच्या प्रश्नोत्तरांचा बराच मजकूर आहे. यात एके ठिकाणी 'रवींद्र पिंग्यांनादेखील बुडवले' या मथळ्याखाली 'माणूस' व रवींद्र पिंगे यांच्यातील व्यावहारिक बाबींसंबधी पुढील मजकूर आलेला आहे. राजा राजवाडे अनिल थत्ते यांना सांगतात–

'मराठीतील शैलीकार साहित्यिक श्री रवींद्र पिंगे यांना मी एकदा विचारले की 'माणूस'च्या साप्ताहिकाच्या वैभवाच्या काळात तुम्ही शतपावलीसारखे सदर लिहिले आणि त्यांच्याच राजहंस प्रकाशनसारख्या मातब्बर संस्थने तुमचे पुस्तक काढले तर चांगले मानधन तुम्हाला मिळाले असेल?' त्यावर रवींद्र पिंगे म्हणाले की, 'काय सांगू राजा, तुझा विश्वास बसणार नाही पण मला त्या लिखाणाबद्दल तांब्याचा एक पैसादेखील मिळालेला नाही !'

## रवींद्र पिंगे यांचा खुलासा

हा मजकूर गैरसमज निर्माण करणारा असल्याने 'माणूस' कडून पिंगे यांच्याकडे काही विचारणा-चौकशी होण्यापूर्वीच म्हणजे अंक प्रसिद्धीनंतर २।३ दिवसांनीच, १४ एप्रिलला रवींद्र पिंगे यांनी तडकाफडकी एक सविस्तर खुलासा संपादक सोबत त्यांच्याकडे परस्पर पाठवून दिला. आता २-२॥ महिने उलटले तरी सोबतमध्ये हा खुलासा प्रसिद्ध झालेला नाही. म्हणून पिंगे यांनी तो जसाच्या तसा 'माणूस' कडे प्रसिद्धीसाठी आता दिला आहे. 'सोबत' मध्ये वास्तविक खुलासा प्रसिद्ध व्हायला काहीच हरकत नव्हती. अजंता जैन यांच्या सोबतच्या उद्‌घोषित धोरणात न बसणाऱ्या भविष्य-ज्योतिषविषयक लेखांमुळे जागेची टंचाई तर सोबतकडे-सध्या निर्माण झाली नसावी ? – पिंगे लिहितात–

दिनांक १४।४।१९८०

संपादक 'सोबत' यांस
स. न. वि. वि.

'माणूस' साप्ताहिक आणि माझे आर्थिक संबंध ह्यांच्याबद्दल गैरसमजावर आधारलेला


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : चौथा
२८ जून १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

आणि दोन माणसामधलं अंतर अकारण वाढवणारा मजकूर 'सोबत'च्या मागील अंकात प्रसिद्ध झाला आहे. कुठल्याही संपादक-लेखकाची व्यावहारिक देणीघेणी ही पूर्णत: त्याची खाजगी बाब आहे. तिचा जाहीररीत्या पंचनामा त्रयस्थाने करण्याचं काहीच कारण नाही. आणि समजा कुणी उत्साहाच्या अगर निराशेच्या भरात तसं करायचं ठरवलंच, तर मजकुराच्या प्रसिद्धीच्या अगोदर त्याच्या अद्यावत खरेपणाची शहानिशा करून घेणं अगत्याचं असतं. माझे स्नेही असलेल्या राजा राजवाडे आणि अनिल थत्ते ह्यानी पत्रकारितेची आचारसंहिता नीट पाळलेली दिसत नाही. निदान लिहिताना तरी लेखकांनी मूल्यविचार जागता ठेवायचा असतो. राजवाडे आणि थत्ते हे सामाजिक न्यायाच्या बाजूने उभे आहेत. त्यांचा तोल असा जाता कामा नये. निदान, त्याच्या शब्दामुळे दुसऱ्याला नाहक क्लेश तरी होता कामा नयेत.

आपण जे सहजगत्या बोलतो ते हातात सत्याचा तराजू घेऊन मापलेलं कधीच नसतं. आपण मित्राला सागतो, काय कटकटी आहेत म्हणून सांगू लेका, ही बायकापोरं सुखाचा एक क्षण लाभू देतील तर शपथ. हे बोलणं शब्दश: घ्यायचं असतं काय? उलट, असं बोलून परत आपण सदाच्या विसाव्यासाठी आपल्या बायकापोरांतच परततो. का? कारण, आपल्या कुटुंबाच्या कुंपणापलीकडे स्वर्ग म्हणून कसा तो नाहीच, ज्या काय सुखासमाधानाच्या राशी असतील त्या फक्त आपल्या कुटुंबकबिल्यातच आहेत, अन्यत्र बिलकूल नाहीत, हे माहीत असूनही आपण बायकापोरावरच करवादतो. कां? तर, ती अन्याय करतात म्हणून नव्हे, तर ती आपलीच असतात म्हणून. हाच प्रकार 'माणूस' आणि मी ह्याच्या संबंधात पूर्वीही होता नि आजही आहे. आम्ही एकाच कुटुंबाचे आतून जोडलेले अविभाज्य घटक आहोत. आमच्या नातेसंबंधात पैसा हा प्रधान रज्जू कधीच नव्हता.

काही वर्षांपूर्वी मी राजवाड्याच्या घरी उभ्या उभ्या गेलो असताना मराठी लेखनाच्या पेठेतील हवा काय आहे ह्याची मैत्रीपूर्ण चर्चा केली. काही प्रकाशकाची नाव घेतली. काही लेखकाची नावं घेतली. एकूण सर्वांचेच अनुभव हताश करणारे वाटले. गुणी लेखकाच्या झोळ्या रिकाम्या आणि एकेकाळी जे झोळ्या घेऊन प्रकाशकाच्या दारात जोगवा मागीत हेलपाटे घालीत हिंडत होते, त्यांची सध्याची अनाकलनीय चलती, असाही विषय झाला. त्यावेळी 'माणूस'कडून माझ्या पुस्तकाच्या मानधनाचा पक्का हिशोब तयार व्हायचा होता. राजवाडे म्हणतात त्याप्रमाण मी त्यावेळी त्याच्याशी निराशेने बोललो हे खरं आहे पण तेवढं एकच वाक्य बोलून मी श्वास सोडला नाही. मी पुढे असंही नि:संदिग्धपणे म्हणालो, 'माणूस' मधून त्याच्या चलतीच्याकाळात मी सतत लिहिल्यामुळे मला फार मोठा वाचकवर्ग मिळाला, अंगापुरती प्रतिष्ठा मिळाली. 'माणूस' ने मला स्तंभलेखनाचं मानधन त्या त्या वेळी दिलं. मात्र पुस्तकाचं मानधन काहीच मिळालं नाही. पण मी तगादा लावणार नाही, कारण 'माणूस'नेच मला साहित्याच्या नकाशावर आणलं. 'माणूस' ब्रॉट मी ऑन दि मॅप ऑफ लिटरेचर.'

खरं तर राजवाडेनी हे माझं सगळं म्हणणं माडायला हवं होतं; कारण अखेर पैसा ही लेखन-व्यवहारातली मामुली बाब आहे. मान्यता आणि इमेज हीच मूळ वस्तु आहे. 'माणूस' मधून चांगलं लेखन करणारांना ती लाभते. मुख्य म्हणजे 'माणूस'चे नि माझे आर्थिक व्यवहार बिलकूल बिघडलेले नाहीत. थोडं कमी-जास्त व्हायचंच. माझं बरचसं मानधन (पुस्तकाचं) अगदी परवा-परवाच मिळालं आणि आम्ही लेखक तरी कुठे साधुपुरुष आहोत? आमच्याही लांड्यालबाड्या यथेच्छ चालूच असतात. लेखक निव्वळ पैशासाठी लिहितो असं ठोकून देणं खरं नाही. लेखकाला मनापासून हवा असतो तो जाणकाराच्या मान्यतेचा नि लेखनामुळे लाभणाऱ्या संतोषकारक प्रतिष्ठेचा अदृश्य बिल्ला. ज्याला पैसा मिळाला नि मान्यता तेवढी निसटली, त्या लेखकाला अन्न अळणी लागतं. तो न्यूनगंडाने दुबळा आणि आजारी होतो.

राजवाड्याच्या मुलाखतीत आलेलं माझ्या तोडचं अर्धवट वाक्य वाचून 'माणूस' कार कष्टी होतील. असं व्हायला नको होतं. सामाजिक जाणीव म्हणजे काय ते ठीक जाणणाऱ्या लेखकमित्रानी लेखनात मूल्यविवेक सदैव सांभाळला पाहिजे. लेखन हे पैशाचं लखलखीत तोरण दारावर बांधण्यासाठीच तेवढं नसून, माणसाची धडपड जाणून घेण्यासाठी' आणि माणसामाणसामधलं अंतर कमी करण्यासाठीच असतं, ह्याचं भानही त्यांनी राखलं पाहिजे: शुचिता आणि विवेक हे लेखकाचे डोळे आहेत. ज्याचा विवेक संपला, त्याचं सारंच संपेल. उरेल फक्त आयुष्यभराच्या सोबतीसाठी आलेली घोर निराशा.

आपला वाचक,

–रवींद्र पिंगे.

यावर आता अधिक काय लिहायचे? शिवाय मूळ लेखक अनिल थत्ते याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबतही विचारविनिमय सुरू आहे पुण्यातील सुप्रसिद्ध अॅडव्होकेट एम्. आर्. पराजपे याच्या मार्फत थत्ते याना 'माणूस'कडून रीतसर नोटिसही पाठवली गेलेली आहे. तेव्हा तूर्त येथे थाबणे इष्ट.

–संपादक 'माणूस'

## डॉ. लोहियांनी आघाडीचे राजकारण केले नाही!

दि. १४ च्या 'माणूस'मधील 'आता आघाड्या नकोत!' या विजय कुवळेकर याच्या लेखातील, डॉ. लोहियांच्या विगर–

काँग्रेसवादाच्या सिद्धान्ताबद्दलचा मजकूर गैरसमज पसरविणारा आहे. डॉ लोहिया यानी १९६७ साली आघाडीच्या राजकारणाचा प्रयोग केला हे त्यांचे म्हणणे विपर्यस्त आहे.

डॉ. लोहिया आणि सं. सो. पा. हे आघाडीच्या राजकारणाचे विरोधक होते; परंतु, १९६७ च्या सुमारास त्यांना जनमताची तीव्र जाणीव झाली होती व ते सर्व विरोधी पक्षाना एकत्र येऊन काँग्रेसची जागा घेण्यास सांगत होते एका बैठकीत मी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले, "आज जनतेला काँग्रेस पक्ष नको आहे. आपण, त्यांना पर्याय देणार आहोत की नाही, हा प्रश्न आहे!"

डॉ. लोहियांचे म्हणणे १९६७ सालीही बरोबर होते. १९७७ सालीही ते अचूक ठरले; परंतु, आपले नेते पर्यायी पक्षाची जबाबदारी पार पाडण्यास अपात्र ठरले. आज विरोधी पक्षनेते आपल्या पराभवाचे भांडणाचे निमित्त करून समर्थन करतात ती बकवास आहे. खरे म्हणजे ते जबाबदारीने वागत नव्हते. आजही जनतेला काँग्रेसचा पर्याय हवा आहे; परंतु या आघाडीवर आज तरी संपूर्ण अंधारच दिसतोय.

१६।६।८० भाऊ पाध्ये, मुंबई

## आघाड्यांमध्येही लोहियांचा पुढाकार होता!

दि. १४ जूनच्या 'माणूस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'आता आघाड्या नकोत, विरोधी पक्षबांधणी हवी' या माझ्या लेखासंबंधी श्री. भाऊ पाध्ये यांच्यासारख्या एका समर्थ अशा लोहियावादी साहित्यिकानं काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याला थोडं विस्तारानं उत्तर देता येईल.

माझ्या लेखातला 'लोहियांच्या बिगर काँग्रेसवादाच्या सिद्धाताबद्दलचा मजकूर गैरसमज पसरविणारा आहे,' हा श्री. पाध्ये याचा आक्षेप योग्य नाही. उलट '१९६७ साली डॉ. लोहिया यांनी आघाडीच्या राजकारणाचा प्रयोग केला नाही,' असा दावा करणंच वस्तुस्थितीशी विसंगत आहे. कारण समविचारीच नव्हे, तर काही प्रमाणात विरोधी भूमिका असणाऱ्या विरोधी पक्षांनीही किमान सहमतीच्या कार्यक्रमावर एकत्र यावं, असा लोहियांचा प्रयत्न होता. 'ते सर्व विरोधी पक्षाना एकत्र येऊन काँग्रेसची जागा घेण्यास सांगत होते,' हे खरं असलं तरी 'विरोधकांचा एक पक्ष' हे त्यांचं अंतिम उद्दिष्ट होतं; पण आघाड्यांना त्यांचा विरोध नव्हता. उलट, एकच पर्यायी पक्ष निर्माण करण्याच्या वाटचालीतला एक टप्पा म्हणून ते आघाड्याकडे पहात होते तसं नसतं तर १९६७ च्या आघाड्यात त्यांनी पुढाकार घेतलाच नसता.

लोहिया-विचारावरच्या अधिकारी कार्यकर्त्या इंदुमती केळकर यांचा 'माणूस'च्या ५ मार्च १९७७ च्या 'जनविराट अंका'तला 'गैरकाँग्रेसवाद ते जनता पक्ष' हा लेख याची साक्ष द्यायला पुरेसा आहे. 'चीन-प्रकरणी कलंकित आणि लज्जाजनक ठरलेले काँग्रेस सरकार लवकरात लवकर सत्ताभ्रष्ट करण्यासाठी विरोधकांनी एका विशाल राजकीय रंगमंचावर एकत्र यावे, यासाठी प्रयास करताना लोहियाना एक अडचण जाणवली. विभिन्न विरोधकांमध्ये अंतिम उद्दिष्टाबाबत असलेले मूलभूत मतभेद हीच ती अडचण होय मूलभूत विचाराबाबत एकवाक्यता घडवून आणण्याच्या आग्रहामुळे तात्काळ संभवनीय असणारे ऐक्य दुरावते, असाही त्याना अनुभव आला. म्हणून तावडतोबीच्या भरीव कार्यक्रमावर एकमत करून अंतिम उद्दिष्टासंबंधीची चर्चा सतत चालू ठेवावी, असा उपाय लोहियांनी सुचविला.' अशी माहिती इंदुमती केळकरानी त्यात दिली आहे.

त्याबरोबरच, 'जनतेत चैतन्य निर्माण करू शकणाऱ्या सर्व कार्यक्रमांभोवती आणि धोरणांभोवती काँग्रेससरकार फणा उभारलेल्या काळसर्पाप्रमाणे विळखा घालून बसलेले आहे...हा विळखा सोडताना विरोधकांचा एक पक्ष बनो, की व्यापक मोर्चा बनो-एक पक्ष बनला तर फारच चांगले-जनतेत विश्वास निर्माण करण्याचे काम ते आपल्या संघर्षांनी व संसदीय कृतीने निर्माण करू शकतील असे लोहिया म्हणत,' याचीही नोंद त्यांनी केली आहे.

तेव्हा, आघाडीच्या राजकारणाला लोहियांचा आणि स. सो. पा. चा विरोध होता, या म्हणण्यात अर्थ नाही. १९६७ च्या


## वाचनालयात नवीन दाखल झालेली पुस्तके

1. The Bourne Identity (Best seller Novel) By Ludlum Robert
2. Psyeho-Cybernetics (Psyeology) By Maltz Maxwell
3. The practical way to better memory : By Furst Bruno
4. Sayings of the Ayatollah Khomeini '
5. Dubin's Lives (Novel) By Malamud Bernard

मराठी

१. किर्लोस्कर कथा-भाग १ ते ४ (किर्लोस्कर मासिकातील उत्तमोत्तम कथा) संपादक : राम कोलारकर व मु. शं. किर्लोस्कर
२. स्त्री आणि पुरुष (लैंगिक विषयावर) विद्वास र. गं.
३. चाहूल (कथासंग्रह) अंबिका सरकार
४. उजेडाचे वेड (कथासंग्रह) अरविंद गोखले
५. श्री शिवचरित्राचे पैलू-कै. दत्तो वामन पोतदार

"I find that the only thing that really stands up, better than gambling, booze, and women, is reading" Mario Puzo.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

निवडणुकीत विरोधकांना एकत्र आणण्यात लोहियानी पुढाकार घेतला होता, ही वस्तुस्थिती आहे. 'डॉ. लोहियांच्या (बिगर कॉंग्रेसपक्षानी कॉंग्रेसविरुद्ध एकत्रितपणे उभे ठाकण्याच्या) या विचाराचा पहिला ठळक प्रयोग चरणसिंगआदी मंडळींनी एकत्र येऊन केला. तेव्हा काही राज्यांमध्ये एकत्रित विरोधी पक्षांची संयुक्त आघाडी सत्तेवर आली, असं मी माझ्या लेखात म्हटले आहे आणि 'लोहियाच्या खटपटीने १९६७ च्या निवडणुकीत काही प्रमाणात विरोधकानी एकत्र येऊन निवडणुका लढवल्या. त्याचे दृश्यफळ म्हणजे नऊ प्रांतांत कॉंग्रेस गडगडली आणि संयुक्त विधायक दले राज्य करू लागली. या गैरकॉंग्रेसी सरकारांबद्दल लोहिया म्हणाले, 'धरून चाला की, विचित्र विचाराच्या पक्षांची बनलेली ही सरकारे जास्त काही करू शकणार नाहीत; पण अखेरीला क्रांती तर होईल; वीस वर्षे सत्ता चालविणाऱ्या सडलेल्या सरकारचा तर अंत होईल!' याचा उल्लेख इंदुमती केळकरांनी केला आहे. माझ्या प्रतिपादनाला त्यातून पुष्टीच मिळते. 'कॉंग्रेसचा पराभव' हे लोहियांचं प्रथम उद्दिष्ट होतं. म्हणूनच आघाड्याना त्यांची हरकत नव्हती, विरोध नव्हता.

'१९६७ च्या सुमारास लोहियाना जनमताची तीव्र जाणीव झाली होती व ते सर्व विरोधी पक्षाना एकत्र येऊन कॉंग्रेसची जागा घेण्यास सांगत होते,' असं पाध्ये म्हणतात, पण ही 'तीव्र जाणीव' १९६७ च्या सुमारास आणि एकट्या लोहियानाच झाली होती, असं नाही. दीनदयाळ उपाध्यायानाही ती झाली होती. या जाणिवेमुळे का असेना पण १९६७ मध्ये त्यानी आघाडीच उभारली होती, हे नाकारून कसं चालेल? पाध्ये म्हणतात तसा आघाड्यांना त्यांचा विरोध होता, तर संविदमध्ये संसोपा सहभागी कशी झाली? 'संमिश्र मंत्रिमंडळ ही एक प्रक्रिया आहे ती चालू राहील आणि त्यातूनच जनतेचा हितरक्षक' असा समर्थ पर्यायी पक्ष उभा राहील,' असं दीनदयाळ म्हणत असत. लोहियाचीही हीच भूमिका होती.

अशा पर्यायाची पहिली पायरी म्हणूनच विरोधी पक्षाना एकत्र यायला लोहिया सांगत होते. 'विरोधकानी एकत्र येण्यानंच (मतविभागणी टळेल आणि अल्पमतात राज्य करणाऱ्या) कॉंग्रेसचा पराभव करणं शक्य होईल, हा विचार डॉ. राम मनोहर लोहिया यानी यामुळेच मांडला. सातत्यानं ते तो मांडत राहिले. पुढे त्याच्या सत्यतेची प्रचीतीही आली; पण दुर्दैवानं, वास्तवातले त्याचे प्रयोग मात्र फारसे फलदायी ठरले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे, हे मी माझ्या लेखात स्पष्टपणे म्हटलं आहे आणि १९६७ चा आणि १९७७ चा अनुभव लक्षात घेता वस्तुस्थिती याहून वेगळी नाही. (लोहियांनी प्रामुख्यानं विरोधी राजकारणाचा विचार केला, सत्तेच्या राजकारणाचा केला नाही असं दिसतं.) या दोन्ही प्रयोगांच्या वेळी विरोधी मतांचं एकत्रीकरण झालं, पण मनाचं एकीकरण झालं नाही. त्यामुळं ऐक्य निष्फळ ठरलं. विचारात आणि कार्यक्रमात मूलभूत मतभेद होते, त्यात काही एकमत असलं तरी व्यक्तित्वाचे भेद तीव्र होते. अशा स्थितीत विरोधकाचं ऐक्य ही फार काळ टिकणारी गोष्ट नव्हती, नाही. लोहियाच्या म्हणण्याप्रमाणे 'तातडतोबीच्या भरीव कार्यक्रमावर एकमत करून' गाडा हाकला असता तरी ती हंगामी व्यवस्थाच ठरली असती. अशा ऐक्यातून एकच एक एकसंध पर्यायी पक्ष उभा राहणं ही संभाव्य असलीच तर प्रदीर्घकालीन प्रक्रिया आहे. तिच्यासाठी नेतेही थांबले नाहीत आणि जनतेनंही तेवढी सहनशीलता दाखवली नाही.

अशा अनेक कारणांनी विरोधक पुन्हा पूर्वीप्रमाणे विभागले गेले आहेत. मतांची टक्केवारी पाहिली तर आजही कॉंग्रेस (आय) ला पर्यायी असा पक्ष जनतेला हवा आहे नि त्या आघाडीवर आज तरी अंधारच आहे, हे खरं आहे. पण लोहियानी सांगितला असला तरी 'विरोधकांचं ऐक्य' हा त्यावरचा टिकाऊ उपाय नाही, हे अनुभवानं दाखवून दिलं आहे. ते स्वीकारायला काय हरकत आहे? आपापल्या सत्य कार्यक्रमावर आधारित पर्यायी पक्ष उभा करण्यासाठी जनमताची मशागत करणं आणि ते करत असताना विरोधी पक्ष-चळवळीला पूरक अशी परस्परात समन्वय सहकार्याची भूमिका ठेवणं, हाच त्यावर उपाय आहे, हा माझ्या म्हणण्याचा मथितार्थ आहे त्याचाच पुनरुच्चार करावासा वाटतो.

—विजय कुवळेकर


'सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. ग. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# इलेक्शन जिंकणाऱ्या विलक्षण टक्ल्या

रघुवीर मुळे

◻ भारतीय लोकशाहीत निवडणुका या खेळल्या जात नसून त्या लढविल्या जातात. आता लढाई म्हटली महाभारत घडणे-घडविणे साहजिकच. आणि महाभारत म्हटले की 'नरो वा कुंजरो वा', 'हा सूर्य-हा जयद्रथ' अशा युक्त्या आल्याच. निवडणुकीचे स्वरूप दर निवडणुकीत तांत्रिकदृष्ट्या बदलत गेल्याने उमेदवाराना आपल्या यशासाठी तंत्रेच बदलावी लागली. पहिल्या एक दोन निवडणुका त्यामानाने फार सोप्या गेल्या. पेटचा पळविणे व मतपत्रिका (कोऱ्याच असल्याने) आपल्या पेटीत टाकणे हा त्यातल्या त्यात हिंसक प्रकार. त्यावेळचा सोपा आणि लोकप्रिय प्रकार म्हणजे मतपत्रिका बाहेर आणणे व शेवटी एक गठ्ठा पत्रिका पेटीत टाकणे. जसजशी आपली लोकशाही प्रगल्भ-प्रौढ होत चालली तसतसे मतदानाचे तंत्रही बदलले. अन् एकदा 'दान' म्हटले की रागेत सगळेच 'सत्पात्र' कसे असतील ? रेटारेटी-गुद्दागुद्दी आणि शेवटी मारामारी करून पदरात दान पाडून घेण्याचे प्रकार वाढले यावरूनच निवडणुका 'लढल्या' जातात असे बहुधा म्हटले जात असावे. कसेही असले तरी लढाईत सारेच सभ्य असल्याने व अखेरी यशासारखे यश नसल्याने नव्या तंत्रानाही 'राजमान्यता' च लाभल्यासारखे झाले आहे. त्यातल्या काहीची ही ओळख !

उत्तर महाराष्ट्रातील एका अतिश्रीमंत उमेदवाराने एक रुपया किमतीची पन्नास हजार कुपन्स छापून घेतली होती. ही कुपन्स मतदारसंघात विकली. 'हा' उमेदवार निवडून आला की कुपन दाखवा न् दहा रुपये मिळवा असे सागण्यात आले. बरे एका रुपयात दहा रुपये मिळणेही कुपन खरेदी करणाऱ्याच्याच 'हातात' होते. खात्रीचे. हा उमेदवार प्रचंड मतानी विजयी न झाल्यासच नवल. या तंत्रात किती तरी फायदे होते. पहिला फायदा म्हणजे कुपन खरेदी करणाऱ्याचे 'मत' निश्चित होते. पन्नास हजाराचा निधी प्रथमच उभा राहातो. गाड्या-पेट्रोल-सभा-प्रचार-मेळाव्यानी खर्च भरमसाठ होऊनही जी मतांची निश्चिती होत नाही ती यातून होते.

दुसऱ्या एका मतदार संघात वेगळीच युक्ती अवलंबिली. आदिवासी-गिरिजनांची मते ही काही केले तरी 'पजा' लाच जाणार मग ती त्या उमेदवाराला मिळू नये म्हणून कार्यकर्त्यांनी 'शाई' मिळविली. ती मतदारांच्या बोटावर आधीच लावून टाकली. चार वाजेपर्यंत थांबा, चार वाजता पैशांचे वाटप होईल असे त्यांना सागण्यात आले. तोवर त्याचे मतदान परस्पर उरकून घेण्यात आले होतेच. यातूनही काही जर मतदानकक्षात गेलेच तर त्याचे मतदान झाले आहे, बोटावर शाई आहे असे सांगून त्यांना परतवण्यासाठी उमेदवाराचे 'एजंट' सज्ज होतेच. दुसरीकडेही थोड्याफार फरकाने हाच प्रकार घडला. मात्र येथे कबूल केल्याप्रमाणे पैशांचे वाटप झाले. येथे आदल्या दिवशीच सांगण्यात आले की मतदानाची वेळ आटोपल्यानतर 'बिन शाईचे बोट' दाखवा अन् पाच रुपये घेऊन जा. अर्थात इसार म्हणून आधी पाच रुपये देण्यात आले होतेच.

निवडणुकीत एका सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष उभे होते विरोधी पक्षीय उमेदवार आणि त्याचे प्रचारक त्या अध्यक्षांनी साखर-विक्री व्यवहारात घेतलेल्या 'ऑन' रकमेच्याबाबतीत वारंवार उल्लेख केले. निवडणूक तोंडावर आली असताना अध्यक्षांनी आपल्या जाहीर सभेत सांगितले, 'माझ्या बाबतीत विरोधी उमेदवार चुकीचा प्रचार करीत आहेत. मी अडीच लाख रुपये साखर विक्री व्यवहारात ऑन रक्कम घेतली या त्याच्या प्रचारात अजिबात अर्थ नाही. साखर कारखाना आणि साखर व्यवहार याबाबतीत त्यांना काडीचीही अक्कल नसल्याने ते असे आरोप करीत आहेत. अडीच लाख रुपये ऑन घेण्याइतका आपला कारखाना लहान नाही मी एकूण पंधरा लाख रुपये ऑन घेतले असून हा सर्व पैसा मी तुमच्याच कारणी लावणार आहे' आणि या उमेदवाराने दिलेला शब्द पाळलादेखील. मतदानाच्या आदल्या दिवशी गावच्या लोकसंख्येच्या प्रमाणात 'ड्रम्स' व 'बोकड' मीठ–मिरची–मसाल्यासह मतदारसंघात रवाना झाले होते. ◻


## व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या
आयर्व्हिग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा
मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# अफगाणिस्तान

## टिकाऊ समझोत्याचा मार्ग

### वा. दा. रानडे

रशियाने अफगाणिस्तानातील फौजा अंशत: काढून घेतल्याची घोषणा केली असल्याची बातमी आली. किती सैनिक काढणार हे त्यात स्पष्ट केलेले नाही. सर्व फौजा किती मुदतीत काढणार याचाही उल्लेख नाही माझ्या एकूण विवेचनास त्यामुळे बाध येत नाही. घोषणेचे भारताने स्वागत केले पण पाश्चात्य राष्ट्रांचे समाधान झालेले नाही. सर्व फौजा काढून घ्याव्या अशी त्यांची मागणी आहे. पण ही मागणी मान्य व्हावी यासाठी पाश्चात्य राष्ट्रे आपल्या बाजूने काय करीत आहेत? बंडखोराना शस्त्रमदत त्यानीही कमी करायला हवी. तणाव कमी करण्यास अनुकूल पावले दोन्ही बाजूनी टाकली गेली पाहिजेत. पाश्चात्य राष्ट्रात फूट पडावी, त्यानी एकजुटीने काही हालचाल करू नये या उद्देशाने व्हिएन्ना येथे व्हावयाच्या पाश्चात्य राष्ट्रप्रमुखाच्या बैठकीपूर्वी रशियाने ही घोषणा केली व फ्रान्सने तिचे स्वागत केले यावरून हा उद्देश काही प्रमाणात साध्य झाल्याचे दिसते; पण टिकाऊ तडजोड त्यातून कितपत होईल?

अफगाणिस्तानी रशियन लष्करी हस्तक्षेपास ५|६ महिने होऊन गेले. कार्माल राजवटीला प्रतिकार वाढत असून तो दडपून टाकण्यासाठी रशियाने नुकतेच दहाहजार सैनिक तेथे पाठविल्याच्या बातम्या होत्या आणि अफगाणिस्तानातील रशियन सैनिक आता एक लाख झाले आहेत. फौजा काढून घेण्याची घोषणा या पार्श्वभूमीवरून पहायला हवी.

या प्रश्नातून जागतिक युद्ध होण्याचा धोका सुरुवातीला काही निरीक्षकानी व्यक्त केला होता तर अफगाणिस्तानचे युद्ध म्हणजे रशियन व्हिएटनाम ठरेल असे अंदाज काहीनी केले होते.

आता पाच महिन्यानंतर या प्रश्नाचे स्वरूप अधिक स्पष्ट होऊ लागले आहे अफगाणिस्तान आपण सहज आपल्या नियंत्रणाखाली आणू हा रशियन नेत्याचा अंदाज खरा ठरलेला नाही. कार्माल राजवट रशियन लष्कराच्या पाठिंब्यावरच टिकून आहे. या राजवटीला असलेला प्रतिकार मोडून काढल्यावर आणि ती स्थिर झाल्यावर लष्कर काढून घेण्याचे रशियाने योजले होते; पण इराणच्या सीमेपासून पाकिस्तान सीमेपर्यन्त कार्माल राजवटीला प्रतिकार वाढत आहे. शाळेतील मुली सुद्धा त्यात भाग घेत आहेत. कम्युनिस्ट राजवटीच्या विरोधकाचा पूर्ण नि:पात करण्यासाठी सध्या तेथ असलेली रशियाची एक लाख सेना पुरेशी नसून ती पाच लाखापर्यंत वाढवावी लागेल असा काही निरीक्षकाचा अंदाज आहे. अमेरिकेने व्हिएटनाममध्ये पाच लाख सैनिक पाठविले होते. तरीही तिला निर्णायक विजय मिळविता आला नाहीच. अफगाणिस्तानात रशियालाही असाच अनुभव येईल काय? पण अफगाणिस्तान आणि व्हिएटनामची तुलना करताना दोन्ही परिस्थितीतील फरक लक्षात घेतला पाहिजे. अमेरिकेपासून व्हिएटनाम फार दूर अतरावर होता. अफगाणिस्तान रशियन सीमेला लागूनच आहे. तेथे लष्कर पाठविताना रशियापुढे अतराचा प्रश्न नसला तरी एवढ्या मोठ्या प्रमाणावर लष्कर तेथे दीर्घकाळ गुतवून ठेवणे कितपत योग्य याचा रशियालाही विचार करावा लागेल. रशियन फौजा आहेत तोपर्यंत कार्माल सरकार टिकून आहे; पण त्या काढून घेतल्यावर तेथे रशियाला अनुकूल असलेले सरकार कितपत टिकेल याची रशियन नेत्यानाही खात्री वाटत नाही. म्हणून फौजा काढून घेण्यापूर्वी कार्माल सरकारच्या सुरक्षिततेची हमी रशियाला पाश्चात्य राष्ट्राकडून हवी आहे; पण ही अट पाश्चात्य राष्ट्रे कशी मान्य करतील? रशियन फौजा काढून घेतल्यावरही रशियाला अनुकूल सरकारच अफगाणिस्तानात राहणार असेल तर हा सारा लढा कशासाठी केला असाच प्रश्न त्याच्या मनात येईल. आपल्या बाजूचे सरकार अफगाणिस्तानामध्ये आणावे असा त्यांचा उद्देश आहे. बंडखोरांना अमेरिका शस्त्राचा पुरवठा करील असे धोरण अध्यक्ष कार्टर यानी उघडपणेच जाहीर केले याशिवाय पाकिस्तान व चीनकडून बंडखोराना मदत मिळते, लष्करी शिक्षण दिले जाते.

बडी राष्ट्रे आपले प्रभावक्षेत्र वाढविण्याच्या व सत्तास्पर्धेच्या दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पहात आहेत नव्या शस्त्रांचा प्रयोग कोरिया व व्हिएटनाम-युद्धात करण्यात आला तसाच अफगाण-युद्धातही केला जाण्याचा सभव आहे बड्या राष्ट्राच्या नव्या शस्त्राचे चाचणीसाठी छोटे देश त्याना वापरू द्यावयाचे का? छोट्या देशांनीच संघटित होऊन आपले देश म्हणजे नव्या शस्त्राच्या चाचणीसाठी प्रयोगभूमी होऊ देण्यास विरोध केला पाहिजे. ते संघटित नाहीत, समर्थ नाहीत याचाच फायदा बडी राष्ट्रे घेत आहेत

अफगाणिस्तानच्या प्रश्नाचा विचार करताना लक्षात घ्यावयाची पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे तेथील जनतेचे मत हेच निर्णायक मानून या प्रश्नाची सोडवणूक करायला हवी. सध्याचे कार्माल सरकार रशियन लष्कराचे पाठिंब्याने अधिकारावर आले व त्याच पाठिंब्याचे बळावर टिकून आहे हे कोणी तेथील जनतेच्या खुल्या मनाने निवडले गेलेले प्रातिनिधिक सरकार म्हणता येणार नाही. खुल्या निवडणुका घेऊन तेथे जनतेचे प्रातिनिधिक सरकार स्थापन करणे ही हा प्रश्न सोडविण्याच्या अटीतील पहिली अट असली पाहिजे. संयुक्त राष्ट्रसघटनेच्या किंवा अलिप्त राष्ट्राच्या देखरेखीखाली तेथे खुल्या निवडणुका घेऊन प्रातिनिधिक सरकार तेथे अधिकारावर आणले पाहिजे. या सरकारचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व आम्ही मान्य करतो, त्याच्या अंतर्गत कारभारात आम्ही कोणताही हस्तक्षेप करणार नाही, अशी हमी बड्या राष्ट्रानी दिली पाहिजे. तसेच आमचे धोरण अलिप्ततेचे राहील, कोणत्याही बड्या राष्ट्राचे गटात आम्हीसामील होणार नाही असे आश्वासन अफगाणिस्तानच्या या नव्या सरकारने दिले पाहिजे अफगाणिस्तानने आपली अलिप्तता गमावल्यानेच सध्याचा पेचप्रसंग निर्माण झाला.ही अलिप्तता त्याला पुन: मिळवून दिली पाहिजे. अलिप्त राष्ट्रानीच त्यासाठी पुढाकार घ्यावयास हवा अफगाणिस्तानचे पूर्वी रशिया व अमेरिका या दोन्ही बड्या राष्ट्राशी मैत्रीचे सबंध होते त्याच्या विकासासाठी या दोन्ही राष्ट्राची मदत मिळत होती, योजना हाती घेतल्या जात होत्या; पण तेथे क्रांती होऊन रशियाच्या बाजूचे सरकार आले तेव्हापासून परिस्थिती बदलली. अफगाणिस्तानची अलिप्तता आणि शातता नष्ट होऊन तो देश बड्या राष्ट्राच्या सत्तास्पर्धेच्या राजकारणाचे केंद्र बनला.

अलिप्त राष्ट्रांची सघटना दुबळी राहिल्यामुळेच हे घडू शकले. बड्या राष्ट्राच्या प्रभावक्षेत्राच्या आणि सत्तास्पर्धेच्या राजकारणात अडकायचे नसेल तर अलिप्त राष्ट्रानी संघटित होणे हाच एक मार्ग आहे. रशिया व अमेरिका या दोन्ही बड्या राष्ट्रानी बाजूला व्हावे. अफगाणिस्तानचा प्रश्न कसा सोडवायचा हे आमचे आम्ही पाहतो, असे बड्या राष्ट्राना त्यानी सागितले पाहिजे.

समझोत्यासाठी भारताने चालविलेल्या प्रयत्नांना मर्यादित यश आलेले आहे. रशियाने फौजा अंशत. काढून घेण्याची घोषणा केली आहे.

लष्करी बळाच्या मार्गाने हा प्रश्न सुटणार नाही. कोरिया व व्हिएटनामच्या बाबतीत आला तोच अनुभव अफगाणिस्तानच्या बाबतीत बड्याना येईल व अखेर समझोत्याच्या मार्गावरच त्यांना यावे लागेल तेव्हा समझोत्यासाठी प्रयत्न चालू ठेवायलाच हवेत. अफगाणिस्तानात खुल्या निवडणुका घेऊन प्रातिनिधिक सरकार स्थापणे आणि त्याची अलिप्तता पुन: प्रस्थापित करणे या पायावरच अखेर टिकाऊ तडजोड होऊ शकेल. ☐

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## संघ चालला पुढे !

वेळ संध्याकाळची. चिमण्याची चिवचिव थाबलेली. कोकिळा ओरडते आहे. वैशाखाचा कृष्णपक्ष चालू आहे. वसंतऋतूचा शेवटचा पंधरवडा आहे. आमच्या गल्लीत किंचित कोंदट पण मन प्रसन्न करणारा वारा वाहात आहे इतक्यात गल्लीच्या टोकाकडून अनेक मुखातून निघालेले गाणे ऐकू येऊ लागते. ते कानावर येताच 'आले आले' ओरडत घराघरातून मुले बाहेर येतात. स्त्रिया दारात येऊन उभ्या राहतात. गाणे मोठ्यामोठ्या आवाजात येऊ लागते—

हिंदुओंकी शान है
भगवान् का वरदान है
झंडा हिंदुस्थान का
झंडा भारत वर्षका ।।

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ग्रीष्मशिबिरातील ही मुले स. प. कॉलेजच्या मैदानावरून संचालन आटोपून येत आहेत. साधारण चारांच्या रांगेत, लाटा याव्यात तशी एकामागोमाग, पावले ठेक्यात टाकीत ही येतात. खाकेत लाठ्या लपेटलेल्या आहेत. खाकी विजारी, वर काळी टोपी, मान ताठ आणि नजर समोर, छाती फुगवलेली. काही तुकड्या संपूर्ण गणवेशात, काही अर्ध्या गणवेशात.

त्यांच्या शिबिराची जागा आमच्या शेजारी रेणुकास्वरूप हायस्कूलमध्ये आहे. गेले काही वर्षे हे शिबिर येथे भरत आहे. रोज सकाळ-संध्याकाळी आमच्या रस्त्यावरूनच संघाची मुले सचालनासाठी स. प. महाविद्यालयाकडे जात असतात. शिवाय शिबिरातून आम्हाला गाणी, बिगुल, बौद्धिके व बँड ऐकू येतो. या आवाजांबरोबरच भाकऱ्या-पोळ्या भाजल्याचे, भाज्याचे, वरणाचे खमंग वासही नाकात शिरत असतात. दर मे महिन्यात मी घरात म्हणतो, एकदा तरी तेथील जेवण घेण्याची 'महत्त्वाकांक्षा' आहे. माझी ती महत्त्वाकांक्षा या मे महिन्यात सफल झाली. तरुण भारत या दैनिकाचे संपादक श्री. गीत मला शिबिरात जेवणासाठी बोलवायला आले. माझ्याबरोबर बोलावलेले दुसरे पाहुणे हेरल्डचे संपादक श्री. वाघ होते. श्री. वाघ यांचे मला ठाऊक नाही; पण संघस्थानावर मी कधी गेलो नव्हतो. संघाच्या शिबिरातही पहिल्यांदाच जात होतो. माहिती करून घेण्यासाठी आम्ही तासभर आधी गेलो. शिबिरातले एक अधिकारी श्री. भिडे यांनी शिबिराची माहिती दिली. यंदा शिबिरात अकराशेसाठ मुले असल्याचे त्यांनी सांगितले. गोवा, मराठवाडा, खानदेश येथपर्यंतची मुले आली आहेत. पुण्यातली सव्वाशे आहेत. पहाटे साडेचारपासून रात्री दहापर्यंत कार्यक्रम चालू असतात. कवाईत, न्याहारी, चर्चा, भोजन, विश्रांति, बौद्धिक पुन्हा कवाईत,खेळ, रात्रीचे जेवण, कथाकथन आणि झोप, असा हा कार्यक्रम असतो. हिंदुस्थानात पंधरा हजार गावी संघाच्या शाखा आहेत. शिबिरासाठी त्या त्या विभागातील शाखातून मुलाची निवड केली जाते.

¤

संघाची स्थापना दि. १७ एप्रिल १९२६ या दिवशी झाली. या दिवशी वीस जणांच्या साक्षीने व बहुमताने संघाचे नाव 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' असे ठेवण्यात आले. त्याआधी इ. स. १९२५ च्या दसऱ्याचे दिवशी डॉ. हेडगेवार यांनी पंधरा-वीस जणाना घरी बोलावून संघ सुरू करीत आहोत असे जाहीर केले होते. हिंदुराष्ट्राचे पुनरुत्थान ही त्या मागील डॉक्टराची प्रेरणा होती. लहानपणापासून त्याची प्रवृत्ती राष्ट्रीय होती आणि ते नागपुरातले कॉंग्रेसचे एक प्रमुख कार्यकर्ते होते त्यांचा जन्म नागपूर येथेच ३१ मार्च १८८९ या दिवशी झाला आणि त्याचे संपूर्ण नाव डॉ केशव बळिराम हेडगेवार होते. त्याना डॉक्टर असेच संबोधीत. त्यांनी कधी वैद्यकीय व्यवसाय केला नाही. त्याचे सर्व आयुष्य प्रथम कॉंग्रेसचे कार्य करण्यात व नंतरचे आयुष्य संघकार्यात गेले.

डॉक्टरांनी संघ का काढला याचे कारण त्यांच्या एका टिपणीत मिळते—" महात्मा गांधी याच्या असहकारितेच्या चळवळीचा राष्ट्रात चढलेला आवेश कमी होऊन त्या चळवळीमुळे राष्ट्रात उत्पन्न झालेले दोष आपले डोके वर काढून मिरवू लागले होते. राष्ट्रीय चळवळीचा जोर कमी होऊन आपापसातील द्वेष व मत्सर हे स्पष्ट दृग्गोचर होत होते. व्यक्तिव्यक्तीतील भांडणांना ऊत आला होता.जातीजातीत भांडणे सुरू होती. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद थयथय नाच करीत होता. कोणत्याही संस्थेत एकसूत्रीपणा दिसून येत नव्हता. असहकारितेच्या चळवळीत दूध पिऊन पुष्ट झालेले यवनरूपी सर्प आपले विषारी फूत्कार सर्वत्र सोडून राष्ट्रात कलह उत्पन्न करीत होते.

ही टिपणी देऊन कै. ना. ह. पालकर यांनी आपल्या डॉ. हेडगेवार-चरित्रात म्हटले आहे, 'परिस्थितीची अशी छाननी करून डॉक्टरांनी तिचे अचूक निदान केले. या सर्व बजबजपुरीचा उगम हिंदूच्या आत्मविस्मृतीत व असंघटितपणात आहे अशा निष्कर्षास येऊन त्यांनी त्यावर उपाय म्हणून संघटनाचिकित्सा सुरू केली.'

¤

संघ निघाला त्या वेळी देशापुढे तीन प्रश्न होते. पहिला प्रश्न – इंग्रजाना कसे घालवावयाचे? दुसरा प्रश्न – मुसलमानाचे काय करावयाचे? व तिसरा प्रश्न – हिंदूमधील जातिभेद कसा नष्ट करावयाचा? या तीन प्रश्नांची एकमेकात गुतागुत होती. आता लक्षात येताय की त्यातला पहिला इंग्रजाना घालविण्याचा प्रश्न सर्वांत सोपा होता. मुसलमानांचा प्रश्न त्याहून थोडा कठिण होता; पण तिसरा हिंदूतील जातिभेदाचा प्रश्न सर्वांत कठिण होता. इंग्रज गेले! पहिला प्रश्न मिटला. पाकिस्तान झाले मुसलमानाचा प्रश्न काहीसा बाजूला झाला; तिसरा प्रश्न मात्र सतावत राहिला! महात्माजींनी एकदा संघाच्या शिबिराला भेट दिली. त्यानी विचारलेल्या प्रश्नांतही जातीचा प्रश्न होता. त्यांनी विचारले–' तुम्ही जातिभेदाची भावना कशी विसरायला लावलीत?'

या प्रश्नाला उत्तर आले, ' सर्व हिंदूत भावाभावाचे नाते आहे. हा भाव जागृत करून सर्व भेदाभेद नष्ट झाले. भावाभावाचे नाते घडण्याची किमया बोलून नव्हे तर आचरणाने घडली '

एकदा डॉ. आंबेडकरानीही अस्पृश्याच्या संदर्भात हा प्रश्न विचारला. पुणे येथील शिबिरात ते १९३९ साली आले होते व एक दिवस तेथे राहिले। त्यानी अस्पृश्यता नाहीशी झाली पाहिजे यावर बौद्धिक घेतले. डॉक्टराना ते म्हणाले,

' मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. शिबिरात अस्पृश्य किती आहेत?'

डॉक्टर म्हणाले, ' एकही नाही!'

डॉक्टर आंबेडकरानी विचारले, ' ब्राह्मण किती?'

डॉक्टर म्हणाले, ' एकही नाही!'

डॉक्टर आंबेडकरांनी म्हटले, ' म्हणजे?'

डॉक्टर हेडगेवार म्हणाले, ' येथे आम्ही सर्व हिंदू आहोत!'

डॉ. आंबेडकर म्हणाले, ' आपण इथे शिक्षण देत आहात ते योग्य पद्धतीचे आहे.'

शिबिरातले एक अधिकारी प्रल्हादजी अभ्यंकर याच्याशी बोलताना आम्हीही जातीयतेचा प्रश्न विचारला. ' संघ ब्राह्मणाचा आहे का?' प्रल्हादजी म्हणाले, ' एक आठवण सांगतो. मोहनभाई धारिया हे नाशिकच्या तुरुंगात आमच्याबरोबर होते. तेही म्हणत, ' संघ ब्राह्मणांचा आहे.' आम्ही त्याना म्हटले, ' इथे पुष्कळ स्वयंसेवक आहेत आणि सवडही आहे. तुम्हाला आम्ही गटागटाने त्याचा व्यक्तिशः परिचय करून देतो.' परिचय करून दिल्यावर त्यानी कबूल केले की ब्राह्मण जवळजवळ नाहीत!'

आम्ही त्यानंतर तो प्रश्न पुन्हा काढला नाही. कारण एक महात्माजीचा प्रश्न सोडला तर आम्ही इतर प्रश्न विचारणारेच जातीय ठरण्याचा संभव होता.

¤

संघाविषयी आम्हाला सांगताना प्रल्हादजी अभ्यंकर म्हणाले, ' मुलगा संघात येऊ लागल्यावर तो संघ विसरेल असे धोक्याचे तीन क्षण येऊन जातात. तो कॉलेजला जाऊ लागला की; तो नोकरीला लागला की; त्याचे लग्न झाले की; या तीन क्षणी तो संघाला विसरला नाही की संघाचा होतो.' प्रल्हादजी हे प्रातसंघचालक आहेत. ते खसखस पिकवीत बोलतात. ते नेवाशाजवळील नेऊरगावचे आहेत. बोलण्यात वर्तमानपत्रांचा विषय निघाला. ते म्हणाले, ' वृत्तपत्रे आपली जबाबदारी विसरतात. नको त्या गोष्टीचे–गुन्हेगारीचे ' वगैरे फ्लॅश देतात; पण कुणी दुसऱ्याचा जीव वाचविला, कुणी सापडलेली सोन्याची साखळी मालकाला परत केली, अशा घटना डोळ्याआड करतात.'

अभ्यंकरांनी आम्हाला सर्व शिबिर हिंडून दाखवले. मुलासाठी दोन खोल्यात रुग्णालयही काढले होते. स्वयंपाकासाठी आचारी असतात पण वाढण्याचे काम स्वयसेवक करतात. त्यानी तेथे चहाचीही सोय केली आहे. ' ज्या मुलाला हवा असेल त्या मुलाला स्वखर्चाने घेता येतो.' प्रल्हादजी म्हणाले, ' आता लहानथोर सर्वांनाच चहा लागतो. तेव्हा चहा प्यावयाचा नाही हा नियम काढून टाकला. तो हटवाद होईल!' ते पुढे म्हणाले, ' येथे आम्ही स्वयसेवक स्वयंसेवकांत प्रेम उत्पन्न करतोच; पण त्यांच्यात सामाजिक बुद्धीही आणतो. आपल्याजवळ तीन कपडे आहेत ज्याला एक कपडा आहे त्याला तीन कपडे असलेला आपल्यातला एक कपडा देतो. असे इथे अनेकदा घडते '

¤

डॉक्टरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काढला, त्याचे मूळ १९२१ पासून आरंभ झालेल्या मुसलमानांच्या दंग्यात आहे. खिलाफत चळवळीपासून मुसलमान सघटित झाले. त्यानतर या संघटित मुसलमानाचे भारतभर दगे सुरू झाले. मला तेवीस सालचे दंगे आठवत नसले तरी पुढचे पुष्कळ आठवतात. मला वाटते प्रत्येक देशात एक विकृती उत्पन्न होते व ती त्या देशाला खच्ची करून टाकते. आपल्या देशातला हिंदुमुसलमान प्रश्न, अमेरिकेतला गोरा–काळा प्रश्न, ब्रिटनमधील ब्रिटिश लोक व बाहेरून आलेले लोक याच्यातील तेढ, हे त्या विकृतीची उदाहरणे आहेत मुसलमान–प्रश्नापायी आमच्या देशातील केवढी शक्ती खर्च झाली आहे त्याला अर्थच नाही. त्या वेळचे चित्र तर अतिशयच चमत्कारिक होते. राष्ट्रीय चळवळीत प्रामुख्याने सर्व हिंदू होते व ते चळवळीने इंग्रजावर दडपण आणून हा देश स्वतंत्र करायला पहात होते आणि या राष्ट्रीय चळवळ करणाऱ्या हिंदूवर मुसलमान दडपण ठेवू पहात होते. त्या वेळचे सप व सत्याग्रह यांत मुसलमान अगदी क्वचितच असे. मला फक्त एक मुसलमान आठवतो. तो उर्दूत बोलावयाचा. इतर वक्ते मराठीत बोलत. त्यालाही मराठी येत होते; पण त्याने उर्दू सोडली नाही. हा गृहस्थ आगगाडीत गजकर्णाचे मलम विकून पोट भरी. एवढ्या मोठ्या मुसलमान वस्तीच्या गावात राष्ट्रीय चळवळीत आलेला हा एकच मुसलमान! त्यामुळे त्याचे सभेत कौतुक फार होई. राष्ट्रीय मुसलमानाचे देशात जे प्रमाण होते तेच आमच्या गावात होते. हा एक मुसलमान राष्ट्रीय चळवळीत आला म्हणजे गावातले सर्व मुसलमान आले असे धरून तर वक्ते बोलत. मुसलमानाचे राष्ट्रीय चळवळीत येणे इतके अपूर्व होते.

त्या वेळी आम्हा मुलात एक आवडता संकेत होता. हिंदुमुसलमानाचे कधीच जुळणार नाही, हा त्याचा निष्कर्ष असे. हिंदू शेंडी राखतो, मुसलमान राखोत नाही. हिंदू सुंता करीत नाही, मुसलमान करतो. हिंदू गाईला पवित्र मानतो तर मुसलमान तिला कापून खातो. हिंदू मूर्ती पूजतो तर मुसलमान फोडतो. अशा दोघाचे कसे पटणार? असे म्हटले जाई व ते आम्हाला पटे.

मुसलमानाची आम्हाला फार भीति वाटे यात शका नाही. मशिदीत ते शस्त्रे ठेवतात

यातही संशय नव्हता; पण एका मुसलमानाशी तेढ झाली तर सारे मुसलमान गोळा होतात; पण हिंदू मात्र कुणी येत नाही याची खंत आम्हालाच काय, पुढाऱ्यांनाही वाटे; पठाण पाहिला की मुलाची धावाधाव होई!

महात्मा गांधींनी इंग्रजाशी लढे उभारून इंग्रजांची भीती घालविली. या लढ्यामुळे हिंदूतली मुसलमानाची भीतीही काही अंशी कमी झाली यात संशय नाही; पण गावोगावचे मुसलमानाचे दंगे व अरेरावी चालूच राहिली.

हे सर्व पाहूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुसलमानाचे आपले भय जावे, हिंदूनी भेदाभेद विसरावे, एक व्हावे आणि पूर्वीचा वैभवशाली पराक्रमी भारतवर्ष पुन्हा दिसावा यासाठी डॉक्टरांनी काढला. १९४० साली डॉ. हेडगेवार स्वर्गवासी झाले. चौदा वर्षे त्यांनी संघाची संघटना अशी बांधली की मोठमोठ्या राजकीय पक्षाना ही स्वयंसेवकसंघटना आपल्यात यावी असे वाटू लागले. एक वेळ तशीच होती की संघ सीमारेषेवर उभा होता. संघ कुणाकडेही जाईल असे वाटत होते. संघनिर्माते डॉ. हेडगेवार हे काँग्रेसचे कार्यकर्ते व सत्याग्रही होते; पण हिंदुमुसलमान दंग्यामुळे ते हिंदुत्ववादाकडे झुकत आहेत असे हिंदुसभावाद्यांना वाटत होते. डॉक्टरानी संघ स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय घेतला व दोघांचा राग ओढवून घेतला. हिंदुसभावादी त्याना मठ्ठ म्हणू लागले व काँग्रेसवाले त्याना जातीय म्हणू लागले.

खरे म्हणजे ते मठ्ठ नाहीत किंवा जातीयही नाहीत. त्याचा मुसलमानद्वेष व हिंदु राष्ट्रवाद या गोष्टी कालबाह्य आहेत, इतकेच. जग पुढे जात असता त्यानी असे असू नये, हे खरे; पण दुर्दैवाने कालबाह्य समस्या काहींच्या नशिबी येतात. उदाहरणार्थ पूर्वी सासवा सुनेला छळीत. आता सुनाची जरब इतकी वाढलीय की सासूचेच आता हाल होण्याचा संभव; पण समजा या पुढारलेल्या काळात आज एखादी सासू सुनेला, पूर्वी छळत असे तशी छळत असली तर त्या सुनेला तो छळ मुकाट्याने सहन करावा लागेल. कारण या पुढारलेल्या दिवसात 'आपल्याला सासू छळते' असे एखादी सून किती ओरडून सांगू लागली तरी लोकांना पटावयाचे नाही. त्याचप्रमाणे धर्माचे महत्त्व न उरलेल्या या शास्त्रीय युगात मशिदीवरून हिंदूनी मिरवणूक नेली तर मुसलमान दंगे करतात ही गोष्ट जगाला ओरडून सांगूनही पटावयाची नाही! हिंदु राष्ट्रवाद तर नाहीच नाही!

¤

शिबिरातले दुपारचे एक बौद्धिकही ऐकले. ते श्री. ठेंगडी यानी घेतले. विषय 'आदर्श नेतृत्व' हा होता. ते म्हणाले,

संघावर खूप टीका झाली. संघाचं कसं होणार असंही विचारलं जातं; पण संघ स्पर्धेत नाही. संघाचा चढउतार संघ स्वत: मॅनेज करतो. संघाला सत्ता नको आहे. सत्तेच्या स्वर्गात जाणारे तेथे उपभोग घेतात. उपभोगाने त्यांचे पुण्य क्षीण होते. क्षीण पुण्य झाले की ते परत आपल्या कॉन्स्टिट्युएन्सीमध्ये येतात (हशा). आदर्श नेतृत्व कोणते याची कल्पना हवी. संघटना बांधली पण आदर्श नेतृत्व नसेल तर ऑपरेशन सक्सेसफुल पण पेशंट डेड अशी अवस्था होईल'. (हशा)

नेतृत्वाचे त्यानी दोन प्रकार केले. एक अहंकारी व दुसरे अहंपणा विसरणारं, स्वत:ला विसरणारं. प्रसंगानं उत्पन्न होणाऱ्या नेतृत्वाची उदाहरणं त्यांनी दिली. मॅनहोलमध्ये मुलगा पडतो. सगळे फक्त ओरडा करतात. एक साधा माणूस पुढे उडी घेतो. त्या मुलाला काढतो. अब्राहम लिंकनची डुक्कर चिखलातून काढल्याची व महात्माजींची आफ्रिकेतील शिग्रामगाडीची कथा त्यानी सांगितली. थोर प्रेरणा असलेले हे पुढारीपण होते. शेवटी ते म्हणाले डॉक्टर हेडगेवार स्वत: संघस्थान स्वच्छ करावयाचे. त्याना सेवेत कमीपणा वाटला नाही.

¤

लिंकन व महात्माजी याच्या गोष्टींबरोबर डॉ. हेडगेवाराचा संघस्थान झाडण्याचा प्रसंग ठेवणे यात संघाच्या लोकाचा भाबडेपणा दिसेल; पण खरोखरीच संघाचे लोक अनेकदा, अत्यंत भाबडे किंवा साधे वाटतात. मुलाना साध्यासाध्या गोष्टी पुन्हा पुन्हा विस्ताराने सांगणे हे संघवाल्यास फार महत्त्वाचे वाटते. लहान लहान आचारांचे त्याना अतिशय महत्त्व वाटते. त्यांतूनच व्यक्तित्व बांधले जाते, असे ते म्हणतात. संघाचे लोक मैत्री, शेजारपण, एकमेकांस मदत, ध्वजाचा रंग, आकार अशाबद्दल बोलतात. तुसडा वागणारा पुढारी कितीही मोठा असो, तो त्याना आवडत नाही. म्हणून डॉ. हेडगेवार आलेल्या प्रत्येकाला चहा दिल्याशिवाय कसे जाऊ देत नसत व प्रसंगी घरात चहा, साखर, दूधही नसे तेव्हा हळूच मागच्या दाराने ते कसे आणावे लागे हे प्रसंग अतिशय प्रेमभराने सांगतात. संघात या गोष्टींना महत्त्व का दिले जाते हे सांगताना तरुणभारतचे माजी संपादक श्री. गीत मला म्हणाले,

"एक माणूस दुसऱ्या माणसाशी बोलू शकतो तोपर्यंत संघ बंद होणार नाही. संघात परस्पर परिचय असतो. त्यात तुमची घरची माणसे, परिस्थिती, मित्र, व्यवसाय, नोकरी, अडचणी, आवडीनिवडी सर्व एकमेकाचे एकमेकाला सांगितले जाते. रोजरोज माणसे जवळ आली की मने जुळतात. एखाद्याला वादानं जिंकता येईल; पण म्हणून प्रेमाचे संबंध उत्पन्न होत नाहीत. घरे जोडण्यावर संघाचा भर असतो. एकमेकाच्या अडचणी व आजारीपण यात धावून जाणं ही जवळीक कुणाही संघटनेला जमली नाही. संघात आम्ही चांगल्या आचरणाबद्दलच जास्त सांगतो. तत्त्वज्ञानाचे डोस कमी!"

¤

तेव्हा चांगला नागरिक तयार करणे हे संघाचे काम भाबडे वाटले तरी बरोबर असण्याचा संभव आहे याचा विचार व्हावा. आज मैत्रीची भावना, संकटात धावून जाणं, सेवाभाव, सरळ व्यवहार, काटकसर, निर्व्यसनीपणा, राष्ट्रप्रेम या गोष्टी नाहीशा होत आहेत. भारतात कम्युनिझम क्षितिजापलीकडे केव्हाच गेला. सर्वोदय क्षितिजाखाली बुडाला, राजकीय पक्षात निष्ठा उरल्या नाहीत. मुलाना चांगले वळण लागण्याची व जीवनास चांगली दिशा लागण्याची आशा जात चालली आहे. अशा स्थितीत संघ मुलांना चांगले वळण लावण्याचा प्रयत्न करतोय एवढी गोष्टही लोकांना संघाकडे आकृष्ट करायला पुरी होईल. संघ जातीय आहे की हुकूमशहा आहे असा विचार लोक करणार नाहीत. राजकीय पक्षातील बेदिली गेली नाही व लोकांना काही नवी श्रद्धा मिळाली नाही तर, आजच्या दिवसात पंधरासे तरुणाचे शिबिर शांतपणे पार पाडू शकणाऱ्या संघाला लोक जवळ करतील. ☐

# गाझा ते गॅलिली

## लेखांक चौथा । राजू पटवर्धन

### पाव एकर शेती, ६५ वर्षाची वृद्धा, सहज पंचवीस हजार रुपयांची प्राप्ती

'शालोम!' दिलखुलास हसून शेल्टरबाईंनी कफार मोनाश या मोशाव्हमध्ये आमचं स्वागत केलं. हे मोशाव्ह सुरू होऊन यंदा तीस वर्षं पूर्ण झाली आहेत. शेल्टर पती-पत्नीचं कुटुंब ह्या मोशाव्हमधल्या १०५ कुटुंबांपैकी एक आहे. मोशाव्हच्या खाक्याप्रमाणे शेल्टर कुटुंबाचं स्वतंत्र छोटं शेत आहे. त्याचा मुख्य धंदा म्हणजे गोपालन.

शेल्टर पती-पत्नीकडे इस्राइली फ्रीजिएन जातीची १६० काळी-पांढरी जनावरं आहेत. या गाईंचं सर्वच मजुरी, लिखापट्टी, व्यवस्थापन, धारा काढणं, दूध नेऊन घालणं इत्यादी कामं ती दोघं करतात, एवढं सांगितलं तरी त्यात विशेष वाटणार नाही. कारण इस्राइलमध्ये अशी शेकडो कुटुंबं आहेत. आश्चर्य वाटण्यासारखं आहे ते त्यांचं वय. श्री. शेल्टर हे ७० वर्षांचे आहेत, तर सौ. शेल्टर ६६ वर्षांच्या आहेत.

'कधीही आलात—आणि नक्की या बरं!—तरी सकाळी १० ते १२ याच वेळात या, कारण नाही तर मी सतत कामात असते, कामाच्या वेळेला तुम्ही आलात तर मला बोलणं अशक्य असतं.' हे शेखरबाईंनी आधीच आम्हाला कळवलं असल्यामुळं आम्ही बरोबर ११ वाजता एका सकाळी त्यांचं गोसंवर्धन बघायला गेलो.

श्री. शेल्टर याना हिब्रूशिवाय दुसरी भाषा येत नसल्यामुळं ते 'शालोम' म्हणून गाईंच्या तैनातीला गेले. बाईंना इंग्लिश भाषा पन्नास टक्के तरी येत असल्यामुळं त्यांच्याबरोबरच सर्व संभाषण झालं.

रोज पहाटे पाच वाजता पती-पत्नी उठतात. गोठा, गव्हाण साफ केल्यानंतर आंबोण देतात. इस्राइलमध्ये गोठ्यातलं शेण हिवाळ्यात ३-४ महिने काढतच नाहीत! कारण त्या शेणाची ऊब म्हणे गाईंना बरी वाटते. अर्थात गाई तीन तीन फूट शेणात जणू तरंगतच असतात. हे दृश्य मोठे नयनरम्य दिसत नाही; पण माशांचा त्रास नसल्यामुळं हे चालू शकतं. गाईंना आंबोण दिल्यानंतर 'मिल्किंग पार्लोर' या यंत्र दालनात नेलं जातं. एका वेळेस ६ गाईंची धार निघू शकेल एवढी यंत्र-सामग्री शेल्टर यांच्याकडे आहे एकूण १६० जनावरांपैकी १०० दुभत्या गाई होत्या. बाकीच्या कालवडी आणि बीफ (मास) साठी वाढवलेले खोड आहेत. १०० दुभत्या गाईंपैकी ४० गाई आटलेल्या होत्या. ६० गाईंची धार बरोबर एक तासात मशीन काढतं. ६० गाईंचं मिळून एका वेळेला एक हजार लिटर दूध आलेलं दिसलं.

लागलीच शेल्टर आपल्या ट्रॅक्टरवरून सगळं दूध स्टेनलेस स्टीलच्या एका मोठ्या हंड्यातून आपल्या मोशाव्हच्या सहकारी संकलन केंद्राला पोहोचवतात. 'कफार मोनाश' हे गाव अगदी छोटं असल्यामुळं कुणाच्याही घरापासून संकलनकेंद्र १-१॥ किलोमीटर दूर नसतं.

श्री. शेल्टर दूध घालून येतात, तोपर्यंत इकडे कोणत्या गाईंनी माज केला आहे हे बघून सौ. शेल्टर यानी त्या गाईंना बाजूला काढलेलं असत. कारण रोज ९ वाजता 'इस्राइल गोपालक संस्थे'चा कृत्रिम रेतन-तंत्रज्ञ त्याच्या रोजच्या वेळापत्रकाप्रमाणे त्यांच्याकडे येणार असतो. त्याचं काम झाल्यावर श्री. शेल्टर ट्रॅक्टरनं गवताचे गठ्ठे काढून गाईंना खायला घालतात. मग लागलीच शेतात जाऊन ओली वैरण कापून आणून ठेवतात. कोरडं गवत खाऊन संपलं असेल, तर ओली वैरण. (यामध्ये गहू, ज्वारी, मका, लूसर्न हेच प्रामुख्याने प्रकार आहेत.)

एवढं होईतो एखादी गाय व्यायला आलेली असते. तिचं वासरू बाहेर आल्यानंतर त्याची व्यवस्था लावण्यात एखादा तास जातो. मग जेवण. जेवण होतंय, तोवर सहकारी संस्थेचाच पशुवैद्य येतो. किती गाई गाभण आहेत, कुणाला काही होतंय का—ही चौकशी करून तो जातो. दुपारी जरा विश्रांतीला टेकतात, तोच परत वैरण, स्वच्छता, आंबोण, दूध इत्यादी चक्र परत सुरू होत ते रात्री ८ वाजेपर्यंत.

त्याचा मुलगा तेल-अव्हिव्हला नोकरी करतो. मुलीचं लग्न झालेलं आहे. आता त्या दोघांशिवाय त्यांच्या फार्मवर कोणीही नाही. 'पती-पत्नींपैकी एक जण आजारी पडला तर काय होईल?' या माझ्या प्रश्नाचं उत्तर 'सहसा आम्ही कधीच आजारी पडत नाही' इतकंच हसून त्यानी दिलं. मोशाव्हमध्ये 'कामाला गडी' ही संस्थाच नाही. स्वतः मजुरी करणं हेच मुख्य. माझ्या अंदाजे हे कुटुंब वर्षाला जवळजवळ ५०००० रुपये मिळवत असावं.

दररोज बारा तासांपेक्षा जास्त काम करणं हे मोशाव्हच्या सभासदांना बाळकडूच आहे. तेवढे काम केलं नाही तर पैसाच नाही; पण तेवढं काम केलं तर पैसा आहे अशी दुहेरी खात्री असल्यामुळंच शेल्टरसारखे हजारो मोशाव्हनिवासी इतके कार्यक्षम आहेत.

'सहकारी वस्ती' हे मोशाव्हचं सर्वार्थानं भाषांतर होईल. आज इस्राइलमध्ये सुमारे ३८० मोशाव्हिम (हे अनेक वचन) आहेत.

त्यांच्यात जवळजवळ १,३५००० लोक राहतात. (म्हणजे एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५॥ टक्के.) गावात सर्वत्र हिरवीगार वनश्री, सुदर, टुमदार, मोकळी मोकळी, स्वतंत्र पण एकसारखी घरं. प्लॅस्टिकच्या घरात फुललेले गुलाब, कविशन, हस्कस इत्यादी वनस्पतीची शेतं, शंभरएक फ्रिजियन गाईंचे कळप, मध्यभागी दूध-संकलनकेंद्र, दवाखाना, शाळा, सभागृह, कचेरी इत्यादी सार्वजनिक सोई; स्वच्छ, सुरेख रस्ते–अशा वर्णनाची ही ३८० मोशाव्हिम सर्वत्र इस्राइलमध्ये तुमचं स्वागत करतील. तिथे दिसणारे कार्यरत नागरिक, समृद्धी, खाजगी, वैयक्तिक मालकी असल्यामुळं दिसणारी वैयक्तिक गुतणूक आणि आनंद–यामुळे 'मोशाव्ह' हा प्रकार मला तरी फार आकर्षक आणि अनुकरणीय वाटला.

'आपण भारतातही अशी मोशाव्हिम का चालू करू नयेत?' असा प्रश्न इस्राइलला गेलेल्या प्रत्येक भारतीयाच्या मनात येतो. 'सहकार' आपला फार प्रिय विषय असल्यामुळं 'मोशाव्ह' तत्त्व अगदी प्रलोभनीय वाटतं; परंतु जरा पाहणी केल्यावर असं दिसतं की, इस्राइलमधल्या 'मोशाव्हिम'चं यश हे काही विशिष्ट ऐतिहासिक प्रक्रियेमधून आणि अगदी दुर्मिळ अशा आर्थिक, सामाजिक कारणविशेषामध्ये सामावलेलं आहे. असा घटकसमुच्चय इतर देशात असण्याची–विशेषत: भारतात–शक्यता जवळजवळ नाहीच.

पहिली गोष्ट म्हणजे मोशाव्हमधली भौगोलिक जवळीक. स्वातंत्र्य मिळण्याआधी (१९४८ आधी) अरब आणि निसर्ग या दोन शत्रूंच्या भीतीमुळे पहिले वसाहतवाले एकत्र, छोटया छोटया वस्त्या करून राहू लागले. दैनंदिन व्यवहारामध्ये एकमेकांना मदत केल्याशिवाय आपल्याला राहणंच अशक्य आहे हे त्याना कळून चुकलं. १९४८ पर्यंत ब्रिटिश सरकारचं राज्य असल्यामुळं बाजारपेठा निर्माण करण्यासाठी, वितरण-व्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि पतपुरवठयासाठी सरकारची मदत जवळजवळ नव्हतीच. यामुळ वसाहतवाल्याना एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर बाजारात माल खपवण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. जगभरचे ज्यू लोक मदत पाठवीत असले, तरी ती मदत कशी वापरली जाते आहे याकडे त्यांचं सतत लक्ष होतं. याखेरीज वसाहतवाल्याना दोनच गोष्टी समान होत्या–धर्म आणि भाषा! यामुळं इतर गोष्टीत जमवून घ्यावंच लागलं. या सर्व कारणविशेषांमधून सहकाराचं वातावरण लोकाच्या अंगी भिनलं.

१९४८ नंतर इस्राइलचं स्वतंत्र सरकार आल्यानंतर परिस्थिती खूप अनुकूल होती. दूध, भाजीपाला यांनी बाजारपेठ वाढत होती. देश लहान होता आणि भाषा एक होती. (हिब्रू भाषा अर्थात् सगळयाना आलीच पाहिजे हा इस्राइलनं प्रथमपासून हेका धरल्यामुळं खूप प्रश्न सुटले. विविध जमातीचे, देशांचे, जातीचे ज्यू. लोक इस्राइलमध्ये आले होते, ते आपोआप जवळ आले. मात्र आज मला खूप इस्राइलीच्या बोलण्यात असं दिसलं की, इंग्लिशकडे दुर्लक्ष केलं ही चूक आता इस्राइलला फार भोवते आहे. कारण नवं तंत्रज्ञान सगळं इंग्लिशमध्ये आहे. ते मिळवण्यासाठी आणि वाढता निर्यात व्यापार टिकविण्यासाठी इंग्लिशचं महत्त्व फार आहे. तिथे आता इस्राइलची बाजू लंगडी पडतेय.) यामुळे शेतीत काय पिकवायचं आणि किती पिकवायचं हे पहिल्यादाच सरकारला निश्चित करता आलं.

## नियोजित वसाहती

मुख्य ध्येयं ठरली. मग एकूण जमीन किती, तिचा किती भाग शेतीसाठी घेता येईल हे ठरवलं गेलं. मुख्य म्हणजे ही जमीन रिकामी होती. शतकानुशतकं दुर्लक्ष झाल्यामुळं पडीक होती. दुसरं म्हणजे काही ठिकाणी अरब लोक त्यांच्या जमिनी सोडून गेले होते. यामुळे फार महत्त्वाचा फायदा झाला की, एकदा एका मोशाव्हच्या मर्यादा ठरवल्यावर पाहिजे तसे जमिनीचे तुकडे करता आले. आपण 'टाउन प्लॅनिंग'बद्दल किती बोलतो; पण आपल्याकडे सरळ रस्ते, चौकोनी शेतं, एकसारखी घर, एके ठिकाणी सार्वजनिक सोई यापैकी काहीच दिसत नाही. कारण 'टाउन' हे गेली अनेक शतकं आहेच. तिथे 'प्लॅनर'ला वावच नसतो. इस्राइलमध्ये कसं झालं, ५०० एकर, १००० एकर काही विशिष्ट आकार ठरवून गावाची रचना झाली.

एकदा आकार ठरवल्यानंतर, किती कुटुंबाना तिथे जागा द्यायची ते ठरलं. मग मध्यभागी सर्व सार्वजनिक सोई आणि मग सार्वजनिक सोईंच्या जागेचा मध्यबिंदू कल्पून त्रिज्यांवर रस्ते, त्या रस्त्यांवर सगळयाना सारख्या आकाराची घरं आणि शेतं अशी आदर्श रचना करता आली. यामुळे मोशाव्हचा कुणीही सभासद केंद्रीय सुविधांपासून दूर राहिला नाही. यामुळे सर्वांचा वाहतूकखर्च कमी झाला.

पुढे सरकारनं असं धोरण ठेवलं की, नवीन आगमन झालेल्या देशांतरित रहिवाश्यासाठी, शक्यतो ज्याची पूर्वी कधीही शेती नव्हती, अशांनाच शेतीत म्हणजे मोशाव्हिममध्ये घालायचं. यामागची भूमिका अशी की, शेतकरी हा जात्याच आडमुठा असतो. 'आपलंच खरं' अशी त्याची दृढ समजूत असते. यामुळें नवी तंत्र तो सहजासहजी स्वीकारत नाही. इथे कुणालाच शेती माहीत नसल्यामुळे अमेरिकन शेती-सल्लागारांनी शिकवलेली तंत्रं मोशाव्हिम शेतकऱ्यानी न बोलता स्वीकारली आणि आत्मसात केली.

प्रत्येक सभासदाला हवं ते कर्ज आणि जमीन, घर, अवजारं हे सर्व सरकारनं ५० वर्षांचं करारपत्र करून घेऊन दोन टक्के व्याजानं दिलं. (सध्या इस्राइलमध्ये भाववाढ १२० टक्के आणि व्याजाचा दर सहासष्ट टक्के आहे हे लक्षात घेता सरकारनं मोशाव्ह-सभासदांना सर्व फुकटच दिलं असं म्हणायला हरकत नाही.) प्रत्येक सभासदाला त्याच्या मालमत्तेची संपूर्ण मालकी दिली मात्र त्यानं स्वत:च शेतकी-उत्पादन आपल्या मोशाव्हच्या वतीनंच सहकारी पद्धतीत विकलं पाहिजे हे बंधन त्याच्यावर आलं. अर्थात् या बंधनाची दुसरी बाजू ही की, त्या शेतकऱ्याला हा दिलासा मिळाला की, आपला सगळा माल आपलं मोशाव्ह घेणारच. पुन्हा वाहतूक, भाडार, घाऊक खरेदी, संस्थेची पत आणि तीमुळे मिळालेली आर्थिक हमी–या सर्व सोयी सहकारी तत्त्वावर सुरू करता आल्या. यामधूनच प्रत्येक मोशाव्हची विक्रीव्यवस्था उभी राहिली.

हे सर्व झाल्यावर इस्राइल सरकारनं एक फार मोलाची आणि महत्त्वाची गोष्ट केली–ती म्हणजे यानंतर मोशाव्हिमना मोकळं सोडलं! त्याचा दैनंदिन कारभार, सुविधांचं व्यवस्थापन, आर्थिक परिस्थिती, दूरगामी नियोजन, स्थानिक पंचायत–या सर्व बाबतीत सपूर्ण जबाबदारी मोशाव्ह-सभासदांवर सोडली. त्याना पूर्ण स्वातंत्र्य दिलं. यामधूनच आज आपल्याला शेतकऱ्यांची, शेतकऱ्यानी चालव-

लेली अशी यशस्वी मोशाव्हिम दिसतात. कोणतीही गोष्ट खरेदी करायची असो, मोशाव्हचं दुकान आहे. मुलाना शाळेत घालायचं असो, शाळा आहे. कर्ज पाहिजे, त्याला हमीदार पाहिजे, सहकारी संस्था आहे. एकीकडे ही सामाजिक सुरक्षितता व हमी आहे, तर दुसरीकडे स्वत.ची घरं, शेती, स्वत.चं कुटुंब इत्यादी व्यक्तिगत स्वातंत्र्य अबाधित आहे.

'मोशाव्ह्'च अंतर्गत स्वातंत्र्य राबवण्यासाठी लोकशाही तत्त्वावर आधारलेली पंचायत उभी असते. (Association) दरवर्षीची सर्वसाधारण सभा होते, त्यामध्ये प्रत्येक वर्षी १५ ते २० जणाची प्रातिनिधिक सभा (Council) निवडली जाते. ही सभा नंतर आपल्यामधून कार्यकारी मंडळ (Executive) निवडते. प्रातिनिधिक सभा, शिक्षण, सांस्कृतिक, सहकारविषयक इत्यादी समित्या निवडते, अंदाजपत्रक सादर करून त्याला सर्वसाधारण सभेची मान्यता घेते.

सर्व आर्थिक धोरण स्वत: मोशाव्हचे सभासदच ठरवतात. नफातोटा इत्यादीची जबाबदारी सभासदांवरच राहते. पूर्वी (१९७७ आधी) इस्राइलमध्ये मजूर पक्षाचं सरकार असताना शेती मालाला खूप आर्थिक साहाय्य होतं. आता बेगीन याच सरकार हे 'खास' (Classical) भांडवलशाही असल्यामुळे 'मोशाव्हिम'ची सर्व आर्थिक मदत त्यानी बंद केली आहे. याचा मला दिसलेला एक परिणाम म्हणजे इस्राइलच्या इतिहासात अपूर्व असा ३०००० शेतकऱ्याचा इस्राइलच्या लोकसभेवरचा मोर्चा! हे असलं तरी, मदत बंद केल्याचा एकूण फायदाच झाला आहे. कारण त्यामुळं अंतर्गत आर्थिक व्यवस्थेला शिस्त आली आहे. जिथे आर्थिक अपव्यवहार होते (उदाहरणार्थ, संचालक मंडळाने स्वत.च कर्ज घेऊन ती बुडवणे आणि वसुली मात्र सर्व सभासदावर लादणे!) ते वेशीवर टांगले जाऊन बँकानी त्या गावाना कर्जपुरवठाच बंद केला. आर्थिक सुबत्ता आणि दिवाळखोरी या दोन्ही अवस्थामध्ये दूर राहण हे बगीन सरकारचं तत्त्व आहे.

दैनंदिन कारभारामध्ये सरकारनं जरी ढवळाढवळ केली नाही, तरी इस्राइल सरकारनं मोशाव्ह-चळवळ दीर्घकालपर्यंत सुयोग्य अशा तत्त्वावर उभी राहण्यासाठी उत्कृष्ट कायदे केले आहेत. त्यापैकी पहिला म्हणजे जमिनीचे तुकडे करायला संपूर्ण बंदी! शेताचा मालक वारल्यानंतर जमिनीचा वारसा-हक्क एकाच कोणत्या तरी मुलाला किंवा मुलीला मिळणार. मग त्याला दोन-तीन मुलगे असतील, तर त्यानी आपसात ठरवून एकालाच तो हक्क द्यायचा. इतर जणानी दुसरा व्यवसाय पत्करावा किंवा शेतीच हवी असेल तर एखाद्या नव्यानं चालू झालेल्या मोशाव्हमध्ये सभासदत्व घ्यावं. कोणत्याही परिस्थितीत जमिनीच विभाजन होणार नाही.

कफार मोनाशमध्ये याबद्दलचं एक मजेदार उदाहरण दिसलं. पामेराण्टझ् या अमेरितून १९५० साली इस्राइलला येऊन स्थायिक झालेल्या गृहस्थाच. त्याना दोन मुलगे आहेत. दोघानाही मोनाशमध्येच राहायचय् आणि शेतीच करायचीय्. कसं जमायच हे? पण त्याच्या थोरल्या मुलानं हा प्रश्न सोडवून टाकलाय्. त्यांच्या जवळच राहणाऱ्या एका सुंदर युवतीशी तो विवाहबद्ध झालाय्. त्याची पत्नी म्हणजे तिच्या आई-वडिलाचं एकमेव अपत्य असल्यामुळे शेतीचा वारसा तिलाच मिळाला. धाकटे पोमेराण्टझ् शांतपणे घरजावई झाले आहेत! सर्वच उद्देश सफल.

दुसरा कायदा असा आहे की, ५० वर्षाचं करारपत्र करायचं ते मोशाव्हच्या नावानं करायचं, म्हणजे मालकाला त्याचा जमीनजुमला त्रयस्थाला विकताच येणार नाही. त्याला सोडून जायचंच असेल, तर मोशाव्हच्या संमतीनं दुसरा सभासद आल्यावर मगच राजीनामा देता येईल. बरं, मोशाव्हलाही जमीन विकता येणार नाही. कारण मालकी इस्राइल सरकारचीच राहणार, फक्त कसायला दिली इतकंच.

तिसरा कायदा म्हणजे इस्राइलमधली सर्व जलसंपत्ती ही सरकारी सार्वजनिक मालकीचीच राहणार. बारमहा गोड्या पाण्याचा इस्राइलचा एकमेव जलाशय म्हणजे गॅलिली सरोवर. हे आहे समुद्रसपाटीखाली ४५० फूट. तिथून पाणी वर उचलून 'राष्ट्रीय जलवाहकांतून' (National water Carier म्हणजे सहा ते सात फूट व्यासाचे पाइप, उघडे कालवे, कृत्रिम जलाशय, धरणं आणि बोगदे इत्यादी स्वरूपात असलेली १३० किलोमीटर लांबीची मालिका, संपूर्ण राष्ट्राला पुरवले आहे. सगळ्या मोशाव्हना, घराना, शहराना ह्या वाहकातूनच पाणी घ्यावं लागत. खाजगी जलउपसा योजनाना बंदी आहे. जिथे राष्ट्रीय वाहकाचे पाणी उपलब्ध होणे अशक्य आहे, तिथे मात्र विहिरी खणायला खास परवानगी दिली जाते.

एका मोशाव्हमध्ये प्रत्येक सभासदाला दिलेली जमीन समान असते. मात्र वेगवेगळ्या मोशाव्हीममध्ये हे प्रमाण वेगळे असू शकते. सर्वसाधारणपणे २ एकर ते ४ एकर एवढी जमीन प्रत्येकाला मिळते. ही जमीन कधीही वाढणार नाही, हे पक्के माहीत असल्यामुळे आहे तेवढ्याच जमिनीत जास्तीत जास्त नवीन तंत्र वापरून आणि गुंतवणूक करून उत्पन्न वाढवण्याकडे सभासदाचा कल असतो. यामध्ये ज्या यशोगाथा आहेत त्या विस्मयकारक अशाच आहेत.

नेतान्याजवळच्या एका मोशाव्हमधल्या व्हिटकनच्या मिसेस् मालका यांचे उदाहरण घेऊ. त्याचे यजमान आणि त्या याच्यात मिळून २ एकर जमीन आहे. त्यातली ⅛ जमीन म्हणजे १ 'दुनाम,' म्हणजेच पाव एकर त्याच्या स्वत.कडे आहे. मालकाबाईचे वय आज ६५ वर्षांचे आहे. त्या त्याच्या पाव एकराचे सर्व काम स्वत: स्वहस्ते करतात. एका दिवशी फार तर सगळा मिळून तीन तासाचा वेळ त्या शेतीत घालवीत असतील. त्याचा पाव एकर म्हणजे एखादी स्वप्नसृष्टी वाटावी अशी चीज आहे. संपूर्ण पाव एकरावर प्लॅस्टिकचे आच्छादन आहे–प्रखर उष्णता आत जाऊ नये म्हणून आणि दिलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होऊन ते वाया जाऊ नये म्हणून हे आच्छादन सर्व बाजूनी असले, तरी त्याच्या काही बाजू गुंडाळून आत हवा खेळवता येते. आत गेल्यावर दिसतात ते जवळजवळ अडीचशे ॲल्युमिनियमचे ६ इंच व्यासाचे उभे खांब आणि त्यावर वरून थेंब थेंब (ड्रिप इरिगेशन) पाणी देण्यासाठी केलेले पाइपाचे जाळे. या खांबामध्ये पाण्याचा निचरा जलद व्हावा म्हणून ज्वालामुखीच्या उद्रेकातून निर्माण झालेली खडेयुक्त माती आणि शणखत याचे मिश्रण भरलेले आहे. खांबामध्ये खाचा पाडून त्यामध्ये काकड्याचे वेल लावले आहेत. खांबाचाच भाग उघडा असल्यामुळे तण वगैरे येण्याचा प्रश्नच नाही. पाण्याबरोबरच मिसळून ड्रिपच्या नलिकातून खत दिलेले आहे. पाणी आणि खत याचे मिश्रण ठरावि[illegible]

म्हणून एका मिनि-कॉम्प्युटरची योजना आहे. 'कॉम्प्युटर' म्हणजे एकदम 'वर' चे प्रकरण वाटले, तरी हे तसे नाही. ह्या कॉम्प्युटरची किंमत फक्त ३०० डॉलर आहे (जवळजवळ २५०० रुपये). ह्या सर्व मेळामधून प्रत्येक वर्षी चार वेळा पीक काढून वर्षात मालकाबाईंना जवळजवळ आठ हजार किलो काकडी मिळते. इस्राइलमधल्या सध्याच्या किंमतीमानाप्रमाणे त्याना कमीत कमी पंचवीस हजार रुपये सहज मिळत असतील. प्लॅस्टिक, बिया, खत, कॉम्प्युटर सगळे त्यांच्या मोशाव्हतर्फेच त्यांनी खरेदी केले आहे.

असेच थक्कच करणारे शेत आहे मोनाशच्या जॉन व्हिटुलीचं. त्याचे पाव एकर गुलाब आहेत. प्लॅस्टिकच्याच आच्छादनात एवढ्या जागेत प्लॅस्टिकच्या पिशव्यात खेटून ७००० झाडे लावली आहेत. इतक्या झाडाना रोज फक्त १ घनमीटर पाणी आणि २०० ग्रॅम २०:२०.२० (N:P:K) खत 'ड्रिप' मधून तो देतो. तपमान १७ अंश सेल्सिअस सतत राखले जाते. यासाठी हिवाळ्यात डिझेल हीटर्स वापरावे लागतात. इस्राइलच्या युरोपियन सामूहिक बाजारपेठेबरोबर झालेल्या करारानुसार नोव्हेंबर ते एप्रिल हे सहाच महिने इस्राइलची फुलें युरोपमध्ये विकता येतात. या सहा महिन्यात जॉन जवळजवळ दोन लाख फुले काढतो. रोज सकाळी तो येतील ती फुले काढतो, त्याचे पॅकिंग करतो व स्वतःच्या शीतागारात ठेवून देतो. ठरल्या वेळेला सहकारी संस्थेचा ट्रक येऊन सगळ्यांचे गुलाब बेन गुरियन विमानतळावर घेऊन जातो. फुले काढल्यापासून २४ तासाच्या आत युरोपमधल्या फुलाच्या व्यापाऱ्याच्या दुकानात विक्रीला हजर होतात.

व्यापारी दृष्टी ठेवली की कशाचाही पैसा कसा होतो ह्याचे उदाहरण म्हणजे मोशाव्हमध्ये अलीकडे निघालेली 'हस्कस' ह्या वनस्पतीची शेते. हे 'हस्कस' म्हणजे मला तर अगदीच भिकार झुडुप वाटलं. त्याचा एकच विशिष्ट गुणधर्म आहे तो म्हणजे ते सहा महिने हिरवे राहाते बस्स! पुष्परचनासाठी ते फारच योग्य नाही का? मग ते युरोपमध्ये विकावे–तिथे अशी फॅड्स् खूप आहेत. मला खूप मोशाव्हिममध्ये विचारायचे, भारतात असले काही तरी तुम्ही का नाही लावत? तुमच्याकडे जमीन, पाण्याला तर काही तोटा नाही. याला उत्तर ! मोशाव्हस्तंत्र दुर्लभः!

## दापचरी प्रयोग

आता थोडं विषयांतर करून आपल्याकडे 'मोशाव्हवजा जो प्रयोग मी गेल्या वर्षी पाहिला, त्याबद्दल थोडं तुलनात्मक वर्णन करण्याचा मोह आवरत नाही. हा प्रयोग म्हणजे पालघरजवळचा 'दापचरी दुग्धप्रकल्प.' भारतामध्ये न दिसून येणाऱ्या अनेक अनुकूल गोष्टी इथे होत्या. भूमिहीन आणि निवृत्त माजी सैनिकासाठी सरकारने समान जमिनी, गाई, घर इत्यादी सवलती कर्जरूपाने दिल्या. 'भौगोलिक जवळीक' आणि समान धंदा ह्या भारतात जवळजवळ अशक्यच गोष्टी इथे निर्माण झाल्या. बरोबर सहकारी दूधसंस्था सरकारने काढून दिली. ट्रक्सचा ताफा, इमारतीच्या रांगा, गुदामे इत्यादी साम्राज्य निर्माण झाले. इतके सगळे असून हे भारतीय मोशाव्ह आज इतक्या दयनीय अवस्थेत आहेत की बोलायची सोय नाही! तिथले रहिवासी 'कधी हे सरकारचे कर्ज फेडतो न् पळून जातो' अशी भाषा करतात. संकरित गाई तिथल्या म्हणजे तशा सुमारच आहेत हे असे का झाले? इस्राइलमध्ये हजारो 'दापचऱ्या' छान चालतात आणि इकडे आपला एकमेव प्रकल्प फसतो असे का? याचे उत्तर एवढेच आहे की मोशाव्हिममध्ये जी स्वायत्तता अभिप्रेत आहे, ती दापचरीला नाहीच. मोशाव्हमध्ये शेतकरी हा कर्ता आहे, तर दापचरीला सरकारी अधिकाऱ्याच्या *नियमात बसणे हेच त्याचे काम झालेय्. मोशाव्हमध्ये शेतकरी स्वतः* सहकारी संस्था मालक म्हणून चालवतोय्, तर इथे सर्वसाधारण नोकरशाहीचा एक विभागच इतर हपिसांप्रमाणे हे एक चालवतो आहे. मोशाव्हमध्ये दोन टक्के व्याजाने ५० वर्षांचे कर्ज आणि तयार जमीन, ट्रॅक्टर सर्व सभासदांना मिळाले. दापचरीला 'फुकट' ची सरकारी जमीन लागवडीखाली आणण्याच्या अवस्थेपर्यंत आणायला सभासदाचे इतके पैसे गेले की ती विकतच पडली. सरकाने कर्ज असं दिलेय की ते फिटणे जवळजवळ अशक्यच आहे. तर मोशाव्हमधून आपल्या सरकारला घेण्यासारखे एवढेच आहे की, सरकारीकरण हे कसलेही होऊ न देणे!

'माझे घर,' 'माझे कुटुंब' 'माझे शेत' अशा व्यक्तिप्रधान कल्पनांमध्येच मोशाव्हिमचं यश आहे, तर सामुदायिक मालकी, सामुदायिक भोजनगृह, सामुदायिक मनोरंजन इत्यादी सामूहिक कल्पना भोवती केन्द्रित असलेले 'किबुट्झ्' *आहे. समाजवादाचे प्रयोग म्हणून* दोन्हीकडे पाहिले तर मोशाव्हमधला समाजवाद हा व्यक्तिप्रधान तर किबुट्झ्चा समाजवाद हा समुदाय–प्रधान (म्हणजे कम्युनिझमला जास्त जवळचा) आहे.

इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, इस्राइली लोकाचा 'मोशाव्ह' किंवा 'किबुट्झ' याच्यातला समाजवाद किंवा साम्यवाद हा लेनिन-मार्क्स याच्या अस्सल प्रकारापैकी नव्हे!— किबुट्झमध्ये सर्वजण समान असतील, सगळ्याना घर-भत्ता समान असेल; पण 'एक किबुट्झ' हे सर्व मिळून अर्थव्यवस्थेचा एक खासगी घटकच होईल. तशीच गोष्ट मोशाव्हची आहे. एक मोठा खाजगी मालकीचा भूभाग, मालमत्ता किंवा धंदा आणि त्याचं अंतर्गत वाटप समाजवादी पद्धतीनं झालेलं इतकाच मर्यादित अर्थ ! या समाजवादा 'चा होईल. इस्राइली अर्थव्यवस्था ही उघडउघड भांडवलशाहीप्रणीत आहे; तिचे फायदे-तोटे हे मोशाव्हीम किंवा किबुट्झिम याना एक खाजगी घटक म्हणून मिळतील. मात्र त्या फायदे तोटयाचं वितरण सभासदापुरतं समाजवादी पद्धतीनं समान होईल!

## किबुट्झ–चार टक्के लोकसंख्या

किबुट्झ आणि इस्राइल याचं अतूट नातं निर्माण झालं असल्यामुळं इस्राइलचं नाव काढताच किबुट्झ जीवनपद्धती आपल्या डोळ्यांपुढे उभी राहते. अर्थात कालाच्या ओघात किबुट्झपेक्षा मोशाव्हपद्धती जास्त लोकप्रिय झाली असल्यामुळं किबुट्झचा अतर्गत प्रभाव कमी-कमी होत चालला आहे. किबुट्झीममध्ये इस्राइलचे फक्त चार टक्के लोक राहतात. जवळजवळ २५० किबुट्झिम आज अस्तित्वात आहेत; त्यांची मिळून लोकसंख्या सुमारे १,०३,००० आहे. १९४८ मध्ये किबुट्झिमची संख्या १४९ होती, तर मोशाव्हीम ५८ होती. आता किबुट्झ २५० च आहेत, तर मोशाव्हीम ३८० पर्यंत गेली

आहेत. याप्रमाणे किबूट्झच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली आहे तरीही ह्या जीवनपद्धतीकडे विशेष लक्ष एवढ्यासाठी आपण देतो की, किबूट्झनं इस्राइलचा विकास घडवण्यामध्ये मोठा वाटा उचलला आहे. आजही इस्राइलच्या शेतकी उत्पादनाच्या तीस टक्के उत्पादन किबूट्झिममधून निघतं.

१९१७ ला ब्रिटिश 'हक्का' ची ( Mandak ) राजवट पॅलेस्टाइनमध्ये सुरू झाल्यावर ज्यू वसाहतवाले यायला सुरुवात झाली. जशी परिस्थिती मोशाव्हीमच्या स्थापनेला कारणीभूत झाली, तशीच किबूट्झच्या सुरुवातीला झाली. फरक येवढाच की, हे १९१७ चे वसाहतवाले पूर्व युरोपमधले होते आणि आदर्श समाजवादाची स्वप्न पाहणारे होते. स्वत कष्ट करण्याची हौस असलेले आणि नोकरगडी ठेवण्याच्या विरुद्ध होते. एकत्र राहाणं ही काळाचीच फार मोठी आवश्यकता असल्यामुळं मोठ्या वसाहती आणि स्वप्नाळू समाजवाद याची सांगड घालून किबूट्झीम निर्माण झाली.

किबूट्झमध्ये समता हे प्रमुख ध्येय असल्यामुळं सगळ्या कुटुंबांना ( म्हणजे नवरा-बायकोला ) सारखीच दोन खोल्यांची घरं, सर्वांना सारखाच भत्ता, सारखंच जेवण ( यासाठी एकच भोजनगृह ) सारख्याच सुविधा ( टेलिफोन, दवाखाना, रुग्णालय, टी. व्ही, प्रसूतीगृह, शाळा वगैरे ), समान मनोरंजन-साधनं ( थिएटर, सभागृह वगैरे ) आणि महत्त्वाच म्हणजे सर्वांना समान हुद्दा. इथे कोणीही मालक नाही, तसंच कोणीही नोकर नाही. आणखी म्हणजे काम, हुद्दा, भत्ता यासाठी पुरुष-स्त्री ह्या भेद नाही. स्त्रियाना पुरुषांच्या बरोबरीने काम करण्यात येणारी सगळ्यात मोठी अडचण म्हणजे माता म्हणून पार पाडावी लागणारी जबाबदारी ! यातून मार्ग म्हणजे कुटुबात मुलं वाढूच द्यायची नाहीत. जन्मल्यावर काही दिवसातच त्याची रवानगी मुलासाठीच्या वेगळ्या वसतिगृहात होते. अर्थात नंतर दररोज कमीत कमी तीन तास इतका वेळ आई-वडिलांनी मुलांबरोबर घालवावा. ( त्या वेळी ती घरी येतात. ) अशी त्याच्यावर सक्ती असते. ह्या व्यवस्थेमुळे मुलं फार लवकर स्वावलंबी होतात, कष्टाळू होतात असं मोशेसाहेबासारखे कट्टर किबूट्झनिक म्हणतात.

आणखी एक वैशिष्टय म्हणजे सामूहिक मालकी. जे उद्योगधंदे किबूट्झच्या मालकीचे असतील—दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन, टर्कीपालन, संत्र्याच्या बागा, इलेक्ट्रॉनिक उपकरणाचे कारखाने, शेती-अवजाराच्या दुरुस्तीसाठी वर्कशॉप, मशीन-शॉप वगैरे—त्याच्यावर संपूर्ण समुदायाची मालकी असते. यामुळे व्यक्तिगत धनलोभ न सुटल्यामुळे अपव्यवहार होत नाही. तसंच वैयक्तिक हितसंबंध न गुतल्यामुळे वस्तुनिष्ठता जास्त येते; उदाहरणार्थ, इस्राइली फ्रीजियन गाईंची राष्ट्रीय सरासरी काढण्यासाठी एक देशव्यापी योजना आहे. ह्या योजनेचा एक मनुष्य दर महिन्यातून एकदा सर्व गाईंचं प्रत्यक्ष दुग्धोत्पादन बघून नोंदवून घेतो. अशी योजना राबवायची म्हणजे गोपालक आणि नोंदणी-अधिकारी याच्याकडून शंभर टक्के प्रामाणिकपणा अपेक्षित आहे. इथे वैयक्तिक मालकी नसल्यामुळे अशा नोंदो खूपच भरंवशाच्या होतात. ह्या सामूहिक मालकीमुळे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केल्यामुळे जे फायदे होतात व म्हणूनच जे लहान शेतकऱ्याच्या पदरात पडत नाहीत, ते किबूट्झला मिळू शकतात. उदाहरणार्थ, एकदम १००० गाई ठेवणे परवडू शकते. इतक्या दुधाला लागणारं शीतकरण-गृह परवडू शकतं. पचवीस टन दूध वाहून नेणारे प्रचंड ट्रेलर-ट्रक्स परवडू शकतात. फळं पॅकिंगचे कारखाने परवडू शकतात वगैरे. पुन्हा ह्या मोठ्या प्रमाणामुळे निर्माण झालेला नफा सर्व सभासदाना सारखाच वाटला जातो, त्यामुळे व्यक्तिगत फायदाही होतोच होतो.

सामुदायिक भोजनगृहाप्रमाणेच कपडे धुण्याचं केंद्रही सामुदायिक असतं. यामुळे स्वैपाकपाणी वगैरे परंपरागत कृत्यामध्ये स्त्रीचा वेळ वाया जात नाही. कामाप्रमाणेच कलाक्रीडाच्या क्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीनं स्त्री भाग घेऊ शकते.

समता किबूट्झमध्ये जाचक वाटत नाही. कारण मिळणाऱ्या समान सवलतीमधूनही राहणीमान तसं उच्चच असतं. एकूण उत्पन्नच खूप असल्यामुळे प्रत्येक घरातलं फर्निचर, टेलिव्हिजन, टोस्टर, फ्रीज इत्यादी उपकरणं ही सगळ्याना वाटता येतात. शिवाय सगळ्याना मिळणारा भत्ता ह्या चैनीला पुरेसा असतो.

सर्वांसाठीच्या रकमेतून शिल्लक राहिलेल्या पैशातून दर सुट्टीला सिनेमे, रॉक एन-रोलच्या टोळ्या, पाहुणे विनोदवीर—इत्यादी कार्यक्रम होत असल्यामुळे करमणूक भरपूर असते.

अमुक एक काम कमी किंवा जास्त प्रतीचं आहे, म्हणून मी ते करीन किंवा करणार नाही ही घातक प्रवृत्ती किबूट्झमधे नष्ट होते. प्रत्येकाला त्याच्या पाळीप्रमाणे—कधी गोठ्यात, कधी खाणावळीत, कधी रस्ते झाडायला, कधी कारखान्यात असेंब्ली करायला—कोणतंही काम करावं लागतं. तुम्ही कधी मोशे दायान याच्या 'नहालाल' या किबूट्झमधे गेलात, तर कदाचित त्याची त्याच दिवशी पाळी असेल तर तुमच्या कपबशा विसळताना ते दिसतील 'डिग्निटी ऑफ लेबर' हे महात्माजींच तत्त्व इथे तंतोतंत पाळलं जाताना दिसेल.

वैयक्तिक मालकी नसल्यामुळे, मोशाव्हमध्ये चौदा-चौदा तास काम करून स्वत.चीच पिळवणूक करून जास्त पैसा मिळवण्याचा कल दिसतो, तसा किबूट्झमध्य दिसत नाही. आठ तास काम केल्यावर 'आता उद्यापर्यंत मरेना का ते काम' ह्या वैयक्तिक सोडवणुकीच्या मानसिक समाधानाचा फायदा आधुनिक कारखान्यातले कामगार नेहमी जो सांगतात, तो किबूट्झमध्ये मिळतो. मोशाव्हमध्ये नाही.

किबूट्झमधला आणखी एक सद्गुण म्हणजे सक्तीचा अभाव ! किबूट्झचं सभासदत्व कुणालाही कधीही सोडून देता येतं. चीनच्या कॉम्यून्समध्ये किंवा रशियाच्या सामूहिक वसाहतीत हे सोडून देण्याचं स्वातंत्र्य नसतं. दुसरं म्हणजे इस्राइली किबूट्झमध्ये वर मोशाव्हच्या वर्णनात आल्या, तशाच स्वायत्त लोकशाही संस्था असतात—प्रातिनिधिक मंडळ, कार्यकारी मंडळ, विविध विषय हाताळणाऱ्या समित्या वगैरे. किबूट्झविषयक सर्व निर्णय हे किबूट्झ-व्यवस्थापन स्वत.च घेतं. रशिया-चीनच्या कॉम्यून्समध्ये स्वायत्तता शून्यच असते. कारण कॉम्यून्सविषयक निर्णय हे संपूर्ण देशाच्या आर्थिक नियोजनाच्या चौकटीत बसण्यासाठी सरकारन आधीच घेतलेले असतात.

हे वर वर्णन केलेले किबूट्झचे शक्य असलेले, सिद्धाताप्रमाणे गौरवण्यासारखे आणि काही प्रमाणात प्रत्यक्ष दिसणारे गुण आणि फायदे, मात्र दरवर्षी जवळजवळ वीस टक्के किबूट्झ् सभासद

राजीनामा देऊन जीवनाच्या इतर आघाड्यांवर जातात याचाच अर्थ असा आहे की, सैद्धांतिक स्वप्नरंजन आणि मानसिक, आर्थिक फायदे काही असोत. किबूट्झ् जीवनप्रकार पूर्वीसारखा सगळ्यांचा आवडता राहिला नाही.

## अप्रियतेची कारणे

सभासदांना मुख्य अप्रिय गोष्ट ही वाटते की, आपल्याला पाहिजे ते जीवन–साधन इथे मिळेलच असं नाही. उदाहरणार्थ, किबूट्झ्ची आजची गरज शेतीमध्ये काम करणाऱ्यांची सर्वाधिक आहे. असं असताना एखाद्याला ॲरोनॉटिक्स किंवा ओशनोग्राफी किंवा झूलॉजी अशा विषयात गती आहे, तर अशाला किबूट्झ् जीवनात वावच नाही. एक तर त्याला स्वत:च्या आकांक्षांना मुरड घालायला हवी किंवा दुसरीकडे तरी जायला हवं. दुसराच मार्ग आकर्षक वाटतो.

'कुटुंबसंस्था धोक्यात आहे,' 'विवाह ही एक धोंड आहे,' कुटुंब–संस्था हे मुलांच्या मनावर बूर्ज्वा विचारांचं पूट बसवणं आहे' वगैरे घोषणा जगातले स्वयंप्रज्ञ 'पुरोगामी', 'कडवे' तरुण देत असले, तरी जगातला कुठलाही देश घ्या–भारत, अमेरिका, रशिया, थायलँड, इस्राइल–मातेचं प्रेम, कुटुंबामधली आपुलकी, जिव्हाळा आणि जवळीक ह्या गोष्टी सगळीकडच बहुसंख्यांना हव्याशी वाटतात. यामुळे किबूट्झ्मध्ये मुलांना वेगळे वाढवण्याला सभासदांच्यात प्रखर विरोध निर्माण झाला आहे.

कष्टाला शाबासकी, सद्गुणाचा गौरव, बुद्धिमत्तेला मान्यता–ह्या मनुष्याच्या मूलभूत गरजा आहेत. किबूट्झ् त्या पूर्ण करू शकत नाही. कष्ट सगळेच करतात, त्यामुळे शाबासकी कोणालाच मिळत नाही कोणी काही विशेष काम केलं, तर, 'सो व्हॉट? इट्स् हिज जॉब' असं किबूट्झ्वाले म्हणणार यामुळे कुणाबद्दल आदर निर्माण होण्याची शक्यता फारच कमी! ह्या अवस्थेत खऱ्याच कष्टाळू आणि विशेष गुणवत्तेच्या माणसाला वैफल्य येतं.

'सर्व समान' ही सैद्धांतिक कल्पना प्रत्यक्षात काही विपरीतच परिणाम घडवते. दुसरा माझ्यापेक्षा कोणीही मोठा नाही, ही भावना इतकी दृढ होते की, तिचे नकारात्मक पवित्रेच जास्त दिसू लागतात. 'विनती' ची जागा 'आज्ञा' घेते. शिष्टाचार, नम्रता, मार्दवता हे गुण धुळीला मिळतात– नव्हे, मिळालेले आहेत!

स्त्री–पुरुषाच्या समानतेविषयी लिहावं तेवढं थोडचं आहे. या समानतेच्या ध्यासातून निर्माण होते आपण पाहिली ती 'रॉनिट्झ्' सारखी मुलगी–जो आदर्श आहे असं म्हणण्याच धाडस कुणीच करणार नाही. म्हणजे या प्रांतात किबूट्झ्न काही वेगळी प्रगती केली आहे असं नाही.

## पुन्हा कुटुंबाकडे

ह्या सगळ्यांचा परिपाक म्हणजे 'बदला नाही तर आम्ही फुटलो', अशा धमक्या ऐकून ऐकून किबूट्झीम बदलू लागली आहेत. असं एक बदललेलं किबूट्झ् आम्ही पाहिलं ते म्हणजे 'आयेलेट हाशाखार' या नावाचं! इथे किबूट्झ्चा कडवेपणा संपलाच आहे. मुलांना घरीच वाढवलं जातं. सामुदायिक भोजनगृह असलं, तरी प्रत्येक कुटुंबाला मधल्या वेळचं खाणं घरी बनवायला मुभा आहे. 'समुदायाकडून कुटुंबाकडे' असं स्थित्यंतर करण्याचं इथे ठरवलं गेलं आहे. इथे एक मूळची अमेरिकन मुलगी भेटली. तिनं लहानपणापासून गाईंमध्ये काम केलं होतं. तिच्या हाताखाली तिला नावानं माहीत असलेल्या कालवडीच्या गाई झाल्या पुढे किबूट्झ्च्या आणि प्रचलित दुग्धव्यवसायाच्या प्रघाताप्रमाणे सरासरीपेक्षा वीस टक्के कमी दूध देणाऱ्या गाई मांसासाठी विकण्याची वेळ आली. त्याच्यापुढे कार्यक्षम व्यवस्थापकांनी आर्थिक बचतीसाठी अशी कल्पना मांडली की आपल्या कॅफेटेरियानं बाहेरून गोमांस विकत घेण्यापेक्षा आपल्याच विकलेल्या गाईचं मांस आपण घ्यावं–म्हणजे प्रत्यक्ष पैसे खर्च करायला नकोत. कार्यकारी मंडळात तसा ठरावही संमत झाला. पहिला लॉट कसाईखान्याला गेला सुद्धा!–

**ह्या कळपामधल्या बहुसंख्य गाई त्या अमेरिकन मुलीनं लहानपणापासून वाढवलेल्या होत्या. तिनं त्याच दिवशी मांसाहार सोडून दिला! आता ती कट्टर शाकाहारी झाली आहे आणि इतरांना तसंच होण्याचा उपदेश करते.**

किबूट्झ्ची कल्पना अप्रिय होत चालली आहे. पण तिच्यामागचे सिद्धांत तर तार्किकदृष्ट्या आकर्षक वाटत आहेत; ह्या विरोधाभासातून मार्ग म्हणून मोशाव्ह आणि किबूट्झ् या दोन्ही जीवनप्रकारातील चांगले भाग घेऊन 'मोशाव्ह शितुफी' ही 'संकरित' ग्रामयोजना नव्यानं सुरू झाली आहे. किबूट्झ्प्रमाणे मोशाव्ह-शितुफीमधल्या सर्व उद्योगधंद्यांची मालकी सार्वजनिक असते. मालाची विक्री किबूट्झ्तर्फेच होते. मात्र मोशाव्हप्रमाणे प्रत्येकाचं घर ज्याच्या त्याच्या मालकीचं असतं. मुलं घरीच राहतात. अशा तऱ्हेने व्यक्ति–स्वातंत्र्य आणि सामुदायिक मालकी यांची सांगड घालण्याचा हा प्रयत्न आहे. सध्या मोशाव्ह–शितुफीची संख्या फारच थोडी आहे. त्यामुळे या प्रकाराची लोकप्रियता इतक्यात सांगता येणार नाही.

किबूट्झिम (अनेकवचन) कालाबरोबर पुढेमागे दिसेनाशीही होतील. मात्र इस्राइलच्या आतापर्यंतच्या इतिहासातलं त्यांचं कार्य हे सुवर्णाक्षरांनीच लिहिलं जाईल. १९६७ च्या सहा दिवसांच्या युद्धात इस्राइलच्या मृत आणि जखमी सैनिकांपैकी पंचवीस टक्के किबूट्झ्चे सभासद होते. कारण प्रत्येक ठिकाणी अग्रभागी व अतिशय शौर्यानं ते लढले. याखेरीज इस्राइलच्या सैनिकी विमानदलात वैमानिकांमध्ये किबूट्झ्–सभासद सर्वाधिक आहेत. एकूण लोकसंख्येच्या मानाने किबूट्झ्निक् फार थोडे असतील; पण इस्राइली लोकसभा, कॅबिनेट मंत्रालय, सरकारी कार्यालय इथे उच्च पदांवर ते इतक्या ठिकाणी दिसतील की, वाटावं किबूट्झीम ही नेतृत्व निर्माण करण्याची केंद्र तर नाहीत?

किबूट्झ्, मोशाव्ह, मोशाव्ह–शितुफी–प्रत्येक संकल्पनेत काही त्रुटी असतील, काही फायदे असतील. त्या संकल्पना, त्यांची घटना आपल्याला सोईची नसेलही. मात्र एक गोष्ट आपल्याला घेण्यासारखी आहे. ती म्हणजे ह्या तीन प्रकारातून निर्माण होणारं सर्वसमावेशक नेतृत्व. आपल्याकडे आज एक प्रचंड पक्ष आणि एकच नेता असं दिसतं. विरोधी पक्षातले नेते म्हणजे कोणी शुगर-बॅरन, कुणी बड्या जमीनदाराचे कैवारी, कुणी व्यावसायिक नेते, तर कुणी इतर बड्या नेत्यांचे पित्ते! यामध्ये अगदी खालपासून स्वत: हातानं काम करीत, बरोबरच्या लोकांना बरोबर नेऊन, स्वत: अर्थव्यवस्था स्वत:च्या श्रमानं घडवणारे कुणीच नाहीत–याचं कारण असं कार्य करण्याची संधी देऊन असे नेते निर्माण करणारी संस्थात्मक रचनाच अजून आपल्याकडे नाही; पण किबूट्झ् नाही, मोशाव्ह नाही–तर मग काही तरी वेगळ्या तऱ्हेच्या संस्था निर्माण करून लोकशाहीला पोषक असं विधायक नेतृत्व भारताला कधी ना कधी तरी निर्माण करावं लागेलच की!

[क्रमश:]

कथा

# एका फ्रेंच गुप्तहेराचे साहस

## ( उत्तरार्ध )

अनुवाद
विजय देवधर

'फ्रान्सिस' कोण हे तर मला कळलं. पण नंतरचे नऊ महिने मला फार गडबडीचे गेले. इतर अनेक कामगिऱ्यामध्ये मी गुतून पडलो होतो. त्याने मला मॉंसेयर एमिल ब्यूसनकडेही लक्ष देण्यास फुरसत मिळाली नव्हती; पण वर्तमानपत्रामधून नि रेडिओवरल्या बातम्यांवरून ब्यूसनचे नित्य नवे 'पराक्रम' मला कळत होते.

१९४८ सालच्या डिसेंबर महिन्यात एका गस्त-पथकाच्या हातातून एमिल ब्यूसन अगदी थोडक्यात निसटला. त्याचं असं झालं. इझिल मोलिना विभागातल्या एका रस्त्याच्या कडेला एक पेट्रोल-कार उभी होती. त्या वेळी रॉंगसाइडनं भरवेगानं एक गाडी अचानक आली नि या पेट्रोलकारला जवळजवळ घासटून रोरावत निघून गेली. पेट्रोलकारमधल्या गस्तपथकानं ताबडतोब त्या गाडीचा पिच्छा पकडला. जोरदार पाठलाग करून त्या पेट्रोलकारनं पळून जाणाऱ्या त्या गाडीला अखेर गाठलं नि थांबण्यास भाग पाडलं. त्याबरोबर त्या गाडीतून दोन गुड बाहेर पडले त्यांच्या हातात मशीनगन्स होत्या. त्यानी एकदम गोळीबारास सुरुवात केली. गस्तपथकाचे दोन पोलीस जखमी होऊन खाली कोसळले. मग एकच गोळागोळी सुरू झाली पेट्रोलपोलीस आणि ते गुड यांच्यात जोरदार चकमक उडाली; पण अखेरीस त्या दोघा गुडांना पकडण्यात पोलिसांना यश आले. मात्र दुसरे दोघे ठग या धुमश्चक्रीचा फायदा घेऊन ती मोटार घेऊन पसार झाले. जे दोघं पोलिसाच्या हाती सापडले त्यातला एकजण होता फ्रॅंसिस कॅर्लो आणि दुसऱ्याचं नाव होतं हेन्री बोलेक.

या दोघाना पोलीसस्टेशनवर नेण्यात आले. तिथं त्यानी सर्व माहिती सागावी म्हणून त्याची यथास्थित धुलाई करण्यात आली. कॅर्लो हा अत्यंत निगरगट्ट होता. त्यानं पोलिसाच्या मारपिटीला दाद दिली नाही; पण दुसरा गुड-बोलेक मात्र नरम आला. पोलिसाच्या हातांतून निसटून पळून गेले ते त्याचे इतर दोघे साथीदार म्हणजे एमिल ब्यूसन आणि डेझिरे पोलेद्री हे होत, असं त्यानं पोलिसाना सागितलं. डेझिरे पोलेद्री हा एक कुख्यात इटालियन ठग होता; पण ही माहिती कळेपर्यंत मध्ये बराच वेळ गेला होता. त्यामुळे रस्ते अडवून पळालेल्या त्या दोघाना पकडण्याचा प्रयत्न करणं व्यर्थ होतं...

७ एप्रिल १९४९ रोजी सकाळी मी मार्लिसबरोबर माझा ब्रेकफास्ट घेत होतो. एकीकडे डोक्यात विचारचक्र गरगरतच होतं. अचानक रेडिओवरल्या एका बातमीमुळं माझी विचारमालिका तुटली. निवेदक सांगत होता: "पळून जाण्यात पटाईत असलेला रेने गिरियर हा गुन्हेगार आज सकाळी नॉर्मंडीमधल्या पॉंत ल इव्ह तुरुंगातून पसार झाला. तो तिथं २७ जानेवारीपासून कैदेत होता .." रेडिओवरला निवेदक पुढल्या बातम्या सांगू लागला; पण आता माझं त्याकडं लक्ष नव्हतं माझं विचारचक्र आता अधिकच वेगानं गरगरू लागलं होतं. सर्व तऱ्हेच्या शक्याशक्यता माझ्या डोक्यात पिंगा घालू लागल्या. रेने गिरियर तुरुंगातून पळाला त्या अर्थी तो आता आपल्या जुन्या दोस्तांना–एमिल ब्यूसन–ला जाऊन मिळणार ! आणि गिरियरसारखा हुन्नरवान ठग अनपेक्षितपणे आपल्या गॅंगला येऊन मिळाला तर त्यानं आपल्या कमकुवत गॅंगला पुन्हा बळकटीच आली, या विचारानं एमिल ब्यूसनही सुखावणार ! अन् दोघाच्या धिंगाण्याला पुन्हा सुरुवात होणार...माझ्या मनात झरझर विचार येऊन गेले. प्रिफेक्चर गुप्तहेर संस्थेचे डिटेक्टिव्ह या दोघाच्या मागावर सुटणार हे तर ओघानंच आलं. तेव्हा ही शिकार साधण्यासाठी नि पर्यायानंच प्रिफेक्चरशी स्पर्धा करण्यासाठी हिंदोनीबरोबर आपणही रिंगणात उतरावं असा एक उत्स्फूर्त विचार माझ्या मनात आला अन् त्या विचारासरशी खुर्ची मागे सारून मी ताड्दिशी उठून उभा राहिलो.

"काय रे ! एकाएकी तुला काय झालं?" मार्लिसनं चमकून मला विचारलं, "तो कोण गिरियर तुरुंगातून पळून गेला तर तुला एवढं अस्वस्थ व्हायला काय झालं? अं ? चल बस! ब्रेकफास्ट तरी पूर्ण खा !"

पण मार्लिसच्या प्रश्नांची उत्तरं द्यायला मी तिथं थांबलोच नाही. घाईघाईनं कपडे चढवून मी केव्हाच रु डी सॉसमावरल्या आमच्या ऑफिसचा रस्ता पकडला होता! ...

त्यानंतर काही दिवसानी घडलेल्या एका माणसाच्या मृत्यूनं ब्यूसनच्या शोधमोहिमेला पुन्हा चालना मिळाली. ओळीनं काही यशस्वी धाडी घातल्यानतर एका कंस्ट्रक्शन कंपनीच्या फोरमनला

लुबाडण्याचा घाट एमिल व्यूसननं घातला होता. बँकेचा एक मेसेंजर त्या फोरमनला एका विवक्षितत स्थळी ब्रीफकेसमधून वीस लक्ष फ्रँकस्ची रोकड रक्कम आणून देणार आहे. अशी कुणकुण व्यूसनला लागली होती. तेव्हा चोरलेल्या एका मोटारीतून आपल्या साथीदारां-समवेत व्यूसन त्या विशिष्ट ठिकाणावर अगोदरच जाऊन पोचला; पण ठरलेल्या वेळेवर तो बँकमेसेंजर आलाच नाही. या अपेक्षा-भंगामुळे एमिल चिडला आणि आपल्या गुप्त निवासस्थानी रागा-रागानं परतला. चोरलेली गाडी कुठे तरी सोडून देण्यास त्यानं आपल्या दोघा साथीदारांना सांगितलं होतं. त्याप्रमाणे ते दोघे—डेझिरे पोलेट्री आणि मारिक् यव्हज्—ती गाडी घेऊन निघाले. वाटेत मागल्या सीटवर बसलेल्या पोलेट्रीनं आपल्या मशीनगनचं मॅगॅझिन काढण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी अपघातानं गोळी उडाली आणि पुढल्या सीटवर ड्रायव्हिंग करणाऱ्या यव्हज्च्या मस्तकात शिरली. यव्हज्चं शरीर धपकन पुढं आपटलं नि तो जागच्या जागीच खलास झाला! नियंत्रण सुटल्यानं मोटार वेडीवाकडी धावू लागली. या अनपेक्षित प्रकारानं हबकलेल्या पोलेट्रीनं पुढल्या सीटवर उडी मारली आणि भरकटणारी मोटार कशीबशी थाबवली. यव्हज् ठार झालेला पाहून पोलेट्री विलक्षण हादरला अन् त्याचा मृतदेह त्या मोटारीतच टाकून ती मोटार तिथेच सोडून तो सकेतस्थळी परतला. यव्हज् आपल्या हातून अपघातानं मेला असं पोलेट्रीनं व्यूसनला सागितलं मात्र—व्यूसन इतका संतापला की त्यानं पोलेट्रीची गचांडीच धरली. वास्तविक व्यूसन पोलेट्रीपेक्षा बुटका होता; पण आपल्या जबरदस्त ताकदीनं त्यानं पोलेट्रीला खाली पाडलं आणि तो त्याच्या उरावर स्वार झाला! त्याच्या वजनाखाली दबलेला पोलेट्री, काकुळतीनं त्याची क्षमायाचना करू लागला. " मूर्खा! " व्यूसन त्याच्यावर ओरडला, " माझ्या गँगमधला एक उत्तम माणूस तू ठार केलास आणि त्याला बेवारशासारखा त्या मोटारीत सोडून आलास! त्याचा देह पोलिसाना सापडला की काय होईल याची तुला कल्पना आहे ?" असहाय पोलेट्री व्यूसनची पुनःपुनः क्षमा मागू लागला.

अखेर थोडया वेळानं व्यूसनच्या रागाचा पारा खाली आला आणि तो पोलेट्रीच्या अंगावरून बाजूला झाला.

" यव्हज्चा मुडदा मिळाला की पोलीस चौफेर हुंगत सुटतील ! त्यांना आपल्या या गुप्त ठिकाणाचा वास लागण्याचीही शक्यता आहे. तेव्हा आता मी इथनं तावडतोब कुठं तरी दुसरीकडे निघून जाणार ! " जराशानं व्यूसन बोलला.

'पण मग मी काय करू?' अजूनही जमिनीवर पसरलेल्या पोलेट्रीनं घपापत्या स्वरात व्यूसनला विचारलं. काही क्षण विचार करून व्यूसन म्हणाला, 'तुझ्या ओळखीची एखादी पोरगी किंवा कुणी गर्लफ्रेंड आहे का तुला? जी तुला तात्पुरता आश्रय देऊ शकेल?'

'हो! अल्बीमध्ये माझी गर्लफ्रेंड राहते· पण का?'

'मग तिच्याकडे जाऊन दड! मला तुझी जरूर लागली नि वातावरण निवळलं की तुला मी बोलावून घेईन!' व्यूसन म्हणाला.

चोरलेली गाडी यव्हज्च्या मृतदेहासकट पोलेट्रीन जिथं सोडली होती त्या जागेपासून व्यूसन दडला होता ते ठिकाण फार दूर नव्हतं म्हणून व्यूसननं आपल्या गँगसह त्या गुप्त ठिकाणातून वेगानं पोबारा केला. व्यूसनचा होरा अचूक होता कारण त्याच्या दुसऱ्याच दिवशी 'प्रिफेक्चर' च्या काही डिटेक्टव्हांनी त्या घरावर अचानक धाड घातली; पण त्यांच्या हाती कुणी लागलं नाही !

यानंतर मधे काही आठवडे गेले.

अन् एक दिवस व्यूसनन पॅरिसहून पोलेट्रीला फोन केला. 'एक झकास कामगिरी आहे. त्याकरता तुझी मला इथं गरज आहे. तेव्हा उद्या सकाळी माझी गाठ घे!' असं सागून व्यूसननं त्याला एका विवक्षित कॅफेत भेटण्यास सांगितलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी लेफ्ट बँक विभागातल्या त्या कॅफेमध्ये ठरल्याप्रमाणे पोलेट्री गेला. तिथं व्यूसन त्याची वाट पाहत होताच. त्यानं पोलेट्रीशी हस्तांदोलन केलं आणि मोठया आपुलकीनं त्याचं स्वागत केलं. नंतर नियोजित कामगिरीची रूपरेषा त्यानं पोलेट्रीला सांगितली. बोलणी झाल्यानंतर ते दोघं त्या कॅफेतून बाहेर पडले आणि फूटपाथवरून चालू लागले. थोडयाच वेळानंतर बोलत बोलत ते दोघं 'पॅसेज लँट्री' या आडबाजूला नि निर्मनुष्य असलेल्या एका गल्लीत शिरले. ही गल्ली भलतीच लांबलचक होती. ते दोघं त्या गल्लीच्या मध्यावर पोचले असतील नसतील तोच एक मोटारगाडी त्यांच्या पाठी आली आणि तिचा ड्रायव्हर जोरजोरानं हॉर्न वाजवू लागला.

त्याबरोबर माजराच्या चपळाईनं व्यूसननं पोलेट्रीला आपल्या पुढं ढकललं. त्याचा हात त्याच्या कोटाच्या खिशात गेला अन् दुसऱ्याच क्षणी त्याच्या हातात एक कोल्ट रिव्हॉल्व्हर आलं. हा काय प्रकार आहे हे पोलेट्रीच्या लक्षात येण्यापूर्वीच नेम धरून व्यूसननं त्याच्या डोक्यावर गोळी झाडली. पोलेट्री ताकाळ गतप्राण झाला नि त्याचा देह धाडकन रस्त्याच्या कडेला कोसळला. व्यूसननं त्याच्या शरीरावर आणखी पाच गोळया झाडल्या आणि मागे येऊन थांबलेल्या मोटा-रीत बसून तो तिथून वेगानं पसार झाला. व्यूसननं पोलेट्रीसाठी तो सापळा लावला होता नि पोलेट्री त्याला अचूक बळी पडला. गँगमध्ये नको असलेल्या त्या ठगाचा व्यूसननं अशा तऱ्हेनं काटा कपटानं काढला होता !

पोलेट्रीचा मृतदेह नंतर पोलीसस्टेशनवर आणण्यात आला. ज्या तऱ्हेनं डोक्याच्या मागे गोळी घालून पोलेट्रीचा खून करण्यात आला होता ती पाहिल्यानंतर ते काम कोणाचं हे माझ्या तात्काळ ध्यानात आलं. व्यूसन ! पण हा सैतान गडप झाला होता तरी कुठे ? त्याला शोधायचा तरी कुठे ? माझ्या मनात प्रश्नचिन्हं उभी राहिली.

एकच मार्ग शिल्लक राहिला होता. तो म्हणजे रेने गिरियरचा माग पकडणं. तो मला व्यूसनपर्यंत नेऊन पोचवेल अशी माझी अट-कळ होती. अर्थात गिरियरचा मागही अस्पष्ट होता; पण मी तो धरण्याचं ठरवलं नि त्या उद्योगाला लागलो. ऑपेरा कॉमिकजवळचा 'फेवर्त बार' हा रेने गिरियरचा एक अड्डा होता. तिथं तो केव्हा तरी येतो हे मला ठाऊक होतं तेव्हा त्या बारवर मी दिवसरात्र पाळत ठेवून बसलो. तापदायकच काम होतं ते; पण इलाज नव्हता. अन एक दिवस पूर्वी कुठे तरी पाहिलेला एक गुंड त्या बारमधून बाहेर पडताना मला दिसला. याचा गिरियरशी संबंध आहे—माझ्या मेंदूनं मला सूचना दिली. मी त्याच्या गाडीचा नंबर टिपून घेतला. त्या गुंडाचं नाव मॅथ्यू रोबियार्ड आहे असं मला दुसऱ्या दिवशी कळलं.

माझं स्मरण बिनचूक होतं. काही वर्षांपूर्वी आमच्या फ्लाइंगस्क्वाडनं या रोबियार्डबरोबरच गिरियरलाही कोणत्या तरी गुन्ह्यावरून पकडलं होतं. गिरियरचा आपल्या या जुन्या दोस्ताशी संबंध असणारच— माझ्या मनानं उपपत्ती माडली. शिवाय हा रोबियार्ड दररोज त्या बारमध्ये जातो हे पण माझ्या निदर्शनास आलं होत. रहस्यावरचा पडदा हळूहळू उडू लागला होता. त्या बारचा टेलिफोन टॅप करण्याची नि त्याला टेपरेकॉर्डर जोडण्याचीही मी व्यवस्था केली.

मग रोज रात्री रेकॉर्डिंग झालेल्या टेपवरली संभाषणं मी ऐकू लागलो. चार दिवस मला तऱ्हतऱ्हेची निरर्थक संभाषणं ऐकावी लागली अन पाचव्या दिवशी मला हवा असलेला आवाज माझ्या कानांवर पडला नि मी एकदम तल्लख झालो.

'कोण ? मॅथ्यू ? हाय ! मी रेने बोलतोय ! हं ! बोल काय म्हणतोस ?...' त्याच्यातलं पुढलं संभाषण मी नीट कान देऊन ऐकल. एका विवक्षित बारमध्ये दोघानी एकमेकाची भेट घेण्याचं ठरवलं आहे हे मला त्यांच्या संभाषणावरून कळलं. त्या ठिकाणी मी गिरियरला सहजी अटक करू शकलो असतो; पण त्यात काही अर्थ नव्हता म्हणून मी एक वेगळा डाव टाकायचं ठरवलं. ज्या संकेतस्थळी गिरियर आणि रोबियार्ड एकमेकाना भेटणार होते तिथं मी माझ्या एका दोस्ताला पाठवलं. ते दोघं जेव्हा तिथून बाहेर पडले तेव्हा माझ्या दोस्तानं त्याच्या नकळत त्यांचा पाठलाग केला. ब्रायसूर मार्नी इथल्या एका नदीकिनाऱ्यावरल्या हॉटेलात ते दोघं शिरले. गिरियर ऊर्फ 'रेने द केन' त्या हॉटेलामधेच दडून राहिलेला आहे असं मला माझ्या दोस्ताकरवी नंतर कळलं. त्याबरोबर मी पुढल्या उद्योगाला लागलो. तद्दन गुंडासारखा दिसेल असा पोशाख मी केला अन ब्रायसूर मार्नी या विभागातल्या त्या हॉटेलात जाऊन बेधडकपणे गिरियरची गाठ घेतली. मला ब्यूसनच्या गॅंगमध्ये सामील व्हायचं आहे असं मी त्याला सांगितलं. प्रथम त्यानं माझ्याकडे संशयानं पाहिलं आणि उडवाउडवी केली; पण सतत तीन चार दिवस तिथे जाऊन मी त्याचा पिच्छा पुरवला. हळूहळू त्याचा माझ्यावर विश्वास बसला. थोड्याच अवधीत माझी त्याच्याशी दोस्ती जुळली; पण गडी ब्यूसनबद्दल ताकाला तूर लागू देईना ! मी माझी चिकाटी सोडली नाही आणि त्याचा पाठपुरावा चालूच ठेवला अन अखेर एक दिवस गिरियर मला ब्यूसनकडे नेण्यास तयार झाला. घास माझ्या अगदी तोंडाशी आला होता पण—

हाय रे कर्मा ! हे यशही माझ्या नशिबात नव्हतं !

प्रिफेक्चरच्या डिटेक्टिव्हानी इथेही आपलं नाक खुपसून नको तो पचका शेवटी केलाच आणि मी शिजवत आणलेल्या प्रकरणाची पार वाट लावली ! त्याचं असं झालं : आमच्याप्रमाणेच प्रिफेक्चरच्या डिटेक्टिव्हानाही गिरियरचा वास लागला होता आणि ते त्याच्या हालचालीवर पाळत ठेवून बसले होते आणि एका रात्री फॅवर्त बारवर अचानक धाड घालून त्यानी गिरियर व रोबियार्ड या दोघानाही अटक केली. वास्तविक हा बार ज्या भागात होता तो भाग 'सुरेट'च्या अखत्यारीखाली येत होता; पण प्रिफेक्चरच्या डिटेक्टिव्हांनी हा नियम धाब्यावर बसवून अखेर विचका केलाच ! या प्रकारात आमचे चेहरे मात्र फोटो काढण्यासारखे झाले अन ढोलवा ? खोचकपणे ते म्हणाले, "छान हं ! बॉनिक् छान ! चागली प्रगती चाललीय तुमची !" हात चोळत बसण्याव्यतिरिक्त मी तरी दुसरं काय करू शकणार होतो ?

दरम्यान मॉसियर एमिलच्या कारवायांना आणखी ऊत आला होता. पॅरिसमधला प्रत्येक सशस्त्र दरोडा हा एमिलचाच उद्योग असं आता जवळजवळ समीकरणच होऊन बसलं होतं. धडाधड धाडी घालण्याचे त्याचे उद्योग अव्याहतपणे चालूच होते. एका म्युनिसिपल गॅरेजमधून त्यानं पगाराच्या रकमेचे दोन लक्ष फ्रॅंक्स् उचलले ! पॅरिसन सॅलॅव्हिन कंपनीच्या मेसेजरला लुबाडून त्यानं एक लक्ष फ्रॅंक्स पळवले. एका सिक्युरिटी कॅशियरला पिस्तुलाच्या धाकात घेऊन त्याच्याकडूनही एक लक्ष फ्रॅंक्स् उकळले. पॅरिसमधल्या बाउलव्हर्ड डी कोर्सेल्स विभागातल्या एका तंबाखूच्या व्यापाऱ्याकडून रोख तीन लक्ष फ्रॅंक्स्ची रक्कम आणि सुमारे अडीच लक्ष फ्रॅंक्स् किंमतीची तिकिटं त्यानं पळवली. एका फॅमिली अलाउन्सेस फंड एजंटला लुबाडून त्यानं जवळजवळ नऊ लक्ष फ्रॅंक्स्ची रोकड पळवली ! हे सर्व दरोडे त्यानं इतके योजनाबद्धपणे घातले होते की कुठेही तो पोलिसाच्या हाती लागला नाही !

अन् त्यानतर ब्यूसननं एक अत्यंत धाडसी डल्ला मारला ! शॅंपी—सुर—मार्नी विभागातल्या रीजनल अकौंटस् अॅंड डिपॉझिट बॅंकेच्या जुन्या इमारतीतून बरीच मोठी रक्कम तिथून जवळच असलेल्या बॅंकेच्या नव्या इमारतीत हलवली जाणार आहे, अशी कुणकुण ब्यूसनला लागली होती. ही रक्कम लुबाडण्याचा ब्यूसनन घाट घातला.

११ फेब्रुवारी १९५० रोजी सकाळी रीजनल अकौंटस अॅंड डिपॉझिट बॅंकेचा मॅनेजर आणि कॅशियर असे दोघंजण बॅंकेच्या जुन्या इमारतीतून बाहेर पडले. कॅशियरच्या हातात पैशाची बॅग होती. सुरक्षिततेच्या दृष्टीनं मॅनेजरने कोटाच्या खिशात आपलं पिस्तुल बरोबर घेतल होतं. दोघं सुमारे दीडशे फुटावर असलेल्या बॅंकेच्या नव्या इमारतीकडे निघाले. तिथल्या स्ट्रॉंगरूममध्ये ती रक्कम ठेवण्यात येणार होती. ते दोघं अर्ध्या वाटेत पोचले तोच —

चाबकाचा फट्कारा बसावा तसा एक तीक्ष्ण आवाज गरजला

'जरासुद्धा हलू नका ! हॅंडस् अप् !'

त्या आवाजाला साक्षात मृत्यूचीच धार होती.

त्या आवाजासरशी बॅंकमॅनेजर गर्रकन मागे वळला. तेव्हा रिव्हॉल्व्हर घेतलेला, काळ्या डोळ्याचा एक बुटका माणूस, त्याच्या नजरेस पडला. पिस्तुलासाठी बॅंकमॅनेजरचा हात अभावितपणं आपल्या कोटाच्या खिशाकडे गेला; पण त्यापूर्वीच त्या बुटक्या माणसाच्या हातातलं पिस्तुल कडाडल ! दोन गोळ्या सुटल्या आणि त्यानी बॅंकमॅनेजरचा वेध घेतला. गतप्राण होऊन तो दुर्दैवी बॅंकमॅनेजर खालच्या फूटपाथवर धाड्कन् कोसळला! त्याबरोबर तो बुटका माणूस एकदम पुढ झाला आणि कॅशियरच्या हातातली पैशाची जड बॅग

## हाय रे कर्मा ! हे यशही माझ्या नशिबात नव्हतं !

त्यानं हिसकावून घेतली. त्याचे इतर साथीदार हातातली शस्त्रं रोखून त्याला संरक्षण देत भोवताली कडं करून उभे होते. पैशाची बॅग हिसकावून घेतल्यानंतर तो बुटका माणूस वेगानं पळत काही अंतरावर तयारीत थांबलेल्या मोटारीत शिरला. त्याचे इतर साथीदारही भराभर त्या मोटारीत बसले आणि पाहता पाहता ती मोटार तिथून वेगानं पसार झाली. अतिशय वेगानं हा सर्व प्रकार घडला. दरोडेखोरानी पळवलेल्या त्या बॅगेत चार लक्ष फ्रँक्सची रोकड आणि एक लक्ष फ्रँक्सचे चेक होते.

मॉसियर एमिलनं मारलेला हा त्याचा सर्वांत मोठा नि शेवटला डाका ठरला! कारण तोपर्यंत पॅरिसमधला एकूण एक पोलीस त्याच्या मागावर सुटला होता. या दरोड्यानं पॅरिसमध्ये प्रचंड खळबळ उडाली अन् त्यामुळंच पोलिसखात्याची चक्रं वेगानं गरगरू लागली आणि एक एक करून मॉसियर एमिलचे सर्व साथीदार पोलिसांच्या हाती सापडले; पण खुद्द ब्यूसन मात्र त्यांच्या हाती लागला नाही! जणु काही धरणीनंच त्याला गिळून टाकला होता. गडप तरी कुठे झाला होता हा सैतान?

□

ब्यूसनला कसा खणून काढावा या एकाच गोष्टीवर माझं सारं लक्ष आता केन्द्रित झालं होतं. ब्यूसन अंडरवर्ल्डचा बादशहा होता; पण मीही एक खट शिकारी होतो. सावजाला खणून काढल्याखेरीज स्वस्थ बसणं माझ्या प्रकृतीत बसत नव्हतं अन् म्हणूनच ब्यूसनला कशा तऱ्हेनं जाळ्यात पकडता येईल याचा मी सर्व दृष्टिकोनातून विचार करू लागलो. खूप डोकं शिणवल्यानंतर ब्यूसनपर्यन्त पोचायचं झालं तर, त्यासाठी त्याच्या एखाद्या साथीदाराचाच काही तरी युक्तीनं उपयोग करून घेतला पाहिजे, हा उत्स्फूर्त विचार माझ्या मनात एकदम चमकला; पण त्याकरता त्याच्या साथिदारापैकी कुणाला हाताशी धरावं? अन् माझ्या डोळ्यासमोर एक नाव आलं—

फ्रान्सिस कॅर्लो!

मॉसियर एमिलच्या जुन्या दोस्तांपैकी फक्त फ्रान्सिस कॅर्लोबद्दल मला अजूनही खास इंटरेस्ट वाटत होता. त्याला बरीच कारणं होती. एमिलनं वडधाच्या हॉस्पिटलातून सूबाल्या केल्यापासून हा फ्रान्सिस कॅर्लो त्याचा एकमेव विश्वासू हस्तक बनून राहिला होता. कुठं तरी दरोडा घालून पळून जात असताना एमिलच्या गाडीनं रस्त्याच्या कडला असलल्या पेट्रोलकारला धडक दिली होती नि नंतर त्या पेट्रोलकारन एमिलच्या गाडीचा पाठलाग करून तिला जेव्हा अडवल होतं तेव्हा एमिलला पळून जाता यावं म्हणून हा फ्रान्सिस कॅर्लोच त्याच्यापाठीमागे खंबीरपणे उभा राहिला होता. त्यासाठी त्यान त्या वेळी पेट्रोलपोलिसाशी तिखट लढतही दिली होती—

पण नतर तो पोलिसाच्या हातात सापडला होता नि सध्या ही स्वारी सॅन्ट तुरुगातल्या एका बिनभाड्याच्या खोलीत बंदिस्त होती. एका अज्ञात व्यक्तीकडून कॅर्लोला तुरुगात उत्तमोत्तम खाद्यपदार्थांची पुडकी नियमितपणे येत असतात ही विलक्षण गोष्ट तिथल्या एका अधिकाऱ्याकडून मला समजली होती. जो जो मी फ्रॅन्सिस कॅर्लोबद्दल विचार करू लागलो तो तो मला ब्यूसनपर्यंत नेऊन पोचवेल असा माणूस हाच अशी माझी खात्री पटू लागली. ब्यूसनच्या रहस्यमय तिळेच दार उघडण्यासाठी हा कॅर्लो हीच खरी गुरुकिल्ली होती. एमिल कुठ दडलाय ते कॅर्लोला ठाऊक असणारच. फक्त त्याच्याकडून मला ते युक्तीनं काढून घ्यावं लागणार होतं आणि अर्थात हे कामही मला कॅर्लोशी घसट असलेल्या एखाद्या गुंडाकरवीच करून घ्यावं लागणार होतं. या कामासाठी कुणाला बरं निवडावं? आणि एक अगदी योग्य माणूस माझ्या नजरेसमोर उभा राहिला. रेने गिरियरचा दोस्त मॅथ्यू रोबियार्ड! हा! नामी कल्पना! रोबियार्डचाच या कामासाठी उपयोग करून घ्यावा. तुरुगातून रोबियार्डची नुकतीच सुटका झाली होती; पण त्याच्या विरुद्ध, त्याला पुन्हा गजाआड घालण्याइतके अनेक सबळ पुरावे माझ्यापाशी होते. त्याच्या जोरावर त्याला झुकवायचा असं मी ठरवलं. तुरुगातून तो जरी सुटलेला असला तरी इरेट इथल्या एका चोरीच्या गुन्ह्यावरून रॉ विभागातल्या पोलिसाना तो अजूनही हवा आहे हे मला कळल होतं. त्याच्या विरुद्ध असलेल्या पुराव्याखाली त्याला दाबात घ्यायचाच, पण त्याव्यतिरिक्त त्याला एक आमिषही दाखवायचं असा मी विचार केला. एमिलला पकडून देणारास अगर त्याच्या ठावठिकाण्याची माहिती देणारास रीजनल अकौंटस् अँड डिपॉझिट बँकने एक लक्ष फ्रँक्सच बक्षीस जाहीर केल होत. या आमिषाचा रोबियार्डला मोह पडण्याची कदाचित शक्यता होती.....

□

"आपलं काय होणार आहे कुणास ठाऊक बॉनिक!" हेडक्वार्टर्सनजिक असलेल्या एका बारमध्ये आम्ही दोघ बसलो होतो तेव्हा समारच्या व्हिस्कीच्या ग्लासमध्ये सुस्कारा सोडत ढोलबा म्हणाले, "या ब्यूसनन अगदी वात आणलाय. अजूनही तो आपल्या हाता लागला नाही. अशानं आपल्या नोकऱ्या जातील अशी भीती मला अलीकडे वाटू लागलीय!"

"सर! आपण त्याच्यासाठी एखादा सापळा लावला तर? मला वाटतं तो आपल्याला अचूक गवसेल. त्यासबधी माझ्या मनात एक योजना आहे." मी म्हणालो आणि मी आखलेल्या योजनची रूपरेषा त्याच्यासमार माडली.

"कल्पना काही वाईट नाही बॉनिक." माझं म्हणणं ऐकून घेतल्यानतर ढालबा उद्गारल, "मला वाटत आपल्या 'सूरेट'-तर्फे आपणही आणखी पाच लाखाचं बक्षीस जाहीर केल तर ब्यूसनचा ठावठिकाणा सागायला रोबियार्ड एका पायावर तयार होईल. कसं?"

ढोलबाकडून असा ग्रीन सिग्नल मिळाल्याबरोबर मी लगेच रोबियार्डच्या मागावर सुटलो. जॉइन विला—ल—पॉंत इथल रोबियार्डच निवासस्थान हुडकून काढायला मला दोन दिवस लागले. रोबियार्डची बायको कसल्या तरी गभीर आजारानं अंथरुणाला खिळून आहे असं तिथल्या त्याच्या काही शेजाऱ्याकडं चौकशी करता मला कळल. त्याच्या घरावर मी पाळत ठवली अन त्याच्या बायकोला तपासण्यासाठी आलेला डॉक्टर जेव्हा त्याच्या घरातून बाहेर पडला तेव्हा मी त्याला वाटत गाठल आणि विचारलं,

"मी पोलीस. डॉक्टर, काही विशेष गभीर बाब?"

"ल्यूकेमिया." तो डॉक्टर उद्गारला.

वास्तविक डॉक्टरनं रुग्णाच्या रोगाबद्दल कुणाला काही सांगू नये असा नियम असतो; पण पोलिसाना सहकार्य देण्यासाठी त्या चांगल्या डॉक्टरनं आपला धंदेवाईक नियम मोडला होता.

नव्हे! माझ्या हातात हुकुमाचं पानच देऊन गेला होता तो डॉक्टर!

२८ मार्चला रोबियार्डला मी माझ्या ऑफिसात माझ्यासमोर घेतला. तो आल्याआल्याच मी त्याची कडाडून हजेरी घेण्यास सुरुवात केली. त्याच्या अलीकडच्या कारवायाची मला खडान्खडा माहिती आहे असं त्याला सांगून त्याच्याविरुद्ध असलेले अनेक पुरावे मी त्याच्यासमोर टाकले आणि म्हणालो, "मनात आणलं तर या पुराव्यांच्या आधारे मी तुला केव्हाही आत अडकवू शकतो." त्यानंतर त्याची फाइल चाळण्याचं नाटक मी केलं अन थोड्या वेळानं वर बघत म्हणालो, " पण जर तू मला थोडी मदत केलीस तर माझा विचार मी बदलीन तुझ्याकडून मला ब्यूसनबद्दल माहिती हवीय. देणार ?"

"काही माहिती वगैरे मी देणार नाही!" रोबियार्ड रागानं म्हणाला, "तुम्ही म्हणता तो ब्यूसन कोण? मला ठाऊक नाही. तो कुठे आहे हे पण मला माहिती नाही आणि माहिती असतं तरी त्याबद्दल मी तुम्हाला काही सांगितलं नसतं. तुरुंगवास वाईटच पण गोळी खाऊन मरण्यापेक्षा मी तुरुंगात जाणं पसंत करेन!"

त्याचं म्हणणं मी शांतपणं ऐकून घेतलं. त्याची ब्यूसनवरली निष्ठा जबर होती. पण मला त्याच्याकडून माझं काम करवून घ्यायचं होतं.

'चुकतोस तू मॅथ्यू!' मी हळुवार आवाजात पुटपुटलो, 'असा हटवादीपणा करून तुला चालणार नाही. एक महत्त्वाची गोष्ट तू विसरतोस. तिचा जरा विचार कर. तुझी बायको! ती गंभीर आजारानं अंथरुणाला खिळून आहे हे मला ठाऊक आहे. मी तुला 'आत' अडकवलं तर तुला कमीत कमी सहा वर्षं तरी तुरुंगाची हवा खावी लागेल अन् मग तुझ्या बायकोला तू पुन्हा कधीही पाहू शकणार नाहीस! चालेल? तेव्हा आता काय करायचं ते तुझं तू ठरव!'

'मॅथ्यूच्या नजरेत माझ्याबद्दल तीव्र तिरस्कार दाटून आला. त्यानं आपले ओठ विषादानं मुडपले. मी जे काही त्याला सांगितलं होतं तो सुका दम नाही हे त्याला कळून चुकलं होतं.

'नीच. हलकट! तुला माझ्याकडून नेमकं हवाय तरी काय?' कर्कश स्वरात तो म्हणाला.

'मी तुला मघाच सांगितलं! ब्यूसन! ब्यूसन मला सापडायला हवाय.' मी त्याला म्हणालो, 'अन् त्यासाठीच मला तुझी मदत हवीय. तू जर मला मदत केलीस तर बदल्यात तुझं स्वातंत्र्य तुला परत मिळेलच; शिवाय दीड लक्ष फ्रँक्सचं बक्षीसही तुला मिळेल. माझं काम काय आहे ते आता ऐक: मी तुला सॅन्ट तुरुंगात फ्रान्सिस कॅलॉं नावाच्या एका कैद्याबरोबर–त्याच्याच कोठडीत बंद करण्याची व्यवस्था करणार आहे. त्याला ब्यूसनचा ठावठिकाणा ठाऊक आहे. तेव्हा तू त्याच्याशी दोस्ती जुळवायचीस नि ब्यूसनशी कसं संधान बांधता येईल ते बघायचंस. अर्थात त्याअगोदर मी योजलेलं एक नाटक तुला तिथं पार पाडाव लागेल कॅलॉंकडून तुला ब्यूसनचा ठावठिकाणा कळला की, मी तुला लगेच सॅन्ट तुरुंगातून बाहेर घेईन. ओ. के?'

रोबियार्डनं काही उत्तर दिलं नाही; पण त्याचे खांदे खाली झुकले. त्याची मूक संमतीच होती ती. मान खाली घालून तो माझ्या ऑफिसातून बाहेर पडला. त्याच्या वर्मावर बोट ठेवून त्याला अशा तऱ्हेनं कचाटयात पकडल्याबद्दल मला मनोमन वाईट वाटलं; पण इलाज नव्हता ..

त्यानंतर दोन दिवसानीच एका गुदामातला माल चोरल्याच्या 'आरोपा'वरून रोबियार्ड सॅंट तुरुंगात दाखल झाला. कॅलॉंनं रोबियार्डला तुरुंगात येताक्षणीच टिपलं होतं. मी पढवलेलं नाटक उत्तम प्रकारे वठवण्यास रोबियार्डनं सुरुवात केली. सॅंट तुरुंगातील कैद्याना दररोज सकाळी कवायतीकरता तुरुंगाच्या पटांगणात नेण्यात येत असे. तिथे संधी साधून एक दिवस कॅलॉं हळूच रोबियार्डजवळ गेला आणि हलक्या आवाजात पुटपुटला,

'आपल्या लिटल् मॅनची काही खबरबात?'

'कोण लिटल् मॅन? मला कुणी लिटल् बिटल् मॅन ठाऊक नाही!' रोबियार्ड तुटक स्वरात उद्गारला.

'लिटल् मॅन म्हणजे एमिल.' कॅलॉं पुटपुटला, 'डॅम इट्! एमिल ब्यूसन!'

'मला कुणी ब्यूसन ठाऊक नाही.' रोबियार्डनं तडकून उत्तर दिलं, 'आणि हे बघ उगाच माझ्या वाटेला येऊ नकोस. आधीच सांगून ठेवतो!' त्यानं वर दम दिला.

रोबियार्डचा हा तुटकपणा, वागण्यातला त्याचा ताठा, मुजोरपणा कॅलॉंला मनोमन आवडला तुरुंगात नव्यानं दाखल झालेला हा प्राणी फारसं बोलतही नव्हता. सदा आपली स्वारी घुम्म!' कुणाकडेही रोखून बघण्याची त्याची तऱ्हा पाहता हा प्राणी सहजासहजी कुणाला बधणारा नाही हे स्पष्ट होत होतं. अगदी तुरुंगातसुद्धा!

काही दिवस गेल्यानंतर सॅन्ट तुरुंगाच्या स्वागतकक्षात आम्ही मुद्दामच एक नाटक घडवून आणलं. या स्वागतकक्षात कैद्याचे आप्तनातलग नि मित्रमंडळी त्याना भेटायला येत असत. तर या स्वागतकक्षात मॅथ्यू रोबियार्डनं एका रक्षकावर 'प्राणघातक' हल्ला चढवला. चार चार रक्षकाना तो आवरेना. शेवटी कसं तरी करून त्याला पकडण्यात आलं आणि त्याला कॅलॉंच्या लगतच्या कोठडीत बंद करण्यात आलं त्याच्या कोठडीबाहेर 'अत्यंत घातकी' अशी पाटी लटकावण्यात आली. या नाटकात रोबियार्डनं आपला पार्ट फारच उत्तम रीतीनं वठवला.

रोबियार्ड लगतच्या कोठडीत आल्यामुळं कॅलॉंला मनातून बरंच वाटलं. त्यानं आस्ते आस्ते रोबियार्डशी घसट वाढवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला रोबियार्ड त्याच्याशी जरा ताठ्यानं वागला; पण कॅलॉंनं त्याच्या कलाकलानं घेतल्यानंतर स्वारीनं मैत्रीचा हात

## "तिचा जरा विचार कर - तुझी बायको"

पुढं केला. हळूहळू त्यांच्यात दोस्ती जमली नि पुढं तिचं आपुलकीत रूपांतर झालं. मधल्या भिंतीतल्या हवा खेळण्याच्या झरोक्यातून ते एकमेकांशी गप्पा मारू लागले. आपल्या बायकाविषयी, आपल्या व्यक्तिगत जीवनाविषयी नि इतर अनेक सटरफटर विषयावर त्यांच्या गप्पागोष्टी चालत; पण एक कॅर्लोशीच काय तो रोबियार्ड आपुलकीनं वागे. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांवर नि रक्षकांवर तो जबरदस्त खार खाऊन होता. रक्षकांच्या अंगावर तो धावून जात असे. अशा वेळी कॅर्लो त्याला समजावण्याचा प्रयत्न करी. कॅर्लोचं तो मग कधीमधी ऐके. रोबियार्ड आपली भूमिका तर उत्तम प्रकारे बजावत होता. कॅर्लोशी गप्पागोष्टी करताना एमिलबद्दलचा विषय त्यानं कधीही काढला नाही. त्याबाबतीत कॅर्लो आपला हात केव्हा पुढे करतो याची तो सावधपणे वाट पाहत होता.

असे वीस दिवस गेले. या दरम्यान रोबियार्ड अधिकाधिक बेफाम नि उन्मत्त बनत गेला. तुरुंगाच्या रक्षकांवर तो आता जास्तच त्वेषानं धावून जाऊ लागला. आपण आमरण उपोषण करू अशा धमक्या तो तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना देऊ लागला. तुरुंगातल्या इतर कैद्यामध्ये त्यानं आपली जबरदस्त दहशत उत्पन्न केली. फक्त त्याच्या लगतच्या कोठडीतल्या कैद्याची–कॅर्लोची–मात्र त्याच्यावर थोडी पकड दिसत होती. त्याचं तो थोडं-फार ऐकत होता; पण एरवी गडी जाम पिसाळल्यागत झाला होता.

अशातच एक दिवस गव्हर्नरनं फ्रान्सिस कॅर्लोला आपल्या ऑफिसात बोलावून घेतलं आणि तो त्याला म्हणाला,

'या रोबियार्डनं आम्हाला भलताच ताप आणलाय्. हल्ली फारच बेफाम बनलाय तो; पण तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडून मला असं समजलंय की, तुझ्याशी त्याचं चांगलं सूत जमतं. तुझं तो ऐकतो. तुझ्या संगतीत त्याला ठेवला तर तो शांत होईल असा माझा अंदाज आहे. त्याला आवर घालणं जरुरीचं आहे. समजा जर मी त्याला तुझ्या कोठडीत–तुझ्या समवेत–ठेवला तर तो निवळेल ? तुला काय वाटतं ?'

'काही कल्पना नाही साहेब !' कॅर्लो म्हणाला.

'मला वाटतं आपण प्रयत्न करून बघायला हरकत नाही. आपला हेतू सफल झाला तर ठीकच. नाही तर पुन्हा त्याला वेगळ्या कोठडीत ठेवता येईल किंवा अन्य काही तरी व्यवस्था करता येईल. चालेल ?'

'माझी काही हरकत नाही साहेब !' कॅर्लो बोलला.

दुसऱ्याच दिवशी रोबियार्डला कॅर्लोच्या कोठडीत हलवण्यात आल आणि गव्हर्नरच्या 'अपेक्षे'प्रमाणेच ते दोघे लवकरच एकमेकाचे जानी दोस्त बनले !

□

२६ मे १९५० ! या दिवशी सकाळी नऊ वाजता सॅन्ट तुरुंगाबाहेर मोटारीत थांबून आम्ही रोबियार्डच्या सुटकेची वाट बघत होतो दोन तास होऊन गेले होते. अखेर रोबियार्ड बाहेर आला. तुरुंगाच्या भव्य प्रवेशद्वाराच्या उंबरठ्याशी तो काही क्षण घुटमळला. नंतर लांब लांब ढांगा टाकत तो आमच्या गाडीकडे आला नि गाडीत शिरून बसला. मी त्याच्याकडं प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं.

'एमिल कुठं दडलाय हे फ्रान्सिसला ठाऊक नाहीये; पण त्याचा मेव्हणा एमिलशी संधान बांधून आहे. फ्रान्सिसनं मला त्याची गाठ घ्यायला सांगितलंय. मी व्यूसनच्या टोळीत सामील व्हावं म्हणून माझी शिफारस करणारी एक चिठ्ठीही त्यानं एमिलच्या नावे दिलीय. माझ्या कोटाच्या खाद्यावरच्या पॅडमध्ये ती चिठ्ठी शिवलेली आहे.' रोबियार्डनं एका दमात सगळी माहिती दिली.

चला ! म्हणजे माझा प्रयत्न अगदीच काही वाया गेला नव्हता.

आम्ही हेडक्वार्टर्सवर परतलो. तिथं काही सेकंदांतच मी रोबियार्डच्या कोटाच्या खाद्याचं पॅड उसवलं. आत मला कागदाचा एक चौकोर तुकडा मिळाला. त्यावर अत्यंत अशुद्ध भाषेत मजकूर होता : 'प्रिय एमिल, माझा एक मित्र मी तुझ्याकडे पाठवतोय. तो अगदी उत्तम आहे. कणखर, निर्भीड, बिनधास्त–अगदी तुला हवा तसा आहे. मी त्याला सर्व बाजूंनी पारखला आहे. तू त्याच्यावर पूर्णपणे विश्वास टाकू शकतोस. ऑल द बेस्ट !

फ्रान्सिस कॅर्लो'

ती चिठ्ठी मी रोबियार्डला दिली आणि फ्रान्सिस कॅर्लोच्या मेव्हण्याची शक्य तितक्या लौकर गाठ घेण्यास मी त्याला सांगितलं.

त्यानंतर दोन दिवस गेले. २९ मेची सकाळ उजाडली. त्या दिवशी मार्लिसबरोबर मी माझा ब्रेकफास्ट घेत होतो. समोरच्या डिश्मधले पदार्थ खात होतो; पण चित्त ठिकाणावर नव्हतं. रोबियार्डकडून काही तरी महत्त्वाचा संदेश यावा म्हणून मी उतावीळ बनलो होतो. अत्यत अस्वस्थ झालो होतो. तितक्यात टेलिफोनची बेल वाजली. चट्कन उठून मी रिसिव्हर उचला. तो रोबियार्डचाच फोन होता. त्यानं मला प्लेस द ऑपेरा विभागातल्या कॅफे डी ला-पा नावाच्या कॅफेमध्ये तातडीनं बोलावलं होतं. ब्रेकफास्ट अर्धवटच टाकून मी घाईघाईनं कपडे चढवू लागलो. मार्लिस माझ्याकडे नवलानं पाहू लागली.

'हा एमिल काही तुला स्वस्थ बसू देत नाही !' माझी धादल पाहून ती म्हणाली.

'त्याला पकडल्याशिवाय मला स्वस्थता लाभणार नाही!' तिच्या ओठाचं चुंबन घेऊन तिचा निरोप घेत मी म्हणालो.

मी त्या कॅफेवर पोचलो तेव्हा रोबियार्ड तिथं माझी वाटच बघत होता. 'जमवलं अखेर मी सगळं ! ' मी खुर्ची घेताच मला तो म्हणाला, 'फ्रान्सिसचा मेव्हणा उद्या सकाळी दहा वाजता मला एमिलकडं घेऊन जाणार आहे. त्यान मला त्याचा पत्ता सांगितला नाही; पण तो बोलोन विभागात कुठे तरी दडून आहे असं मला त्याच्या बोलण्यातून समजलं. एमिल सध्या आर्थिक तंगीत आहे असं त्यानं मला सांगितलं. तेव्हा मी त्याला वीस हजार फ्रँक्स द्यायचं कबूल केलं आहे'.

नाखुषीनंच मी खिशातून तेवढी रक्कम काढून त्याला दिली. 'ठीक ! पुढे बोल !'

'एमिलला एक पिस्तूलही हवाय ! आणि बरोबर काही गोळ्या पण ! '

'काय ? पिस्तुल ? तुला वेड-बीड लागलंय की काय ? व्यूसनला पिस्तुल द्यायचं ? म्हणजे आम्ही जेव्हा त्याला पकडायला जाऊ तेव्हा तो चाळणच करेल की आमच्या देहाची ! छे ! भलतंच !' विजेचा

झटका बसावा त्याप्रमाणे मी म्हणालो

'त्याची फिकीर मी कशाला करू ? " ती काळजी तुम्ही करायची डिटेक्टिव्हसाहेब ! हा सरळ सरळ सौदा आहे. पिस्तुल नाही तर मग ब्यूसनही नाही. आणि हो. आणखीही एक गोष्ट सांगायची आहे. उद्या मी जेव्हा ब्यूसनकडे जाईन तेव्हा माझा पाठलाग होता कामा नये !' पाय लांब ताणून आरामशीरपणे बसत रोबियार्ड म्हणाला.

रोबियार्डच्या अटी मान्य केल्यावाचून गत्यंतरच नव्हतं. त्याच्या या अटी जेव्हा मी आमच्या ढोलबाच्या कानांवर घातल्या तेव्हा त्यांनीही त्यावर विशेष हरकत घेतली नाही. त्याचं उद्दिष्ट एकच होतं. काहीही करून एमिलला पकडणं ! पण चोर आणि शिपाई यांच्या या विलक्षण संघर्षातले–या वेगळ्याच तऱ्हेच्या शिकारीतले–नियम असेच असतात. कधीकधी मनाला न पटणाऱ्या गोष्टींना देखील मान्यता द्यावी लागते. कारण त्यावरही कामगिरीचं यश अवलंबून असतं.

रोबियार्डशी माझी पुढली भेट झाली तेव्हा कागदात नीट बांधलेलं–दोरा गुंडाळलेलं–एक छोटं पार्सल मी त्याच्या हवाली केलं. त्यात मॉसियर एमिलकरता पिस्तुल होतं. अर्थात ते पोलिसखात्यातलं-सरकारी नव्हतं तर ·९ मि. मि. माऊसर जातीचं होतं. बरोबर काही गोळ्याही होत्या...

'कामगिरी फत्ते झाली !' दुसऱ्या दिवशीच्या भेटीत रोबियार्डनं मला सांगितलं, 'मी प्रत्यक्ष ब्यूसनला भेटलो. पिस्तुलाचं पार्सल जेव्हा मी त्याला दिलं तेव्हा त्याचा चेहरा आनंदानं अगदी फुलून आला. त्यानं माझ्यावर आणखी एक काम सोपवलंय. त्याला सुरक्षितपणे दडून राहता येईल असं एखादं शांत नि निवांत ठिकाण मी शोधून काढावं असं त्याचं म्हणणं आहे.' 'साधारण कोणत्या भागात राहण्याची त्याची इच्छा आहे ?' मी विचारलं. 'ते सर्व त्यानं माझ्यावर सोपवलंय. तुम्हाला असलं एखादं निवांत ठिकाण ठाऊक आहे ?' रोबियार्डनं प्रश्न केला.

भले ! या खुन्याला आरामात राहता यावं असं एखादं निवांत ठिकाण मी आता शोधून काढायचं ? हा आणखी काय काय मागण्या करणार ? संतापाची एक तिडीक माझ्या मस्तकात गेली; पण दुसऱ्याच क्षणी मी माझ्या रागाला आवर घातला आणि एक विलक्षण विचार माझ्या मनात डोकावला. ब्यूसनला एखाद्या शांत निवांत ठिकाणी नेऊन ठेवलं तर तिथं कमीत कमी रक्तपात होऊन मी त्याला धरू शकणार होतो. कदाचित रक्तपाताची वेळही येणार नाही–माझ्या मनात आलं.

म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी एका गाडीनं आम्ही नॉर्मंडीकडं निघालो. एमिलला दडण्यायोग्य एखादं योग्य ठिकाण पहायला ! आम्ही कुठं जात आहोत याची बरोबर असलेल्या रोबियार्डला कल्पना नव्हती; पण इव्हां मागे टाकून आम्ही सुमारे दहा किलोमीटर पुढे गेलो तेव्हा रोबियार्डच्या नजरेला ऑबर्ग डी ला ओदू नावाचं एक हॉटेल पडलं. काही क्षण तो विचारमग्न झाला. तोवर आमची गाडी थोडी पुढं निघून गेली होती अन् अचानक रोबियार्ड उद्गारला, 'थांबा ! मघा मागं गेलं ते हॉटेल माझा एक दोस्त चालवतो. तिथंच काही जमलं तर पाहू ! उगाच पुढं जाण्यात काय अर्थ आहे ?'

आम्ही गाडी थांबवली. ड्रायव्हरबरोबर मी खाली उतरलो आणि मग गाडी रोबियार्डला देऊन आम्ही त्याला माघारी त्या हॉटेलकडे पिटाळला. हॉटेलमालकाला संशय यायला नको म्हणून त्यानं एकट्यानंच जाणं ठीक होतं. तिथं जेवण घेता घेता आपल्या दोस्ताला–एमिलला–ठेवून घेण्यासाठी तो हॉटेलमालकाला पटवणार होता.

मी आणि माझा ड्रायव्हर–आम्ही दोघं–रस्त्याच्या कडेला थांबलो आणि सँडविचेस चघळत वेळ घालवू लागलो.

सुमारे दोन तासानंतर रोबियार्ड गाडी घेऊन परत आला. तो खुषीत दिसत होता. त्याचा हॉटेलवाला मित्र एमिलला आपल्या हॉटेलात ठेवून घेण्यास तयार झाला होता. पैशाचा विषयसुद्धा त्यानं काढला नव्हता ! निश्चित पण सोत्सुक मनानं आम्ही पॅरिसला परतलो. ठरलेल्या हॉटेलात एमिलला नेऊन सोडण्यास नि नंतर मला फोननं तसं कळवण्यास सांगून मी रोबियार्डला निरोप दिला.

दुसरा सबंध दिवस मी आणि ढोलबांनी कमालीच्या अस्वस्थतेत कसाबसा रेटला. आम्हा दोघांच्याही चित्तवृत्ती अत्यंत अस्थिर झाल्या होत्या. अखेर संध्याकाळी सहा वाजता टेलिफोन घणघणला. मी उत्सुकतेनं रिसिव्हर उचलून कानाला लावला. रोबियार्डचाच फोन होता. 'आपलं 'पार्सल' सुखरूपपणे मुक्कामावर पोचलं' त्यानं सांकेतिक भाषेत संदेश दिला. याचा अर्थ एमिल ऑबर्ग डी ला ओदू हॉटेलात पोचला होता.

थोड्या वेळानंतर रोबियार्ड स्वतः आमच्या ऑफिसात आला. ते हॉटेल आणि भोवतालचं वातावरण पाहून एमिल अगदी खूष होऊन गेल्याचं त्यानं आम्हाला सांगितलं. एमिलला तळमजल्यावरची एक हवेशीर नि प्रशस्त खोली देण्यात आली होती. खोलीच्या पाठच्या खिडकीतून दूरवर पसरलेली हिरवीगार कुरणं नि त्यात मुक्तपणं चरणाऱ्या गाईंच्या कळपांचं मनोहर दृश्य दिसत होतं. हॉटेलातले खाद्यपदार्थ उत्तम होते. एमिलला तिथं जणू नवजीवन मिळाल्याचाच आनंद झाला होता.

'माझ्याकडनं जेवढं करता येण्यासारखं होतं तेवढं मी केलं साहेब !' रोबियार्ड आम्हाला म्हणाला.

'थँक्स ! आता तो लुच्चा फक्त आमच्या हातात आला पाहिजे !' ढोलबा त्याला म्हणाले. रोबियार्डनं आपली भूमिका खरोखरच अतिशय तन्मयतेनं बनवली होती. पुढला भाग आता दैवाधीन होता. रोबियार्डचे आभार मानून आम्ही त्याला निरोप दिला.

□

१० जून १९५० ! हा दिवस कदाचित माझ्या आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा दिवस ठरणार होता. आम्ही एमिलला पकडायला जाणार होतो ! गेली तीन वर्षे तो मला सतत हुलकावण्या देत होता. आज नशिबानं साथ दिली तर माझं हे मोठं सावज माझ्या हाती गवसणार होतं...

आदली सबंध रात्र मी झोपेविना घालवली होती. माझ्या मनावर एक प्रकारचं विलक्षण दडपण आलं होतं. एमिलची केस ही माझ्या आयुष्यातली सर्वाधिक महत्त्वाची केस होऊन बसली होती. तीन वर्षं मी त्याचा जीव तोडून पाठलाग चालवला होता आणि काही वेळा

तर तो माझ्या हातून अगदी थोडक्यानं निसटला होता! मॉसेयर एमिल ब्यूसन! अंडरवर्ल्डचा राजा! गुन्हेगारांचा बादशहा! आज मी त्याच्यावर झडप घालणार होतो. हंटर रॉजर बॉर्निक्! 'सुरेट' चा शिकारी!

मार्लिसबरोबर मी सकाळचा ब्रेकफास्ट घेतला. खाण्यात चित्त असं नव्हतंच! कारण आजच्या मोहिमेसंबंधीचे विचार डोक्यात भिरभिरत होते. माझ्या या मोहिमेसाठी मी माझ्या एका वकील मित्राची वेगवान मोटार उसनी घेतली होती. मार्लिसही माझ्याबरोबर येणार होती. मॉसेयर एमिलला अटक करण्याच्या या अखेरच्या प्रयत्नात माझ्याबरोबर येण्याचा हट्ट तिनं धरला होता. थोड्याच वेळानं आमचे चीफ–ढोलबा–माझ्या घरी येऊन थडकले. मग आम्ही एकंदर मोहिमेचा तपशील ठरवला. मी आणि मार्लिसनं आमच्या गाडीनं ऑबर्ग डी ला ओदू या हॉटेलात अगोदर जायचं असं ठरलं. ढोलबा आमच्या पाठोपाठच येणार होते. त्या हॉटेलापासून काही अंतर अलीकडे आपली गाडी सोडून ते पायीच त्या हॉटेलावर येणार होते नि हॉटेलाच्या पिछाडीस दडून बसणार होते. संधी साधून मी एमिलवर झडप घालायची आणि माझ्या इशारतीसरशी ढोलबांनी आत धावत यायचं असा एकंदर बेत ठरला. 'चला! आज काही तरी सोक्षमोक्ष लागू दे!' निघण्यापूर्वी ढोलबा मला म्हणाले, 'तू तुझं पिस्तुल बरोबर घेणार आहेस?'

'नाही!'

'मूर्ख आहेस तू बॉर्निक्!' ढोलबा गरजले, 'अगदी खरा मठ्ठोबा आहेस. ब्यूसनसारख्या महाघातकी गुंडाशी गाठ आहे नि तू पिस्तुल नेणार नाहीस? एरवीची गोष्ट वेगळी असते; पण जाऊ दे! तो तुझा प्रश्न आहे. बरं! हातकड्या तरी बरोबर घेणार आहेस का?'

'मार्लिस आपल्या बॅगेत त्या बरोबर घेणार आहे. मला जरूर लागली की ती मला ऐनवेळी देईल!'

'वेल्! गुडलक बॉर्निक्.' माझा हात घट्ट दाबत, माझ्या डोळ्यात खोल बघत, माझ्याशी हस्तांदोलन करत, ढोलबा म्हणाले. त्यांच्या हस्तस्पर्शानं मला खूप बरं वाटलं. धीर आला. चला! वेळ झाली होती.

मार्लिसला समवेत घेऊन मोटारीनं मी इव्हांच्या दिशेनं निघालो. आमच्या पाठी 'सुरेट'च्या एका गाडीतून एका दुसऱ्या इन्स्पेक्टरबरोबर येत होते आमचे चीफ्–ह्यूबर्ट व्हिचि–ऊर्फ ढोलबा!

माझी गाडी नॉर्मंडीतल्या ऑबर्ग डी ला ओदू हॉटेलसमोर पोचली. हॉटेलाच्या पोर्चसमोर दोन पेट्रोलपंप होते. पंपासमोर मी गाडी थांबवली आणि जोरानं हॉर्न वाजवून दार उघडून बाहेरच्या स्वच्छ सूर्यप्रकाशात उतरलो. मी अंगात एक ऐटबाज सूट चढवला होता. त्यावरून मी कुठल्या तरी कंपनीचा एक्झिक्यूटिव्ह आहे असं कुणालाही वाटलं असतं. कमरेवर हात ठेवून मी वाट पाहू लागलो. काही मिनिटांतच त्या हॉटेलच्या मालकाची बायको बाहेर आली. ती माझ्याजवळ आली तेव्हा मी तिला म्हणालो, 'गाडीत पेट्रोल भरायचंय! पण त्याअगोदर जरा ऑइल चेक करता?'

'होय साहेब!' सस्मित मुद्रेनं ती म्हणाली

पुढे होऊन मी माझ्या लांबलचक गाडीचं बॉनेट उचललं; पण ते अडवून धरणारा बार त्याला नव्हता. त्यामुळं हातानी आधार देऊन ते जड बॉनेट मला धरून ठेवावं लागलं. फडक्यानं डिप्स्टिक् पुसत हॉटेलमालकीण माझ्याजवळ आली. त्याच वेळी–

हॉटेलच्या प्रवेशद्वारात अचानक एक बुटका माणूस अवतीर्ण झाला. त्याचे केस काळेभोर होते. विशेष म्हणजे त्याचे डोळे गडद काळ्या रंगाचे होते आणि नजर भेदक, काळजाचा आरपार वेध घेणारी होती. त्यानं माझ्याकडे एक तीक्ष्ण कटाक्ष टाकला. नंतर माझ्या गाडीवरून नजर फिरवली.

एक थंड शिरशिरी माझ्या सर्वांगातून सरसरत गेली. माझ्यासमोर उभा असलेला नि आपल्या कुप्रसिद्ध नजरेने माझे निरीक्षण करणारा तो बुटका माणूस–

मॉसेयर एमिल ब्यूसन होता!

गेली तीन वर्षं ज्याला पकडण्याकरता मी जिवाचा आटापिटा करत होतो अन वेळोवेळी माझ्या हातनं जो निसटून जात होता तो अंडरवर्ल्डचा बादशहा मॉसेयर एमिल माझ्यासमोर उभा होता! गेली तीन वर्षं मला सतत झुकांड्या देऊन त्यानं दरवेळी माझा तेजोभंगच केला होता. अन् आज पहिल्यादाच त्याला मी प्रत्यक्ष पाहत होतो!

माझ्यापासून अवघ्या सहा फुटांवर तो उभा होता. गाडीचं बॉनेट उचलून धरण्यात माझे दोन्ही हात गुंतले होते म्हणून, नाही तर कदाचित मी त्याच्या अंगावर झेपच टाकली असती; पण मी जरा धीरानं घ्यायचं ठरवलं. कारण एमिलला माझा थोडासुद्धा संशय आला असता तर त्यानं क्षणार्धात मला गोळी घातली असती. एक अतितल्लख पिस्तुलबाज म्हणून असलेली त्याची ख्याती मी विसरलो नव्हतो अन् म्हणूनच तो मोहाचा क्षण असूनही मी काही हालचाल केली नाही.

काही वेळ माझं निरीक्षण करून ब्यूसन वळला आणि हॉटेलच्या अंतर्भागात अदृश्य झाला. मी माझ्या घड्याळाकडे नजर टाकली. दुपारचे १२–२० झाले होते. हॉटेलमालकीणीनं ऑइल तपासल्यानतर मी बॉनेट बंद केलं आणि तिला म्हणालो,

'आम्ही इथं लंच घ्यावं म्हणतो. आमच्या जेवणाची व्यवस्था होईल?'

'हो. जरूर!' ती म्हणाली.

मार्लिसबरोबर मी हॉटेलात प्रवेश केला. आत प्रशस्त डायनिंगहॉल होता. हॉलच्या उजव्या हाताला बार होता आणि बारच्या पाठी एका झुलत्या दारापलीकडे किचन होतं. हॉलच्या मध्यभागी एका खिडकीनजीक असलेलं टेबल मी निवडलं. मार्लिस माझ्या विरुद्ध बाजूला बसली.

'दिसतोय का कुठं तो?' अगदी हलक्या आवाजात तिनं मला विचारलं.

'ऊं हुं! किचनटेबलाजवळ हॉटेलमालकाखेरीज दुसरं कुणी दिसत नाहीये!' मी पुटपुटलो.

हॉटेलमालकानं आमच्या टेबलावर खाद्यपदार्थांच्या डिशेस् आणून ठेवल्या. वेळ घालवत अगदी सावकाश आम्ही जेवू लागलो. आमचं जेवण अर्ध्यावर आलं होतं तेव्हा मार्लिसनं टेबलाखालून पायानं मला अगदी हळूच ढोसलं.

'तो बघ! तो आला!' हळूच ती मला म्हणाली, 'हॉलच्या

टोकाला किचनच्या जवळ असलेल्या टेबलाशी बसून त्यानं जेवणाला सुरुवात सुद्धा केली. तो आपल्याकडे तोंड करून बसलाय!'

तिचं शेवटलं वाक्य मला खटकलं तो बसला होता ते टेबल आमच्या टेबलापासून साधारण पंचवीस फुटांवर होतं आणि काही तरी सबळ कारणाविना मला एमिलजवळ जाता येणार नव्हतं. त्याला थोडा जरी संशय आला असता तरी आपल्या माऊसरनं त्यानं माझ्या शरीराची चाळणच केली असती. काय कारण काढून उठावं याचा मी विचार करू लागलो. अखेर माझा नॅपकिन टेबलावर ठेवून मी उठलो आणि किचनकडे चालू लागलो. मी तिकडे कशासाठी चाललो होतो आणि तिथं जाऊन काय सबब काढणार होतो हे माझं मलाही ठाऊक नव्हतं. जाता जाता डोळ्याच्या कोपऱ्यातून मी ब्यूसनकडे क्षणार्ध नजर टाकली. मी टेबलापासून हलताच त्यानं आपलं खाणं तट्‌कन थांबवलं होतं आणि तो माझ्या हालचालीकडे टक लावून पाहात होता. त्याची नजर खरोखरच गोठवणारी होती. आपल्या उजव्या हातातली सुरी त्यानं बशी-शेजारी ठेवली आणि त्याचा उजवा हात आता हळुच त्याच्या पँटच्या खिशाकडे सरकला. क्षणभर मी गर्भगळितच झालो पण तसाच चालत किचनच्या झुलत्या दाराशी पोचलो. ओह्! माझी जीभ कोरडी पडली होती; पण पुढल्याच क्षणी माझ्या तोंडून इतक्या दृढ आवाजात शब्द बाहेर पडले की माझं मलाच आश्चर्य वाटलं. किचनच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यात भिंतीवर मला एक टेलिफोन दिसला होता. मनानं टिपलेली ही गोष्ट प्रतिक्षिप्तक्रियेनं सबबीच्या रूपात माझ्या तोडून बाहेर पडली.

"मॅडम! मला इथनं दूव्हिलला फोन करता येईल?"

"हो जरूर! कोणता नंबर तुम्हाला हवा?" हॉटेल मालकिणीनं विचारलं.

"दूव्हिल, ४३२," आयत्या वेळी जो सुचला तो टेलिफोननंबर ठोकून देत मी उत्तरलो.

"ठीक! मी एक्सचेंजकडे नंबर मागते. थोडं थांबा!" ती म्हणाली.

मी माझ्या टेबलाकडे परतलो नि खुर्चीवर बसलो. हॉटेल मालकिणीनं रिसिव्हर उचलला, एक्स्चेंजकडे नंबर मागितला आणि रिसिव्हर पुन्हा जागेवर ठेवला नंतर किचनच्या झुलत्या दाराशी येऊन ती म्हणाली, "थोड्या वेळानं त्यांचा फोन येईल." अन् ती आत निघून गेली.

समोरच्या बशीतले पदार्थ मी सावकाशपणे खाऊ लागलो. काही मिनिटं गेली आणि टेलिफोनची बेल वाजू लागली. माझे स्नायू एकदम ताठरले. शरीर तल्लख झालं. पटकन् उठून मी पुन्हा किचनकडे वाटचाल करू लागलो. त्या दरम्यान एमिलशी माझी दोनदा नजरानजर झाली. ती भेदक नजर पाहून क्षणभर माझ्याही उरात धडकी भरली. तितक्यात झुलतं दार लोटून हॉटेलमालकीण बाहेर आली आणि माझ्याकडे पाहात आश्चर्यानं म्हणाली, "तुम्ही सांगितला तो नंबरच नाहीये असं ते म्हणतायत."

माझ्या तोंडाला एकदम कोरडच पडली; पण दुसऱ्याच क्षणी स्वत:ला सावरून आवाजावर शक्य तितका ताबा ठेवत मी म्हणालो,

"नंबर नाही म्हणजे काय? तो माझ्या क्लिनिकचा नंबर आहे. पुन्हा प्रयत्न करून बघता का प्लीज्?"

"बघते हं!" ती म्हणाली आणि वळून आत गेली.

एमिलनं अजून काहीही हालचाल केली नव्हती. पण त्याचा उजवा हात त्याच्या पँटच्या खिशात त्याच्या पिस्तुलाभोवती आहे हे मला त्याच्याकडे न पाहताही कळलं होतं.

दुसऱ्या खेपेला मी माझ्या टेबलाकडे परतलो आणि खुर्ची घेतली. टेबलावरचा मद्याचा ग्लास उचलून एका दमात मी ते पिऊन टाकलं. काही मिनिटांनीच हॉटेलमालकीण पुन्हा झुलत्या दाराशी आली आणि मला म्हणाली, "तुमचा फोन लागलाय सर! मघा ऑपरेटरनं रॉंग नंबर लावला होता चुकून"

खुर्ची सारून मी पुन्हा किचनच्या दिशेनं चालू लागलो. या खेपी ब्यूसनपासून अवघ्या तीन फुटावरनं गेलो तो खुनी भलताच सावध होता. माझ्या हालचाली पाहून तो खुर्चीत वळला. त्याची भेदक नजर माझ्यावरच खिळलेली होती. झुलत दार लोटून मी सरळ किचनमधे गेलो आणि रिसिव्हर कानाला लावला.

"हॅलो! ल रोझेज क्लीनिक? प्रो डॉक्टर आन्द्रे बोलतोय. दूव्हिल रोडवरून. मी आज जरा उशिरा येईन. मला परतायला साधारण दोड तरी वाजेल. लेबॉरेटरीला मी सकाळी सांगितलेल्या टेस्टस् करून ठेवायला सांगा. तिथं आल्यावर मी रिझल्टस् पाहीन!" एवढं एका दमात बोलून मी फोन बद केला. माझ्या या सबंध बोलण्यादरम्यान टेलिफोनवरला पलीकडचा आवाज सारखा म्हणत होता,

"अहो! पण हे क्लिनिक नाहीये! ही दफनभूमी आहे."

फोन ठेवून किचनचं झुलतं दार लोटून मी बाहेर पडलो. मार्लिस डोळ्याच्या कोपऱ्यामधून माझ्या हालचाली बघत होती. आताच झटकन काही तरी हालचाल करायची! मी मनाशी निश्चय केला. आत्ताच! नाही तर कधीच नाही! ब्यूसन खाण्यात गुंगला होता. त्याचे दोन्ही हात टेबलावर होते. आमच्यात अवघं तीन फूट अंतर होतं आणि—

मी एकदम झडप घातली!

माझे दोन्ही हात ब्यूसनच्या खाकामधून घालून घट्ट आवळत त्याला खुर्चीतून वर उचलला. त्या धडकीनं टेबलावरची बशी उपडी झाली नि त्याच्या हातातली सुरी, काटा टेबलावर पडला. ब्यूसन बुटका होता; पण चांगलाच ताकदवान होता. माझ्या पकडीतून सुटण्यासाठी जोराची धडपड करत अर्धवट घुसमटलेल्या आवाजात धापा टाकीत तो म्हणाला, "हा काय प्रकार आहे? तुम्हाला काय वेडबीड लागलंय काय?"

"एमिल! तू संपलास!" आपली मगरमिठी आणखी घट्ट करत मी घोगऱ्या स्वरात त्याला म्हणालो.

इतक्या विद्युत्‌गतीनं मी त्याच्यावर झडप घातली होती की त्याला हालचाल करायला उसंतही मिळाली नव्हती. मी ब्यूसनला आढी घालताक्षणीच मार्लिसनं आपल्या बॅगेतून हातबेड्या काढल्या

## आत्ताच! नाही तर कधीच नाही....

आणि सुळकन पळत ती आमच्याजवळ आली. खट्, खट्. दोन खण-खणते आवाज झाले आणि एमिलच्या हातात बेडया पडल्या! अतिशय चपळाईनं मार्लिसनं आपलं काम उरकलं होतं.

आता मात्र व्यूसनचा चेहरा पांढराफटफटीत पडला. काही तरी अद्वातद्वा बोलत तो शिव्या घालू लागला; गुरगुरू लागला. चित्र-विचित्र आवाज त्याच्या घशातून येत होते; पण आता मला त्याची पर्वा नव्हती. त्याच्या पॅंटच्या खिशात हात खुपसून मी त्याचं मारुसर पिस्तुल काढून घेतलं आणि सुटकेचा निःश्वास सोडला!

"गुड् जॉब!" व्यूसन अचानक म्हणाला. तो आता निवळला होता.

आणि मी? उत्तेजित बनल्यामुळं मी डोक्यासून पार पायांपर्यंत उभा थरथरत होतो.

आमचा धिंगाणा ऐकून हॉटेलमालक-मालकीण धावतच बाहेर आली होती. ती दोघंही आमच्याकडे आश्चर्यानं पाहू लागली.

"ड्रिंक घे थोडंस म्हणजे बरे वाटेल." माझी अवस्था बघून व्यूसन बोलला. आपला खेळ खलास झालाय हे त्याला कळून चुकलं होतं.

"बरोबर आहे त्याचं म्हणणं! मॅडम! दोन ब्रॅंडी आणा प्लीज!" हॉटेलमालकिणीकडे बघत मार्लिस मजेत बोलली.

मी इषारतीची शीळ घालताच किचनच्या एका उघडया खिडकी-तून ढोलबांनी चक्क आत उडी मारली आणि धावतच ते डायनिंग-हॉलमध्ये आले. व्यूसनला मी जेरबंद केलेला पाहताच त्यांचा चेहरा आनंदानं फुलून आला.

"बॉनिक" उत्साहानं ते ओरडले, "या क्षणापासून तू चीफ इन्स्पेक्टर झालास असं समज!"

☐

अंडरवर्ल्डचा कुप्रसिद्ध बादशहा एमिल व्यूसनला आम्ही १० जून रोजी म्हणजे शनिवारी दुपारी अटक केली होती. त्याच्यावर रीतसर आरोप ठेवण्यात आलेले नव्हते; पण सबंध रविवारचा दिवस त्याची उलट तपासणी चालू राहिली. मॉंसियर एमिलच्या अटकेची ही सनसनाटी बातमी ढोलबानी सोमवारपर्यंत अत्यंत गुप्त राखली होती. सोमवारी सकाळी ९ वाजता त्यांनी वृत्तपत्रप्रतिनिधींना या नाट्यपूर्ण घटनेचा संपूर्ण तपशील दिला.

"आमच्या प्रतिस्पर्धी एजन्सीज् गेले तीन वर्षं आमच्या यशात सारखी खीळ घालत होत्या. आम्ही जाळं लावायचं-प्रकरण चांगलं शिजवत आणायचं आणि आयत्या वेळी नाक खुपसून या लोकांनी पचका करायचा नि आमच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घ्यायचा असला प्रकार चालला होता; पण अखेर आम्ही व्यूसनला पकडलंच! ते सुद्धा इव्हींमध्ये नव्हे तर पोत्र डी सेंट क्लॉ विभागातल्या एका रेस्टॉरंटमध्ये! म्हणजे प्रिफेक्चर डिटेक्टिव्ह एजन्तीच्या अगदी पाठच्या अंगणातच आम्ही एमिल व्यूसनला अटक केली असं म्हणा!" ढोलबानी अभिमानान त्याना सांगितलं.

व्यूसनला अटक केल्यापासून ढोलबा विशेष खुशीत होते. व्यूसनला अटक झाल्यानंतर-आम्हाला बहुमोलाची मदत करणाऱ्या मॅथ्यू रोबियार्डनं-बक्षिसाचे दीड लक्ष फ्रॅंक्स निर्धास्त मनानं खिशात घातले माझ्या शब्दाप्रमाणे त्याच्यावरले उर्वरित आरोप दूर केले गेले नि त्याला त्याचं स्वातंत्र्य परत मिळालं. माझे पुन पुन्हा आभार मानून तो माझ्या ऑफिसकॅबिनमधून बाहेर पडला. मलाही मनस्वी समाधान वाटलं. एखादी कामगिरी पार पाडण्याकरता एखाद्या गुन्हेगारालाच हाताशी धरून, त्याच्या वर्मावर बोट ठेवून दडपणाखाली आणून आपला कार्यभाग साधून घेण्याची माझी युक्ती शंभर टक्के यशस्वी ठरली होती.

ढोलबांनी मला कबूल केलेलं चीफ डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टरचं माझं प्रमोशन मिळायला मला सहा महिने वाट पहावी लागली. आमचे चीफ-ढोलबा-यांना मात्र या दैदीप्यमान कामगिरीबद्दल तावडतोब डिव्हिजन चीफचं प्रमोशन मिळालं.

दरम्यान व्यूसनच्या इतर साथीदाराना पकडण्यासाठी अंडरवर्ल्ड-मध्ये मी एक मोठं जाळं लावून ठेवलं होतं. एक एक करून त्यात एमिलचे तीस साथीदार मला सापडले. प्लेस डी ऑपेरा विभागात एक दिवस अगदी अकल्पितपणे, एमिलचा हुन्नरबाज दोस्त रेने गिरियरशी, माझी अचानक गाठ पडली. त्याच्यावर झडप घेऊन मी त्याला रस्त्यात पाडला अन् मग या सुळसुळणाऱ्या 'फुलपाखराच्या' हातात बेड्या ठोकून त्याला मी सेंट तुरुंगात रवाना केलं. दोन महिन्यांपूर्वी एका पोलिसव्हॅनमधून नेण्यात येत असताना हे पाखरू पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटलं होतं. माझ्या हातनं रेने गिरियरची अटक ही 'सूरेट'च्या दृष्टीनं आणखी एक गौरवाची बाब ठरली.

अटक झाल्यानंतर मॉंसियर एमिल व्यूसनला सॅंट तुरुंगातील एका कोठडीत मजबूत बंदोबस्तात ठेवण्यात आल होतं. मग त्याच्या उलट तपासणीवर मी माझं सारं लक्ष केंद्रित केल. माझ्याव्यतिरिक्त इतर कुणाशीही बोलणी करायला त्यानं नकार दिला होता.

त्यामुळं दररोज पोलिसव्हॅनमधून कडक बंदोबस्तात त्याला माझ्या ऑफिसात आणण्यात येऊ लागलं. माझ्या ऑफिसकॅबिनच्या एका खिडकीच्या जाड लोखंडी गजाशी एका भक्कम हातबेडीनं मी त्याला जखडून ठेवत असे नि बसण्यास एक आरामखुर्ची देत असे अन् मग आमच्या प्रश्नोत्तरांना सुरुवात होई त्याच्यावरल्या आरोपांच्या कागदपत्राचे फोल्डर्सचे गठ्ठे मी पुढे ओढत असे आणि त्याच्या उलटतपासणीस सुरुवात करत असे. त्याच्यावरला एकेक आरोप मी त्याला विस्तृतपणे वाचून दाखवत असे आणि मग त्याला प्रश्न विचारत असे. तो शांतपणे माझ्या प्रश्नाची उत्तरे देत असे. एकूण ३६ खून आणि जवळजवळ तितक्याच त्याच्या दुप्पट

दरोड्यांचे आरोप त्याच्यावर होते.

आमचं उलटतपासणीचं काम सुरळीतपणे पार पडलं. व्यूसन या दरम्यान माझ्याशी अगदी मोकळेपणानं बोलला. काही अपवाद वगळता त्याच्या बहुतेक साथीदारांनी आपले गुन्हे मुकाट्यानं कबूल केले. त्यांचे कबुलीजबाब मी व्यूसनला वाचून दाखवले. त्यानं ते मख्खपणानं ऐकून घेतले. अगोदरच जन्मठेपेच्या कैदेखाली असलेल्या या खुन्यानं खुनांव्यतिरिक्त इतर सर्व आरोप कबूल केले. मात्र आपण कुणाचाही खून केला नाही हे तो वारंवार घोकत राहिला. कारण आता त्याचं स्वतःचंच जीवित धोक्यात आलं होतं ना!

लौकरच व्यूसनवर कोर्टात रीतसर खटला भरण्यात आला. त्याच्यावरचा हा खटला पॅरिसमध्ये अतिशय गाजला. आपण कोणाचाही खून वा कोणत्याही तऱ्हेचा रक्तपात केला नाही. हा घोशा व्यूसननं कोर्टामध्येही चालू ठेवला होता; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण त्याच्या विरुद्ध फार मोठ्या प्रमाणावर नि भक्कम असे पुरावे होते.

कोर्टानं व्यूसनला देहदंडाची शिक्षा फर्मावली.

शिक्षा अंमलात येईपर्यंत मॉसेयर एमिल 'व्यूसनची सॅन्ट तुरुंगात' रवानगी करण्यात आली. अंडरवर्ल्डच्या या राजाला तिथं अत्यंत कडक बंदोबस्तात ठेवण्यात आलं होतं.

¤

२७ फेब्रुवारी १९५६ रोजी सकाळी माझ्या फ्लॅटमधला टेलिफोन घणघणला. फोन व्यूसनच्या वकिलाचा होता.

'व्यूसनची शिक्षा उद्या अंमलात आणली जाणार आहे. मला नुकतंच कळलं. तुम्हाला त्याला काही सांगायचंय? काही निरोप द्यायचाय?' त्यानं विचारलं.

रिसिव्हर कानाशी धरलेल्या अवस्थेत काही क्षण मी गप्प राहिलो. काय बोलावं तेच मला सुचेना. नंतर फोनच्या माउथपीसमधे मी म्हणालो, 'त्याला माझा गुड्बाय सांगा!'

अन् मी रिसिव्हर खाली ठेवला. मार्लिस माझ्याकडे एक टक नजरेनं पाहात होती.

'मॉसेयर एमिल! हुंऽऽ डुक्करच होता साला तो!' मी स्वतःशीच पुटपुटलो. 'त्याच्या कर्माचं प्रायश्चित्त उद्या मिळणार त्याला; पण कसलं पिदवलंन् यानं मला! मार्लिस! तुला म्हणून सांगतो की यापुढे ही नोकरी मला झेपायची नाही!'

मार्लिस माझ्याजवळ येऊन उभी राहिली नि तिनं माझ्या डोळ्यात खोल पाहिलं. मी तिला झटकन माझ्या बाहुपाशात ओढलं नि तिच्या ओठांचं हळुवारपणे चुंबन घेतलं.

२८ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी एमिलनं आपल्या वकिलाशी हस्तांदोलन करून त्याचा निरोप घेतला. इतक्या थंडपणे की जणु काही तो एखाद्या कामगिरीवरच निघाला होता. नंतर देहदंडाची शिक्षा बजावणाऱ्या अधिकाऱ्याकडे वळून तो म्हणाला,

'चला! मी तयार आहे मॉसेयर! मला देहांत शासन केल्याबद्दल समाजाला तुमचा अभिमानच वाटेल!'

देहदंडाची शिक्षा अंमलात आणणाऱ्या, संपूर्ण काळ्या वेषातल्या दोघाजणांनी, एमिलला गिलोटीनच्या तक्त्यासमोर नेलं. तक्त्यावरल्या खाच्यात त्यांनी एमिलची मान नीट बसवली.

आणि गिलोटिनचं पातं सर्रदिशी खाली आलं!

मॉसेयर एमिलनं आपल्या दुष्कृत्यांचं ऋण अखेर चुकवलं होतं!

**समाप्त**


**गांधी खून घटनेवर वेगळा प्रकाश**




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

चित्रपट । सदानंद बोरसे

# मीनाकुमारी की अमर कहानी

## सिनेमा कसा नसावा ?

'सिनेमा कसा नसावा ?' या विषयावरील एक आदर्श प्रात्यक्षिक 'मीनाकुमारी की अमर कहानी' या चित्रपटाद्वारे दिग्दर्शक सोहराब मोदी यांनी दाखविले आहे.

लक्षावधी लोकांच्या काळजाला हात घालणारी मूर्तिमंत कारुण्यरूप शोकसम्राज्ञी, आपल्या एकल्या दुःखाचा वेध घेणारी प्रतिभासंपन्न कवयित्री मीनाकुमारी म्हणजे जरा तमाम प्रेक्षकांच्या जिव्हाळ्याचा विषय. (आणि केवळ मीनाकुमारीवरील या गाढ भक्तीमुळेच चित्रपट पाहूनही प्रेक्षक थिएटर जागेवर ठेवतात.) अशा विषयाला हात तशाच समर्थ माणसाने घालावा; पण हा विवेक नसल्यामुळेच कोण्या एका अफझल शादाद नामक फडतूस माणसाने मीनाकुमारीच्या 'artistic career' वरची कथा रचली आणि दिग्दर्शकसाहेबांनी ती त्याहून गदळ रीतीने पडद्यावर आणली. (सोहराब मोदी चित्रपटाच्या सुरुवातीचा काही भागच आपण घेतल्याचे सांगून उरलेले अपश्रेय निर्माताकंपूच्या धंदेवाईक गल्लाभरू दृष्टीच्या गळ्यात बांधतात; पण हा 'काही भागच'सुद्धा विशेष बरा वगैरे नाही )

मीनाकुमारी ऊर्फ महजबी (हे तिचे खरे नाव) आणि तिची मैत्रीण मधुबाला ऊर्फ मुमताज (हे मधुबालाचे खरे नाव) एका रात्री कबरीतून उठतात. त्यांच्याबरोबर आणखी चार मृत स्त्रियाही उठतात. मग मीनाकुमारी सगळ्यांना आपल्या दर्दभऱ्या जीवनाची कहाणी ऐकवते. म्हणजे काय तर आझाद, शारदा, गज़ल, चंदन का पलना, पाकीज़ा इत्यादी सात चित्रपटांतील काही प्रसंग दाखवते. संपूर्ण चित्रपटाचा सुमारे पंच्याहत्तर टक्के भाग या प्रसंगांनी व्यापला आहे. उरलेल्या पंचवीस टक्क्यांपैकी साडेचोवीस टक्के जगदीप व केश्तो मुकर्जी यांची बद्दन रद्दड आणि भिकार दर्जाची कॉमेडी (त्या प्रकाराला कॉमेडी म्हणणे हासुद्धा विनोदाचा घोर अपमान आहे. बा विनोदा, त्या मूर्ख माणसांना क्षमा कर; आपण काय करतो आहोत हे त्यांचे त्यानाही कळत नव्हते.) जयश्री टी आणि तिच्याबरोबरच्या एका हिडिंबेचा एक अत्यंत हिडिस नाच यांनी व्यापले आहेत. उरल्यासुरल्या अर्ध्या टक्क्याने फकीर किंवा भिकारी किंवा तत्सम कुणी तरी बनलेला भारतभूषण 'वफ़ा-ए-इश्कमें खोये जहान मिलते हैं, भटकती रुह के अक्सर निशान मिलते हैं' असे गाणे किंचाळत असतो आणि त्या तालावर पांढऱ्या कपड्यामध्ये मीनाकुमारी, मधुबाला वगैरेंची सहा भुते 'गाऱ्या...गाऱ्या भिंगोऱ्या' करीत गोलगोल फिरत असतात. या प्रकारातून ना धड मीनाकुमारी-एक माणूस व तिच्या व्यक्तित्वाचे पैलू डोळ्यापुढे उभे राहतात, ना तिच्या अभिनयसामर्थ्याचा एकसंध अनुभव मिळतो.

महजबीने 'आझाद'चा संदर्भ घेऊन 'मी आझादवर (=दिलीपकुमारवर) प्रेम केले; पण तो मला सोडून गेला.' नंतर 'शारदा'चा अर्धवट संदर्भ घेऊन 'मी राजकपूरवर प्रेम केले; पण तो विमानअपघातात मेला !' असेच वेगवेगळ्या चित्रपटांचे असंबद्ध संदर्भ घेणे आणि ते आपल्या खऱ्या आयुष्यातील घटना म्हणून सांगणे म्हणजे बिनडोकपणाचा कळस होता. यातून मीनाकुमारीच्या अभिनयाचे सामर्थ्य लोकांना जाणवून द्यावे, असा उद्देश असेल तर मुळात त्याची आवश्यकता काय ? तिच्या अनेक भूमिकांमधून लोकांना त्या सामर्थ्याची प्रचीती आली आहे, त्यांनी तिला पसंतीची पावतीही दिली आहे. शिवाय असल्या जुन्याच त्याही तुटकपणे दाखवलेल्या दृश्यांमधून हा उद्देश कितपत साध्य होणार ?

चित्रपटात कलाकारांबद्दल लिहायचे म्हटले तर जगदीप व केश्तो याच्यासाठी फक्त फुल्याच लिहाव्या लागतील. मधुबालाचे काम सोना या अभिनेत्रीने केले आहे. तिला किंवा कुणालाही जर ती अल्पांशानेही मधुबालाइतकी सुंदर दिसते असे वाटत असेल; तर तिच्या किंवा त्या कुणाच्याही डोक्यात किंवा डोळ्यात किंवा दोन्हींत अतिशय मोठा बिघाड आहे, असे मी छातीठोकपणे सांगेन ! मीनाकुमारीचे काम डॉली नामक अभिनेत्रीने केले आहे. ती दिसते बरीचशी मीनाकुमारीसारखीच; पण बाकी मीनकुमारी उणे अभिनय बरोबर डॉली हे समीकरण उरते आणि वेगवेगळ्या चित्रपटांमधील दृश्यांमध्ये घडलेल्या खऱ्या मीनाकुमारीच्या दर्शनामुळे ते फारच तीव्रतेने जाणवते. मीनाकुमारीच्या किंचित अनुनासिक आवाजाप्रमाणेच डॉलीचाही आवाज आहे; पण सतत कण्हत-कुंथत बोलणे म्हणजे जास्तीत जास्त दर्दभऱ्या रीतीने बोलणे अशी काही तरी वेडगळ समजूत तिने करून घेतली असावी.

चित्रपटातील गीतांपैकी कितना हसी है मौसम (आझाद), नगमा-ए-शेरों की सौगात किसे पेश करूँ (गज़ल), इन्ही लोगोंने (पाकीज़ा), बडा बेदर्द जहाँ है इत्यादि गीते त्या त्या चित्रपटाच्या दृश्यामध्येच होती. चित्रपटाच्या शेवटी मीनाकुमारीच्या स्वतःच्या आवाजातील 'चाँद तनहा है, आसमाँ तनहा' हे तिचे स्वत.चे गीत सुरेख. चित्रपटाचे संगीतकार खय्याम आहेत

चित्रपटात छायाचित्रकाराला फारसे कामच उरले नाही; त्याची कसर उडता कंदील, तरंगती फळी इत्यादी भूतचेष्टांच्या द्वारे काही करामती दृश्ये त्याला देऊन भरून काढली आहे.

चित्रपट पाहिल्यानंतर मनात आलं, 'बरं झालं, मीनाकुमारी आणि मधुबाला आधीच गेल्या !'